# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १६ मार्च, २०१६ / फाल्गुन २६, १९३७ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) वित्त आणि नियोजन, वने मंत्री**<br>**(२) ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल विकास मंत्री**<br>**(३) जलसंपदा मंत्री**<br>**(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ११२**

---

### एड्स नियंत्रणासाठी काम करणाऱ्या संस्थांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१) * ४४२४३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एड्स रोखण्यासाठी केंद्राच्या नॅशनल एड्स कंट्रोल ऑर्गनायझेशन (नॅको) या संस्थेकडून एड्स नियंत्रणासाठी काम करणाऱ्या संस्था तसेच 'एनजीओ' ना निधी प्राप्त न झाल्यामुळे या संस्थांना दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी पासून त्यांचे कार्यक्रम थांबविण्याचे आदेश, नॅको या संस्थेकडून देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एड्स नियंत्रण कार्यक्रमासाठी केंद्र शासन तथा राज्य शासनाकडून एड्स संबंधी काम करणाऱ्या संस्थांना दरवर्षी एकूण किती निधी मंजूर करण्यात येतो, त्यापैकी प्रत्यक्षात किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे व अद्याप किती निधी देणे बाकी आहे,

(३) असल्यास, राज्यात एड्सचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी एड्स विरोधी अभियान कार्यक्रमास गती देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) नॅको, नवी दिल्ली यांच्या वार्षिक कृती आराखडाप्रमाणे लक्ष गट हस्तक्षेप (IT) अंतर्गत कार्यरत असलेले १८३ अशासकीय संस्थांना सन २०१५-१६ मध्ये रु.३०.५९ कोटी इतकी रक्कम मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी माहे एप्रिल ते सप्टेंबर, २०१५ पर्यंत रु.१५.०४ कोटी इतकी रक्कम आतापर्यंत देण्यात आली आहे व उर्वरित रक्कम रु.१५.५४ कोटी देणे बाकी आहे.

नॅको, नवी दिल्ली यांच्या वार्षिक कृती आराखडाप्रमाणे लिंक वर्कर स्किम (LWS) अंतर्गत ग्रामीण भागात कार्यरत असलेले २१ अशासकीय संस्थांना सन २०१४-१५ मध्ये रु.६.६८ कोटी रक्कम मंजूर झालेली आहे. परंतु सन २०१४-१५ च्या वार्षिक कृती आराखड्यानुसार सन २०१५-१६ मध्ये ८० टक्के म्हणजेच, रु.५.३४ कोटी इतकी रक्कम मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी माहे एप्रिल ते सप्टेंबर, २०१५ पर्यंत रु.३.०६ कोटी इतकी रक्कम आतापर्यंत देण्यात आली आहे व उर्वरित रक्कम रु.२.२८ कोटी संस्थांना देणे बाकी आहे. अशासकीय संस्थांकरीता वितरीत करावयाचा उर्वरित अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव नॅको, नवी दिल्ली यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे.

(३) राज्यात एड्सचे वाढते प्रमाण नियंत्रण करण्याकरीता रोखण्यासाठी एड्स विरोधी अभियान कार्यक्रमास गती देण्याकरीता लक्ष्यगट हस्तक्षेप अंतर्गत अशासकीय संस्थामार्फत अतिजोखमीच्या गटांकरीता एकूण १८३ लक्ष्यगट हस्तक्षेप प्रकल्प व २१ लिंक वर्कर स्किम प्रकल्प कार्यरत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवेगाव-नागझिरा अभयारण्यातील प्राण्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून रिक्त पदे भरण्याबाबत

**(२) * ४३३०८ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवेगाव-नागझिरा अभयारण्याला व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा देवूनही या प्रकल्पातील सुरक्षा अधिकाऱ्यांची पदे व अन्य पदे रिक्त असल्याने अभयारण्यातील प्राण्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पात वाघांच्या शिकारीसाठी वापरले जाणारे सापळे माहे जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रकल्पातील प्राण्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून रिक्त पदे भरणे व इतर काय उपाययोजना करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचे संरक्षणासाठी १०-वनक्षेत्रपाल, २६वनपाल व १४४-वनरक्षक अशी पदे मंजूर असून त्यापैकी ०५-वनपाल व ०२-वनरक्षकांची पदे रिक्त आहेत.

तसेच हया व्यतिरीक्त नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राकरिता विशेष व्याघ्र संरक्षण दलाची स्थापना करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने वनरक्षक व वननिरीक्षक संवर्गातील पदभरतीची प्रक्रिया सुरु असून पात्र अंतिम उमेदवारांची निवडसूची तयार करण्याचे काम सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सरु आहे. तसेच संरक्षणाच्या दृष्टीने खालीप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

१) क्षेत्रीय कर्मचारी व अधिका-यांमार्फत वेळोवेळी अतिसंवेदनशिल व संवेदनशील भागात गस्ती करुन नियंत्रण ठेवण्यात येत आहे.

२) वायरलेस यंत्रणा/उपलब्ध वाहने व मनुष्यबळाचा पुर्ण क्षमतेने वपर करणे सुरु आहे.

३) प्राण्यांच्या सुरक्षिततेसाठी ५६ संरक्षण कुट्या तयार करण्यात आल्या आहेत.

४) गस्तीत GPS व मेटल डिटेक्टरचा उपयोग करण्यात येत आहे.

५) आवश्यक त्या ठिकाणी तपासणी नाके असून त्याद्वारे वाहनांची नेहमी तपासणी करण्यात येते.

६) वाघांच्या अधिवासात मुबलक पाणी उपलब्ध व्हावे याकरिता व्याघ्र राखीव क्षेत्रात नैसर्गिक पाणवठे-९७ व कृत्रिम पाणवठे-१३१, खोदतळे-०२ असे एकुण-२३० पानवठे उपलब्ध आहेत.

७) वन्यप्राणी विशेषत: वाघाचे हालचालींचा मागोवा घेण्याकरिता त्यांचे जाणे-येण्याचे संभावीत रस्त्यावर, पाणस्थळां-जवळ नियमीतपणे कॅमेराट्रॅप लावण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिन्नर (नाशिक) तालुक्यातील नदी पुनर्जीवनसाठीच्या विविध कामांसाठी निधी मिळण्याबाबत

**(३) * ४५४६९ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (नाशिक) तालुक्यातील दुष्काळी क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी नदी पुनर्जीवनसाठीच्या विविध कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा व जलसंधारण राज्यमंत्री यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळी क्षेत्र सिंचनाखाली आणणाऱ्या नदी पुनर्जीवन प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नदी पुनर्जीवन कामासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर प्राप्त झाला असून सदर प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## आदिवासी विभागातील शाळांमध्ये निकृष्ट चिक्कीचा पुरवठा करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत

**(४) * ४३०१६ श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य महिला व बालविकास मंत्रालयाकडून २०६ कोटींच्या योजनेअंतर्गत अहमदनगर, जळगांव, अमरावती आणि नंदूरबार या चार जिल्ह्यांच्या आदिवासी विभागातील शाळांमध्ये वितरीत केलेली चिक्की खाण्यालायक नव्हती अशी कबुली राज्य शासनाने मुंबई उच्च न्यायालयाकडे दिली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निकृष्ट चिक्कीचा पुरवठा करणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्यात वाटप करण्यात आलेल्या चिक्कीबाबत अहमदनगर, जळगांव, अमरावती आणि नंदुरबार या चार जिल्हयात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तक्रार प्राप्त चिक्कीचा पुरवठा बदलून घेणे. संबंधित उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून चौकशी अहवाल मागविणे, तक्रार प्राप्त चिक्कीचे नमुने घेऊन शासकीय प्रयोगशाळा/NABL मान्यता प्राप्त प्रयोगशाळा यांचेकडे तपासणीसाठी पाठविणे व संबंधित तपासणी अहवाल प्राप्त करणे इ. बाबतची कार्यवाही वेळोवेळी करण्यात आलेली आहे.

अहमदनगर जिल्हयातील प्रकल्प कार्यालयातून F.D.A. ने राजगिरा चिक्कीचे नमुने घेवून राज्य प्रयोगशाळा पुणे यांचेकडे तपासणीसाठी पाठवले होते. त्यांच्याकडून चिक्की खाण्यास योग्य नसल्याचा अहवाल प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने संबंधित पुरवठाधारक संस्थेस कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. सदर संस्थेने F.D.A. कडे रेफरल लॅब मार्फत पुन्हा नमुने तपासणीसाठी अपील केले होते. संस्थेच्या अपील अर्जानुसार FDA ने राजगिरा चिक्कीचे नमुने गजियाबाद येथे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्याचा अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवालानुसार तीन नमुन्यापैकी दोन नमुने अन्न सुरक्षा मानके (पॅकेजिंग व लेबलिंग) नियमन २०११ चे उल्लंघन झाल्यामुळे मिथ्थाछाप (Misbranded) घोषित केले आहे व एक नमूना प्रमाणित घोषित केला आहे. तसेच दिनांक १०/०७/२०१५ च्या पत्रान्वये आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी राजगिरा चिक्कीचा यापुढील पुरवठा आजपासून तात्काळ थांबविण्यात यावा, असे पुरवठादार संस्थेस कळून तशा सूचना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)/बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना दिलेल्या आहेत.

-----------------

**मौजे म्हस्केवाडी (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथे**
**बिबट्याच्या हल्ल्यात महिलेचा झालेला मृत्यू**

**(५) * ४१८३१ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे म्हस्केवाडी (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील जिजाबाई गोडे या महिलेवर बिबट्याने केलेल्या हल्ल्यात मृत्यु झाल्याची घटना दिनांक ४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, रांधे येथील सखाराम आवारी यांच्यावरही बिबट्याने हल्ला केल्याने तेही गंभीर जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मयत व्यक्तीच्या वारसास व जखमी व्यक्तीला शासनाने किती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी वन विभागाकडून कोणत्या उपाययोजना केल्या आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) प्रचलित शासन निर्णयाच्या तरतूदीनुसार मृत महिलेच्या कायदेशीर वारसास आर्थिक मदत म्हणून रु.८.०० लाख तर जखमी इसमांस तातडीची आर्थिक मदत म्हणून रु.१३,५००/- अदा करण्यात आले आहेत.

(४) मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी भित्ती पत्रिका लावण्यात आल्या. अधिकारी/कर्मचारी वर्गाने ग्राम सभा घेऊन जनजागृती व ग्रामस्थांचे प्रबोधन केले, तसेच वनविभागातील वन कर्मचाऱ्यांची या परिसरात गस्तीसाठी पथके निर्माण करण्यात आली आहेत. बिबट्या जेरंबद करण्यासाठी पिंजरे लावण्यात आले आहेत.

-----------------

## मौजे जिबगाव (ता.सावली, जि.चंद्रपूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या बांधकामास निधी मिळण्याबाबत

**(६) * ३९८०० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जिबगाव (ता.सावली, जि.चंद्रपूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या बांधकामास जिल्हा नियोजन विकास समिती योजनेमधून निधी उपलब्ध करून देण्यात यावा, याकरीता लोकप्रतिनिधींनी मा.वित्त व नियोजन तथा पालकमंत्री, चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना निवेदन दिले असताना, अद्यापही आरोग्य केंद्राचे बाधंकाम अपूर्ण अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम पुर्ण करण्यासाठी जिल्हा नियोजन समिती योजनेतून निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

मौजे जिबगाव, ता.सावली येथील प्राथमिक आरोग्य केंद्र संकूल इमारत बांधकाम त्वरीत सुरु करणेकरीता मा. मंत्री, वित्त, नियोजन व वने तथा पालकमंत्री, चंद्रपूर यांचे दि.०६.१०.२०१५, दि.०७.१०.२०१५ व दि.१५.०१.२०१६ रोजी लोकप्रतिनिधींच्या निवेदनासह जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प. चंद्रपूर या कार्यालयास प्राप्त झाले.

सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून सदर काम ५०.०० लक्षापेक्षा जास्त किंमतीचे असल्यामुळे जिल्हा परिषद सभेत सदर निविदेला स्विकृती घेण्यात आली आहे. कारारनामा व कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही बांधकाम विभाग जि.प. यांचेकडून सुरु आहे

(२) होय.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी व ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प अधिकारी यांच्या बनावट सहया करून लाखो रुपयांचा अपहार केल्याबाबत**

**(७) * ४०२२३ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प अधिकारी यांच्या बनावट सहया करून इंदिरा आवास योजनेतील ६५ लाख ४४ हजार रुपयांचा अपहार करुन शासनाची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित आरोपींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

तथापि, अज्ञात इसमाने (बनावट चेक तयार करुन) मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक यांच्या त्यावर बनावट सहया करुन इंदिरा आवास योजनेचे बँक खात्यातील रक्कम रु.६५,४४,०००/- अनधिकृतपणे काढली होती. परंतु कार्यालयाच्या सतर्कतेमुळे व वेळीच केलेल्या कार्यवाहीमुळे व्याजासह संपुर्ण रक्कम योजनेच्या बँक खात्यात बँकेने पुन्हा जमा केली आहे.

(२) सदर प्रकरणी बँक ऑफ इंडिया, शाखा सुभाष चौक, सोलापुर यांनी पोलीस स्टेशनमध्ये अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा नोंद क्र.९७/१५, दि.०९.११.२०१५ अन्वये गुन्हा नोंदविलेला आहे. सदर रक्कम जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेस परत मिळाल्यामुळे याबाबत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्हयात इंदिरा आवास योजनेंतर्गत राबविण्यात आलेल्या घरकुल योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(८) * ४१२३८ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयात इंदिरा आवास योजनेंतर्गत राबविण्यात आलेल्या घरकुल योजनेत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलासरी तालुक्यातील आमगाव/अच्छाड ग्रुप ग्रामपंचायतीत सन २०११-१२ मध्ये १८६ लाभार्थ्यांना शासनाच्या जीआरनुसार मंजूर करण्यात आलेली घरकुल माहे मार्च, २०१२ पूर्वी काम पूर्ण करण्याचे बंधन असतानाही चार वर्षापासून अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने घरकुल लाभार्थ्यांना किती कालावधीत घरकुल उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) नाही.

तथपि, तलासरी तालुक्यातील आमगाव/अच्छाड ग्रुप ग्रामपंचायतीत सन २०११-१२ मध्ये घरकुले मंजुर झालेली नसून सन २०१२-१३ मध्ये १८६ घरकुले मंजुर झालेली आहेत. इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार घरकुलांचे बांधकाम पहिला हप्ता मंजूर झाल्यापासून २ वर्षाच्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे सन २०१२-१३ मध्ये मंजुरी दिलेल्या घरकुलांचे बांधकाम माहे मार्च, २०१४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. लाभार्थ्यानीच घरकुलाचे बांधकाम उशिरा सुरु केल्याने १२ घरकुले अपूर्णावस्थेत आहे.

(३) होय.

(४) सदर १८६ घरकुलांपैकी १७४ घरकुले पुर्ण आहेत. अपूर्ण १२ घरकुलांचे बांधकाम उशिरा सुरु केल्याने बांधकाम अपूर्णावस्थेत आहे. सदरच्या १२ लाभार्थ्यांना मार्च, २०१६ पूर्वी घरकुले पुर्ण करण्यासाठी प्रवृत्त करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर (जि.जळगांव) तालुक्यातील महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गतची कामे बंद असल्याबाबत

**(९) * ४४६८३ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगांव) तालुक्यातील महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात येत असलेली कामे सन २०१५ च्या पावसाळ्यापासून रोजगार सेवक व गटविकास अधिकारी यांच्या वादामुळे बंद असल्याबाबतची तक्रार रोजगार सेवक यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे तालुक्यातील असंख्य मजूरांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे जोनवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित रोजगार सेवक व गटविकास अधिकारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, मनरेगाची बंद पडलेली कामे तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) तालुक्यातील कृषि विभागाच्या रोजगार हमी योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१०) * ४३७०३ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील कृषि विभाग व पेण तहसिल यांच्या रोजगार हमी योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन २०१२ ते २०१४ या कालावधीत शेताच्या बांधावर व पडीक जमिनीवर फळबाग लागवड कार्यक्रमांतर्गत घेतलेल्या रोजगार हमीच्या कामात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) तथापि याबाबत दिनांक ३१.१०.२०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अर्ज प्राप्त झाला असून या प्रकरणी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, रायगड-अलिबाग यांच्यामार्फत याबाबत चौकशी करण्यात आलेली आहे.

(३) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, रायगड यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. चौकशीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोयना धरणातील पाणी सिंचनासाठी आरक्षित करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(११) * ३९७५५ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना धरणातील वीज निर्मितीसाठी लवादाने ठरवून दिलेल्या पाण्यापैकी १० टक्के पाणी सिंचनासाठी आरक्षित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे व लवादाने वीज निर्मितीसाठी ठरवून दिलेल्या पाण्यापैकी १० टक्के पाणी सिंचनासाठी आरक्षित करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास,सदर पाणी आरक्षित केल्यास त्याचा वीज निर्मितीवर परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत व या प्रस्तावाची सदय: स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) ते (४) अंशत: खरे आहे. कृष्णा-पाणी तंटा लवादातील तरतुदीनुसार कोयना धरणातून दरवर्षी विद्युत निर्मितीसाठी जास्तीत जास्त ६७.५ अ.घ.फू. पाणी पश्चिमेकडे वळविण्याची मुभा आहे. मात्र सन २०१५-१६ मध्ये कोयना धरण हे ७४.८१ टक्के भरले होते. त्यामुळे या वर्षी विद्युत निर्मितीसाठी ५२.५० अ.घ.फू. (पावसाळ्यातील वापर १८.८८ अ.घ.फू. + पावसाळ्यानंतरचा वापर ३३.६२ अ.घ.फू.) इतके पाणी सिमित करुन उर्वरित पाणी पिण्यासाठी व सिंचनासाठी पुर्वे कडे उपलब्ध करुन देणेचे नियोजन आहे. यामुळे कोयना टप्पा १ ते ४ मधील विद्युत निर्मितीत काही प्रमाणात घट अपेक्षित असली तरीही या वर्षीचे कमी पर्जन्यमान व पुर्वेकडील दुष्काळजन्य परिस्थिती विचारात घेऊन शासनाने वरील प्रमाणे नियोजन केले आहे.

-----------------

**कारधा टोलनाक्यावर (जि.भंडारा) वन विभागाच्या फिरत्या पथकाने सागवानाची अवैध वाहतूक करणारे ट्रक पकडल्याबाबत**

**(१२) * ४५१६० श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील कारधा टोलनाक्यावर वन विभागाच्या फिरत्या पथकाने परवान्यापेक्षा अधिक प्रमाणात सागवान लाकडांची वाहतूक करणारे ट्रक दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी पकडले असून त्यात मोठ्या प्रमाणात लाखो रुपये किंमतीची अवैध सागवान वृक्षांची लाकडे आढळून आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सागवानाची लाकडे नागपूर बाजारपेठेत नेली जात असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले असून चौकशीत दोषी ट्रकमालक व दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) भंडारा जिल्हयातील कारधा टोल नाक्यावर दि.११ डिसेंबर २०१५ रोजी फिरत्या पथकाने ३ ट्रकची तपासणी केली असता त्यात परवान्यापेक्षा अनुक्रमे २.५ भर साग चॉक टिंबर तुकडे, ११२ साग जळाऊ तुकडे (२.०२८ घ.मी.) व ६० नग साग जळाऊ तुकडे (२.२४६ घ.मी.) जास्तीचा माल वाहतुक करताना आढळले. सर्व माल खाजगी मालकी क्षेत्रातील आढळला.

(२) उक्त तीन ट्रकमधील लाकडे नागपूर बाजारपेठेत विक्री करीता नेले जात असल्याचे चौकशीत आढळले. चौकशी मध्ये ट्रक मालकावर सुध्दा भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४१ व ५२ नुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे. तिन्ही प्रकरणात अवैध वाहतुक केल्यामुळे प्रत्येकी रु.१५००/- प्रमाणे तीन प्रकरणात एकूण रु.४५००/- दंड वसुल करुन जप्त माल सरकार जमा करण्यात आलेला आहे. तसेच चौकशीमध्ये खाजगी गटातील अवैध माल असल्याचे दिसून आल्यामुळे महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम १९६४ चा कलम ४ मध्ये दिलेली तरतुदीचा वापर करुन नुकसान भरपाई म्हणून रु.१०००/- प्रमाणे गटधारकांकडून रु.३०००/- दंड वसुल केला आहे. सदर प्रकरणी अधिकारी दोषी आहेत किंवा कसे? याबाबत चौकशी सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## कणकोरी (ता.सिन्नर, जि.नाशिक) ग्रामपंचायतीमध्ये हरियाली योजनेत झालेला गैरव्यवहार

**(१३) * ४६६३६ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकोरी (ता.सिन्नर, जि.नाशिक) ग्रामपंचायतीमध्ये हरियाली योजनेत १७ लाख ४१ हजारांचा गैरव्यवहार झाल्याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२), (३) व (४) गटविकास अधिकारी, पंचायत समिती सिन्नर यांच्या स्तरावर झालेल्या चौकशीमध्ये या योजनेत आर्थिक अनियमितता झाल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आले असल्याने संबंधित दोषी व्यक्तींवर पुढील कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडे सादर केला आहे तसेच या प्रकरणी दोषी व्यक्तींवर तात्काळ कडक कारवाई करण्याचे आदेश शासनाने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक यांना दिले आहेत.

-----------------

## टेंभू उपसा सिंचन योजनेमध्ये खानापूर, आटपाडी व तासगांव (जि.सांगली) तालुक्यातील गावांचा समावेश करण्याबाबत

**(१४) * ४५३४३ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभू (जि.सांगली) उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत खानापूर, आटपाडी व तासगांव तालुक्यातील अंदाजे ४० गावे योजनेच्या लाभक्षेत्रापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पातून वंचित गावाचा समावेश नसल्याने या गावांना पिण्याच्या व शेतीच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा, राज्यमंत्री यांना दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे. सांगली जिल्ह्यातील खानापूर, आटपाटी, तासगांव तालुक्यातील टेंभू उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रामध्ये समाविष्ठ करावयाची मागणी असलेल्या एकूण ४५ गावांपैकी १७ गावांचा टेंभू उपासा सिंचन योजनेमध्ये समावेश आहे. उर्वरित २८ गावे लाभक्षेत्रा बाहेरील आहेत.

(२) जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांच्या अहवालानुसार वंचित २८ गावांपैकी ३ गावामध्ये पाणी टंचाई झाल्यामुळे त्यांना पिण्यासाठी टँकरची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(३) होय.

(४) सदर निवेदनावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दाजीपूर अभयारण्य (जि.कोल्हापूर) येथे अभ्यास व संशोधनासाठी अत्याधुनिक माहिती केंद्र उभारण्याबाबत**

**(१५) * ४६६९१ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाजीपूर अभयारण्य (जि.कोल्हापूर) येथे अभ्यास आणि संशोधनाच्या दृष्टीने अभयारण्याच्या वेशीवर मिनी थिएटर अत्याधुनिक माहिती केंद्र उभारण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहित केंद्र उभारण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, माहिती केंद्र लवकरात लवकर सुरु होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) राधानगरी अभयारण्याचा सन २०१५-१६ ते सन २०१९-२० या पाच वर्षासाठीचा पर्यटन आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर आराखड्यामध्ये दाजीपूर येथे सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या निसर्ग माहिती केंद्राचा विस्तार व नूतनीकरण तसेच नवीन ॲम्फिथियेटरचे काम प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर आराखड्यास प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या अध्यक्षतेखालील निसर्ग पर्यटन तज्ञ समितीने मंजूरी दिली आहे. मंजूर नियतव्ययाचे अधीन राहून कामाचे पुढील नियोजन करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सन २०१५-१६ मध्ये नवजात बालक व माता मृत्यूच्या प्रमाणात झालेली वाढ

**(१६) * ३९८६२ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.मदन येरावार (यवतमाळ), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा-कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१५-१६ मध्ये ८०४५ नवजात बालकांचा मृत्यू झाला असून विशेषत: मुंबईत दर महिन्याला ४०० नवजात बालकांना मृत्यू होत असल्याची धक्कादायक आकडेवारी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अहवालात नमूद

करण्यात आले असून, पुणे जिल्हयात ३३४ अर्भकांचा व ८ मातांचा मृत्यू, तसेच यवतमाळ जिल्हयात ८८९ बालकांचा तर २२ महिलांचा प्रसुती दरम्यान मृत्यू झाला, हे खरे आहे काय

(२) तसेच अमरावती जिल्हयातील मेळघाटात गेल्या पाच ते सहा महिन्यात २१० बालमृत्यू झाल्यामुळे मेळघाटातील बालमृत्यूंची समस्या अद्यापही कायम असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर बाल व मातामृत्यूची कारणे काय आहेत तसेच नवजात बालकांचा व मातांचा प्रसुतीदरम्यान मृत्यू होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात सन २०१५-१६ मध्ये मुंबई वगळता ७७८५ नवजात बालकांचा मृत्यू झालेला आहे. मुंबई (दोन जिल्हे) मध्ये जानेवारी ते डिसेंबर, २०१५ या वर्षभरात एकूण २७८४ नवजात बालकांचा मृत्यू झालेला आहे. सन २०१५-१६ मध्ये माहे डिसेंबर अखेर पुणे जिल्हयात ३३४ अर्भकांचा व ९ मातांचा मृत्यू झालेला आहे. तसेच यवतमाळ जिल्ह्यामध्ये २७६ बालमृत्यू व २५ मातामृत्यू झालेले आहेत.

(२) हे खरे नाही.

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागात मागील ६ महिन्यात जुलै १५ ते डिसेंबर, १५ या कालावधीत ०-६ वर्ष वयोगटातील १७६ बालकांचे मृत्यु झाले आहेत.

(३) राज्यात मातामृत्यू हे उच्च रक्तदाब, अति रक्तस्त्राव, जंतुसंसर्ग व रक्तक्षय इ. अशा विविध वैद्यकीय कारणाने आणि इतर आजारानी झालेले आहेत.

नवजात, अर्भक व बालमृत्यू पुढील कारणांनी होतात-जन्मत: कमी वजन असणे, बाळ अपु-या दिवसांचे असणे, श्वासावरोध असणे, अपघात, जंतूसंसर्ग अतिसार, जन्मत: व्यंग व न्युमोनिया इत्यादि.

माता मृत्यू कमी करण्याकरीता प्रामुख्याने गरोदर मातांची १२ आठवड्याच्या आत नोंदणीसह किमान ५ तपासण्या, गरोदर मातांना लोहयुक्त गोळ्या कॅल्शियम व जंतनाशक गोळ्या गरोदर मातांना धनुर्वात लस, तसेच जननी सुरक्षा योजनेतुन आर्थिक मदत देण्यात येते.

बाल मृत्यू टाळण्यासाठी खालील उपाययोजना शासनाकडून राबविल्या जातात.

१) जननी शिशू सुरक्षा योजना.

२) जननी सुरक्षा योजना.

३) आरोग्य संस्थेत प्रसुती.

४) निवळ स्तनपान व पोषण आहरावर भर.

५) बाल उपचार केंद्र.

६) पोषण पुनर्वसन केंद्र.

७) आशामार्फत गृहभेटीद्वारे पाठपुरावा.

८) जंतनाशक व जिवनसत्व "अ" मोहिम.

९) नियमित लसीकरण कार्यक्रम.

१०) राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम.

सदर उपाययोजनांमुळे राज्याचा माता मृत्यू दर ८७ (२०१२-१२) वरुन ६८ (२०११-१३) प्रती लक्ष जीवंत जन्म तर अर्भक मृत्यू दर ४५ (२००१) वरुन २४ (२०१३) आणि नवजात बालक मृत्यू दर ३१ (२०१३) वरुन १७ (२०१३) प्रती हजार असा कमी झाला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भंडारा जिल्हयातील जिल्हा परिषदेंतर्गत सुरु असलेल्या महिला समुपदेश केंद्राला महिला आयोगात समाविष्ट करण्याबाबत**

**(१७) * ४७५३२ श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील जिल्हा परिषदेअंतर्गत सुरु असलेल्या महिला समुपदेश केंद्राला महिला आयोगात समाविष्ट करण्याबाबत दिनांक १२ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास आणून दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद भंडारा यांनी भंडारा जिल्ह्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत सुरु असलेल्या ८ महिला समुपदेशन केंद्राला महिला आयोगाने मान्यता देणेबाबत आयोगास दि.१३.३.२०१४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

जिल्हा परिषद अंतर्गत सुरु असलेल्या महिला समुपदेशन केंद्रासाठी स्वयंसेवी संस्थाचे प्रस्ताव कार्यकारी अधिकारी/ उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क) यांच्या शिफारशीने राज्य महिला आयोगाकडे प्राप्त झाल्यानंतर अशा प्रस्तावांची राज्य महिला आयोगाकडून छाननी होवून आयोगाच्या निकषाप्रमाणे प्रस्ताव योग्य असल्यास त्यास सहमती देण्यात येत होती. सहमतीनंतर सदर संस्थेमार्फत कार्यरत समुपदेशन केंद्राच्या कामाचा आढावा घेणे संस्थेस शासन निर्णयानुसार मानधन/निधी वितरीत करणे ही जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांची म्हणजे जिल्हा परिषद यांची आहे.

तथापि, आता आयोगाच्या दि.७.६.२०१३ रोजीच्या बैठकीतील ठरावामध्ये अशा प्रस्तावांची आयोगाकडे फक्त नोंदणी करण्याचा ठराव झाला असून त्यासाठी निकष निर्धारित करण्यात आले आहेत. सदर निकषाच्या आधारे आता अशा प्रस्तावांची छाननी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी करुन त्यांच्या शिफारशीसह प्रस्ताव आयोगाकडे पाठविणे आवश्यक आहे. त्यानुसार आयोगाच्या दि.२१.११.२०१३ रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्ह्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळविले आहे. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून सदर संस्थांच्या नोंदणी करण्यासाठी सुधारित शिफारस प्रत्र प्राप्त झाल्यावर त्यांची आयोग कार्यालयातील नोंदणी रजिस्टरमध्ये नोंद घेवून त्यांना नोंदणी क्रमांक देण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यात व पातूर (जि.अकोला) तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१८) * ४३३४४ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमीन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात व पातूर (जि.अकोला) तालुक्यातील कृषी विभागाच्या वतीने जलयुक्त शिवार योजनेंतर्गत कामे सुरु करण्यात आली, परंतु यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असून या सर्व कामाची चौकशी करण्याबाबत पंचायत समितीच्या मासिक सभेत ठराव करण्यात आला असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी दोषी आढळून येणाऱ्या संबंधितांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशतः खरे आहे.

पातूर (जि.अकोला) तालुक्यात दि.७/९/२०१५ रोजी पंचायत समिती पातूर येथील सभेत तालुका कृषी अधिकारी ,पातूर हे सभेस गैरहजर राहत असून सभागृहास माहिती सादर करत नाहीत अशा आक्षेप नोंदविण्यात आला असून ठराव क्रम. ३ नूसार अध्यक्ष तथा सभापती, पंचायत समिती, पातूर यांनी त्यांचे समक्ष कामाची चौकशी करणेबाबत ठराव घेतला आहे. यवतमाळ जिल्ह्यात अशा प्रकारचा ठराव घेण्यात आलेला नाही.

(२) नाही.

जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी ,अकोला यांनी तालुका कृषी अधिकारी यांना शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती पंचायत समिती सदस्यांना लेखी स्वरुपात पुरविण्यात यावी तसेच सभेस हजर राहून योजनांची माहिती देणेबाबत कळविले असून व भविष्यात अशा प्रकारची तक्रार उद्‌भवणार नाही याची दक्षता घेण्याचे कळविले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पाथर्डी (जि.अहमदनगर) तालुक्यात राबविण्यात आलेल्या रोजगार हमी योजनेत झालेला गैरव्यवहार

**(१९) * ४४३९९ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथर्डी (जि.अहमदनगर) तालुक्यात दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास रोजगार हमी योजनाअंतर्गत दिनांक १२ ऑगस्ट, २०१३ रोजी दाखल झालेल्या तक्रारीची दिनांक १० ऑक्टोबर, २०१५ रोजी केलेल्या तपासणी व चौकशीनुसार दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी शासनाला सादर करण्यात आलेल्या अहवालात या गैरव्यवहारात दोषी असलेल्या २० व्यक्तींविरुध्द फौजदारी दाखल करण्याची शिफारस केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये अधिकारी, अभियंते, तलाठी, ग्रामसेवक, सरपंच, तत्कालिन उपजिल्हाधिकारी, तहसिलदार यांना दोषी ठरविण्यात आले असून, फौजदारीची शिफारस केलेल्या कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे व उपजिल्हाधिकारी व तहसिलदार यांची विभागीय चौकशी करावी अशी शिफारस अपील प्राधिकरणाने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित दोषी असलेले अधिकारी, कर्मचारी, ग्रामसेवक, सरपंच यांच्याकडून गैरव्यवहार केलेली रक्कम वसुल करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, पार्थर्डी तालुक्यातील दुलेचांदगाव, मोहरी, माळीबाभुळगाव, माणिकदौंडी इ. गांवातील रोजगार हमी योजनाअंतर्गत रस्ते, तलावातील गाळ काढणे इ. कामांत कोट्यवधी रुपयांचा अपहार करणाऱ्या व अपिल प्राधिकरणाने चौकशीअंती दोषी ठरविलेल्या व्यक्तींविरुध्द प्राधिकरणाच्या शिफारशीनुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) असल्यास, याप्रकरणी यापूर्वी चौकशीत विलंब करणाऱ्या तत्कालीन जिल्हाधिकारी तसेच अन्य अधिकाऱ्यांविरुध्द कारवाईस विलंब करणाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) नाही. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने वसूली झालेली नाही मात्र जे अधिकारी कर्मचारी यांनी मा.उच्च न्यायालयात स्थगिती आदेश घेतलेला नाही त्यांचेविरुध्द अपिलीय प्राधिकरणाने दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करणेबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे.

(४) अपील प्राधिकरणाने दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही चालू आहे. तथापि, सदर प्रकरणी अपील प्राधिकरणाच्या निर्णयाविरोधात दोषींपैकी काही अधिकारी/कर्मचारी यांनी मा.उच्च न्यायालयात खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केलेली आहे व अद्याप निर्णय अप्राप्त आहे. त्यामुळे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) सदर प्रकरणी दोन चौकशी अधिकारी यांची नेमणूक मा.जिल्हाधिकारी यांनी करुन चौकशी केली आहे. त्यामुळे चौकशीस टाळाटाळ करण्याचा प्रश्न निर्माण झालेला नाही.

(६) प्रकरणी मा.शासनाकडील अपिलीय प्राधिकरणाच्या निर्णयानुसार कार्यवाही चालु आहे. तथापि, दोषींपैकी अपिलीय प्राधिकरणाच्या निर्णयाविरोधात मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका दाखल केलेली आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे अधिन राहून पुढील कार्यवाही करण्यात येईल. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## झरी (जि.यवतमाळ) तालुक्यातील अडकोली-मुकुटबन या मार्गावरील रस्त्याची झालेली दुरवस्था

**(२०) * ४८१०८ श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झरी (जि.यवतमाळ) तालुक्यातील अडकोली-मुकुटबन मार्गावर मोठमोठे खड्डे पडले असल्याने या मार्गावरुन वाहने चालविणेही कठीण झाल्याने अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करुन हा रस्ता तयार केल्यानंतर एका वर्षात खड्डे पडल्याने त्याची डागडुजीसुध्दा केली गेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) वाहतुक सुरळीत सुरु आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही. अडकोली पांढरकवडा (ल)- अर्धवन इजिमा क्र.२२८ या रस्त्याचे बांधकाम गेल्या पाच वर्षापेक्षा जादा कालावधीपूर्वी झालेले आहे. सदर रस्त्याच्या दुरुस्ती करीता सन २०१३ मध्ये खनिज विकास निधीमधून काम मंजूर करण्याकरीता प्रस्ताव खनिकर्म विभागाकडे जिल्हा परिषदेमार्फत पाठविण्यात आला होता. त्यास मंजूरी प्राप्त झालेली नाही. तथापि सदर काम चालू वर्षी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे.

संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २,३६,८९०.०४ कि.मी. इतकी असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्याच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते. ३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती परिक्षण कार्यक्रमांतर्गत प्राप्त निधी हा मागणीच्या प्रमाणात अल्प आहे.

यवतमाळ जिल्हा परिषदेअंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्गा रस्त्यांची एकूण लांबी ९६८४.९९ कि.मी. आहे. रस्ते व पूल दुरुस्ती व परीक्षण या कार्यक्रमा अंतर्गत सन २०१३-१४ ते २०१४-१५ मध्ये रु.१६८९.५४ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. तर तेराव्या वित्त आयोगाअंतर्गत सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये यवतमाळ जिल्हा परिषदेस रु.६३४.७७ लक्ष निधी वितरीत करण्यात आला असून सन २०१३-१४ मध्ये पुरहानी कार्यक्रमाअंतर्गत रु.२२५२.७७ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

प्रश्नांकित अर्धवन ते मुकुटबन रस्त्याचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त होणाऱ्या निधी व निकषाच्या अधिनतेने व प्राधान्य क्रमाने हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

-----------------

## खडकवासला धरण व मुठा नदी पात्र लगतच्या परिसरात झालेल्या अतिक्रमणाबाबत

**(२१) * ३९८४८ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकवासला धरण, मुठा नदीचे पात्र लगतच्या परिसरात मोठ्याप्रमाणात होत असलेल्या अतिक्रमणांमुळे सार्वजनिक सुरक्षा धोक्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुठा नदीची पूररेषा गायब झाली असून, नदीपात्रात राडारोडा, दगडमातीचे भराव टाकून बांधकामे करणाऱ्यांवर वारंवार कारवाईची मागणी होत असतांना देखील कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, भविष्यात धरणाचे मोठे क्षेत्र तसेच नदीपात्र अतिक्रमणांच्या विळख्यात सापडून पावसाळ्यात पाण्याच्या प्रवाहाने मोठ्याप्रमाणात हानी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, धरण अथवा नदी पात्रालगत २०० मीटर पर्यंत कुठल्याच प्रकारच्या बांधकामांना परवानगी मिळत नसतांनाही बांधकामे चालू आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) धरण परिसर व मुठा नदीपात्रालगतच्या परिसरात काही प्रमाणात अतिक्रमणे झाली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. मात्र सार्वजनिक सुरक्षा धोक्यात आली आहे, अशी वस्तुस्थिती नाही.
(२) मुठा नदीच्या पूररेषा निश्चित करुन जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाने त्यासंदर्भातील नकाशे दि.५.३.२०११ च्या पत्रान्वये पुणे महानगरपालिकेस दिले असून क्षेत्रिय स्थळावर कायमस्वरुपी बांधकामांच्या ठिकाणी पूररेषा आखण्यात आलेल्या आहेत. नदीपात्रात राडारोडा, दगड मातीचे भराव टाकण्याबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिका यांच्याकडून संबंधितांवर कारवाई करुन संबंधितांमार्फत टाकण्यात आलेला राडारोडा काढून घेण्यात येतो.
(३) खडकवासला धरण व जलाशयासाठी संपादित केलेल्या जागेवर ज्या-ज्या वेळी अतिक्रमण होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे, त्यावर जलसंपदा विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत असते. धरणाचे क्षेत्रामध्ये पावसाळ्यात पाण्याच्या मोठ्या प्रवाहाने मोठ्या प्रमाणात हानी होत आहे, अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

नदीपात्रामध्ये अतिक्रमणे न होऊ देण्याची वा अक्रिमणे काढण्याची कार्यवाही स्थानिक स्वराज्य संस्था/महानगरपालिका, पुणे यांचे मार्फत करण्यात येते.

(४) व (५) पुणे शहराच्या मान्य विकास आराखड्यानुसार नदीपात्रालगत दर्शविण्यात आलेल्या ग्रीन बेल्ट व्यतिरिक्तच्या निवासी झोन अंतर्गत बांधकामांना महानगरपालिकेमार्फत परवानगी देण्यात येते. धरण परिसरात व नदीपात्रालगत ज्या ठिकाणी विनापरवाना अनधिकृत बांधकामे सुरु करण्यात येतात, त्या ठिकाणी अतिक्रमण काढण्याची व बांधकामे पाडण्याची कार्यवाही करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयाने जलयुक्त शिवाराच्या बंधाऱ्याच्या संचिकांना निधीअभावी स्थगिती दिल्याबाबत**

**(२२) * ४२१६० श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयाने लघुसिंचनांतर्गत येणाऱ्या जलयुक्त शिवाराच्या २५० बंधाऱ्याच्या संचिकांना कार्यादेश असताना निधीअभावी स्थगिती दिली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव शासनाने जलयुक्त शिवार योजनेसाठी ३७ कोटी १९ लाख रुपयांचा निधी मंजूर केला त्यातील २१ कोटी ९९ लाख रुपये लघुसिंचन विभागाला देण्याचे आदेश निर्गमित केले परंतू जिल्हा नियोजन विभागाने हा निधी समितीच्या नियत्वेच्या कामासाठी नियमबाहय वापरल्यामुळे जलयुक्त शिवारांतर्गत बांधण्यात येणाऱ्या बंधाऱ्यांची काम प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय. अंशत: खरे आहे.

जलयुक्त शिवार अभियांनातर्गत सदर विभागामार्फत २८५ कामासाठी निविदा स्विकृत करण्यात आल्या आहेत. निविदेवर होणारा खर्च व उपलब्ध निधी विचारात घेता २८५ योजनांपैकी ४३ कामांना स्थगिती देण्यात आली व १४ कामे रद्द करणे प्रस्तावित आहे.

(२) हे खरे नाही.

जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ अंतर्गत औरंगाबाद जिल्हयासाठी रु २४२.१९ कोटी नियतव्यय मंजूर झाला होता. त्यामध्ये जलयुक्त शिवार अभियानांतर्गत घ्यावयाच्या कामासाठी रु.३७.१९ कोटी इतका नियतव्यय अंतर्भूत असून जलयुक्त शिवाराच्या जिल्हास्तरीय बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार सदर निधीचे वितरण कृषी विभागाला १४.२७ कोटी, उपवन संरक्षण विभाग ०.३९ लक्ष, कार्यकारी अभियंता जि.प. सिंचन विभाग रु.१.५८ कोटी व लघुसिंचन विभागास रु.२०.९५ कोटी निधी देण्यात आला आहे.

(३) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत औरंगाबाद जिल्हयासाठी शासनाकडून (Gap Funding) रु.३८.६९ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच त्यातून स्थगित व रद्द कामे पुन्हा सुरु करण्यात येणार आहेत. नदी पुनर्जीवन कार्यक्रमांतर्गत जिल्हयास निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बाभुळगांव (जि.यवतमाळ) येथील बेबंळा मुख्य कालवा वितरीकेकरीता संपादीत केलेल्या जमीनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(२३) * ४७४१५ प्रा.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभुळगांव (जि.यवतमाळ) येथील बेबंळा मुख्य कालवा वितरीकेकरीता संपादीत केलेल्या जमीनीचा मोबदला अजुनही शेतक-यांना मिळाला नसल्याचे दिनांक १५ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांना व्याजासह मोबदला देण्यात येईल काय,

(३) असल्यास, शेतक-यांच्या जमीनी ताब्यात घेवून बराच कालावधी होवून झालेल्या नुकसानीबाबत संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

बेंबळा प्रकल्पाच्या कालव्याच्या कामाकरीता २५९० हे. जमिन आवश्यक असुन यापैकी २३४७.१७ हे. जमिन ताब्यात घेतली आहे यामधील १९१० हे. क्षेत्राचा मोबदला भूसंपादन अधिकाऱ्यांकडून अदा करण्यांत आलेला आहे.

उर्वरीत ताब्यात घेतलेल्या जमिनीपैकी मोबदला अदा न केलेल्या ४३७.१७ हे. जमिनीचा मोबदला अदा करणेबाबत सद्य:स्थिती खालील प्रमाणे आहे.

१) १५९.६४ हे. क्षेत्राचा निवाडा जाहिर झालेला असून, निवाडा निधी संबंधीत उपजिल्हाधिकारी यांना उपलब्ध करून देण्यांत आलेला असून वाटपाची कार्यवाही सुरू आहे.

२) २६.४१ हे. क्षेत्र नविन भूसंपादन कायद्यानुसार संपादनाची कार्यवाही विविध स्तरावर आहे.

३) २५१.१२ हे. क्षेत्र सरळ खरेदीद्वारे संपादन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) होय, भुसंपादन प्रक्रियेव्दारे संपादित क्षेत्राचे जमिनीचा ताबा घेतल्याच्या दिनांकापासुन ते निवाडा दिनांकापर्यंत ८% भूभाडे देण्यात येईल.

(३) ज्या क्षेत्रावर राजीनामे घेवून प्रत्यक्ष कामे करण्यांत आलेली आहेत त्या सर्व क्षेत्राची भूसंपादन प्रकरणे भूसंपादन अधिकारी यांचेकडे सादर करण्यांत आलेली होती परंतु केंद्र शासनाचा २०१३ चे नविन भूसंपादन कायदा पारित झाल्यामुळे जी प्रकरणे भूसंपादनाचे विविध स्तरावर कार्यवाहीत होती त्या प्रकरणाची कार्यवाही जुन्या भूसंपादन अथवा केंद्र शासनाचे नविन भूसंपादन कायद्यानुसार करावी ह्याबाबत संदग्धिता निर्माण झालेली असल्यामुळे भूसंपादन कार्यवाहीस विलंब झाला. त्यामुळे, कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अस्वलवाडी, कुसाईवाडी व धसवाडी (ता.शिराळा, जि.सांगली) गावांमध्ये मातीचे बंधारे बांधण्याकरिता काढण्यात आलेल्या निविदांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२४) * ४८३३८ श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अस्वलवाडी, कुसाईवाडी व धसवाडी (ता.शिराळा, जि.सांगली) या गावांमध्ये मातीचे बंधारे बांधण्याकरिता डीएफओ, सांगली यांनी मागविलेल्या निविदांमधून श्री.संभाजी आनंदराव पाटील यांनी तिन्ही बंधाऱ्यासाठी प्रत्येकी रुपये १,९५,११४/- एवढ्या रक्कमेची दिलेली निविदा स्विकारण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिन्ही गावांची भौगोलिक परिस्थिती व जमिनीचा स्तर वेगवेगळा असताना व तिन्ही गावांच्या कामाकरिता वेगवेगळ्या रकमेची निविदा अपेक्षित असताना तिन्हीगावांच्या कामाकरिता एकाच रकमेची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ४५% कमी असलेली निविदा स्वीकारण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निविदांना तांत्रिक मंजूरी कोणी दिली व या कामांचे अंदाजपत्रक कोणी दिले होते,

(४) असल्यास, सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाला असल्याची बाब निदर्शनास आली असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी याबाबतीतील संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याकरिता मा. वित्त व नियोजन मंत्री महोदयांना दिनांक २७ नोव्हेंबर २०१५ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबतीत चौकशी करुन संबंधित दोषीविरुध्द शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) नाही.

(२) नाही.

(३) अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, सांगली यांनी तयार करुन त्यास तांत्रिक मंजूरी दिली होती.

(४) व (५) संबंधित मा.लोकप्रतिनिधी महोदयांनी दि.०६.०१.२०१६ रोजी सचिव (वने) यांना लेखी निवेदन दिले होते. सदर निवेदनात नमूद केलेल्या बाबींबाबत

सविस्तर अहवाल मागविण्यात आला होता, सदर कामांच्या ई-निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाला नसल्याने दोषी अधिका-यांविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील पाणी टंचाईवर करावयाच्या उपाययोजना**

**(२५) * ४१५४० श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र व पश्चिम महाराष्ट्र या भागांत पाऊस कमी झाल्याने राज्यातील धरणातील केवळ ३५ टक्के पाणी साठा शिल्लक असल्याचे माहे फेब्रुवारी,२०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) तसेच मराठवाड्यात दिवसेंदिवस दुष्काळाची दाहकता वाढत चालली असून, प्रकल्पातील पाणीसाठा दररोज घटत असून, एकूण ८५१ प्रकल्पांमध्ये केवळ दहा टक्के पाणी शिल्लक असून, सर्वात मोठा प्रकल्प असलेल्या जायकवाडीत केवळ ७.७३ टक्के पाणीसाठी शिल्लक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात उद्भवणाऱ्या पाणी टंचाईवर शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील विविध महसूली विभागातील जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील धरणामध्ये दिनांक ०५/०२/२०१६ रोजी पुढीलप्रमाणे पाणीसाठा उपलब्ध होता.

| | | |
|---|---|---|
| १) | मराठवाडा प्रदेश | - ८% |
| २) | विदर्भातील नागपूर प्रदेश | - ३५% |
| ३) | विदर्भातील अमरावती प्रदेश | - ३२% |
| ४) | नाशिक प्रदेश | - ३०% |
| ५) | पुणे (पश्चिम महाराष्ट्र) प्रदेश | - ३६% |
| ६) | कोंकण प्रदेश | - ६६% |
| | राज्यातील एकूण | - ३१ % |

(२) मराठवाड्यातील ८४३ प्रकल्पांमध्ये दिनांक ०५/०२/२०१६ रोजी उपयुक्त साठ्याच्या ८ % इतका पाणीसाठा उपलब्ध होता. जायकवाडी प्रकल्पात दिनांक ०५/०२/२०१६ रोजी उपयुक्त साठ्याच्या ५ % इतका पाणीसाठा उपलब्ध होता.

(३) राज्यात उद्भवलेल्या पाणी टंचाई संदर्भात पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या/येत आहेत.

१) महसूल व वन विभागाच्या दिनांक ०७/०९/२०१५ च्या शासन निर्णयानुसार टंचाई काळामध्ये राज्यातील धरणांमधील पाणीसाठा पिण्याच्या प्रयोजनार्थ गरजेनुसार राखीव ठेवण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले असून त्यानुसार त्यांनी पिण्यासाठी आवश्यकतेनुसार पाणी आरक्षित केले आहे. तसेच त्याअनुषंगाने राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडे तीन भागात तयार केले आहेत.

अ) ऑक्टोबर, २०१५ ते डिसेंबर, २०१५

ब) जानेवारी, २०१६ ते मार्च, २०१६

क) एप्रिल २०१६ ते जून, २०१६

या टंचाई कृती आराखड्यात सूचविण्यात आलेल्या उपाययोजना आवश्यकतेनुसार घेण्यात येत आहेत.

२) महसूल व वनविभागाच्या दिनांक २०/१०/२०१५ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील दुष्काळसदृश्य परिस्थिती असलेल्या १४७०८ गावांमध्ये पुढीलप्रमाणे सवलती लागू केल्या आहेत.

अ) जमीन महसूलात सुट

ब) कृषि पंपाच्या चालू वीज देयकात ३३.५% इतकी सुट

क) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी

ड) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर

ई) दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

३) तीव्र दाहकता जाणवत असलेल्या मराठवाड्या करीता जलसंपदा विभागामार्फत सन २०१५-१६ मध्ये गोदावरी खोऱ्यातील उर्ध्व भागातील धरणसमुहांमधुन जायकवाडी धरणासाठी १०.४० टीएमसी पाणी गोदावरी नदीत सोडण्यात आले व त्यापैकी जायकवाडी धरणात ६.६३ टीएमसी पाणी उपलब्ध झाले.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**इंदिरा आवास योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याबाबत**

**(२६) * ५००९३ श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदिरा आवास योजनेतील बनावट लाभार्थी म्हणून अनुदान घेणाऱ्यांना आळा घालण्यासाठी राज्य शासनाने केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त होणारा निधी 'राज्य व्यवस्थापन कक्ष' इंदिरा आवास योजना कक्षाच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी केव्हापासून होणार आहे,

(३) असल्यास, उक्त योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

तथापि, राज्य व्यवस्थापन कक्ष इंदिरा आवास योजना या कक्षाची स्थापना इंदिरा आवास योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी करण्यात आली आहे.

(२) इंदिरा आवास योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना दि. १६.७.२०१५ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आला आहे.

तसेच केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार PFMS (Public Financial Managemant System) प्रणाली चालू वित्तीय वर्षापासून अंमलात आली आहे. याकरीता केंद्र व राज्य हिश्यासाठी (६०:४०% प्रमाणात) एक व राज्य शासनाच्या अतिरीक्त हिश्यासाठी एक अशी दोन स्वतंत्र बँक खाती उघडण्यात आली आहेत. सदर प्रणालीद्वारे केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार सन २०१५-१६ या वर्षापासून PFMS प्रणालीद्वारे इंदिरा आवास योजनेच्या घरकुलांचे हप्ते थेट लाभार्थ्यांच्या बँक/पोस्ट खात्यात वर्ग केले जात आहेत.

(३) सन २०१५-१६ या वर्षापासून "राज्य व्यवस्थापन कक्ष" इंदिरा आवास योजना व PFMS प्रणालीची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना जिल्हयातील कोल्हापूरी बंधाऱ्यांची दुरुस्तीची कामे निधीअभावी रखडल्याबाबत

**(२७) * ४७२७५ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील शेती बारामाही सिंचनाखाली यावी यासाठी कोल्हापूरी बंधाऱ्याची निर्मिती करुन उक्त बंधाऱ्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केला असून बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी निधी अभावी बंधाऱ्याचे काम रखडल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील जवळजवळ ६३ बंधाऱ्याचे दरवाजे चोरीला गेल्याने व निधी अभावी बंधारे रखडल्यामुळे लाखो लिटर पावसाचे पाणी वाहून जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बंधाऱ्याची कामे तात्काळ पूर्णात्वास नेण्यासाठी तसेच बंधाऱ्यांना दरवाजे लावण्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) प्रस्तावाबाबत परिपूर्ण माहिती मागविण्यात येत असून, निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाहीचे नियोजन आहे.

-----------------

**मनमाड उपजिल्हा रुग्णालय (ता.नांदगाव, जि.नाशिक)**
**येथे ट्रामा केअर युनिटला मंजुरी मिळण्याबाबत**

**(२८) * ४१७२४ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मनमाड उपजिल्हा रुग्णालय (ता.नांदगाव जि.नाशिक) येथे ट्रामा केअर युनिटला मंजुरी मिळणेबाबतची मागणी नांदगाव स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. सार्वजनिक आरोग्यमंत्री यांच्याकडे दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी केली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) शासन निर्णय दि.१७ जानेवारी, २०१३ व दि.०९ जुन, २०१४ रोजी निश्चित केलेल्या बृहत आराखड्यामध्ये या संस्थेचा समावेश नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खामगाव (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथे धडक सिंचन योजनेतून**
**मंजूरी दिलेल्या विहिरींची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(२९) * ४१६५३ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथे धडक सिंचन योजनेतून नरेगामध्ये वर्ग केलेल्या तथा शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाना प्राधान्याने लाभ देण्याच्या दृष्टीने तांत्रिक मंजूरी दिलेल्या ६८४ पैकी ५६१ विहिरींची कामे प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विहिरींची कामे प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या विहिरींची कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

मेहकर तालुक्यात धडक सिंचन योजनेतून नरेगामध्ये वर्ग केलेल्या ११७ विहीरींना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून त्यापैकी ७४ विहीरी पूर्ण झाल्या आहेत. उर्वरित ४३ विहिरींपैकी ३९ विहीरींची कामे प्रगती प्रथावर आहेत. ०४ विहीरींचे लाभार्थी काम करण्यास तयार नसल्याने/ काही लाभार्थ्यांनी जमीन विकल्यामुळे सदर ०४ विहिरी रद्द करण्यात आल्या आहेत.

तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूबांचे वारसांच्या १११ नरेगा विहिरींपैकी २९ विहीरींची कामे प्रगती पथावर आहेत. उर्वरित ८२ विहीरींचे कामे विहीत मुदतीत पूर्ण करण्यात येतील.

(२) धडक सिंचन योजनेतून नरेगात वर्ग केलेल्या विहिरी ३० एप्रिल, २०१६ पर्यंत नेरगात पूर्ण करावयाच्या आहेत. तद्नंतर नरेगा अंतर्गत पूर्ण होऊ शकणार नाहीत त्या विहिरी धडक सिंचन विहिर योजनेअंतर्गत वर्ग करुन पूर्ण करावयाच्या आहेत.

त्याचप्रमाणे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विहिरींच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर सलग दोन वर्षात वहिरींची कामे पूर्ण करावयाची आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) विहीरींची कामे पूर्ण करण्याबाबत संबंधीत यंत्रणा व लाभार्थ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## यवतमाळ पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतींना पुरविण्यात आलेल्या घंटागाडी खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(३०) * ४७७४१ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील यवतमाळ पंचायत समितीने सन २०१२ ते २०१३ मध्ये १३ वित्त आयोगांतर्गत घंटागाडी खरेदी करुन पंचायत समिती अंतर्गत येणा-या कोळंबी, बारातांडा, भामराजा, बेचखेडा, नाकापार्डी आदी ग्रामपंचायतींना घंटागाडीचा पुरवठा करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पंचायत समिती यांनी निविदा न मागविताच एकाच ठेकेदाराकडून लाखो रुपयांची घंटागाडी खरेदी करुन कागदोपत्रीच ग्रामपंचायतींना घंटागाडीचा पुरवठा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणात ग्रामपंचायतीचे सरपंच व उपसरपंच यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्याकडे निवेदनाव्दारे चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निविदेनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) पंचायत समिती, यवतमाळने सन २०११-१२ मध्ये ई-निविदा न करता दरपत्रके मागवून निश्चित केलेल्या दरानुसार सन २०१२-१३ मध्ये एकूण १८ घंटागाड्यांकरीता रु.४,४९,८२०/- चा पुरवठा आदेश जनता फर्निचर मार्ट, पांढरकवडा यांना देण्यात आला व त्यानुसार पुरवठा करण्यात आला आहे.

(३) अखिल भारतीय ग्राहक कल्याण परिषदेकडून दि.१६/१०/२०१५ रोजी तक्रार प्राप्त झाली आहे.

(४) सदर निवेदनाच्या अनुषंगाने उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पापुस्व) व सहाय्यक लेखा अधिकारी यांचेमार्फत चौकशी केली आहे. घंटागाडयांचा पुरवठा करताना सन २०११-१२ चे दर वापरुन सन २०१२-१३ ला ई-निविद न करता पुरवठा आदेश दिल्याने खरेदी तत्वाचा व वित्तीय औचित्याचा भंग झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे प्रभारी गट विकास अधिकारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच सहाय्यक लेखा अधिकारी व विस्तार अधिकारी (पं) यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत  नाही.

-----------------

## पुणे येथील महंमदवाडी महिला निरिक्षणगृहातून ३८ तरुणींनी पलायन केल्याबाबत

**(३१) * ४२५७९ श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील दलालांच्या अमिषाला बळी पडलेल्या तरुणीची कुंटणखान्यातून सुटका केल्यानंतर त्यांची महंमदवाडीतील महिला निरिक्षणगृहात रवानगी केली जाते मात्र तेथे क्षमतेपेक्षा दुप्पट महिलांना ठेवले जात असल्याने त्या तरुणींना तेथे नरकयातना सोसाव्या लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्रासाला कंटाळून या निरीक्षण गृहातून माहे डिसेंबरच्या दुसऱ्या वा तिसऱ्या आठवडयात ३८ तरुणींनी तोडफोड करुन पलायन केले होते, त्यापैकी १९ तरुणी स्वारगेट परिसरात सापडल्या मात्र उर्वरित १९ तरुणी अद्यापही बेपत्ता आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

मा.न्यायालयाच्या आदेशान्वये सदरच्या प्रवेशितांना संस्थेत दाखल करुन घेणे क्रमप्राप्त असते. तथापि, संस्थेत क्षमतेपेक्षा दुप्पट महिलांना ठेवले जात असल्यामुळे नरक यातना सोसाव्या लागतात, हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

तथापि, त्रासाला कंटाळून या गृहातुन मुलींनी पलायन केले हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातम्यांच्या अनुषंगाने महिला अधिकाऱ्यांची चौकशी समिती नेमुन चौकशी करण्यात आली. सदर चौकशी मध्ये प्रवेशितांना जेवण व नाष्टा पोटभर मिळत असल्याचे आणि नाष्टा व जेवणात

विविधता व आठवड्यातुन एक वेळ अंडी, मटण व चिकन देत असल्याचे दिसुन आले. स्थानिक महिलांचे त्यांच्या कुटुंबात लवकर पुन:स्थापन होते व परदेशी महिलांना त्यांच्या मायदेशी रवानगी करण्यास परवानगी मिळण्यास विलंब होत असल्याने अशी घटना प्रवेशितांनी  घडवुन आणली असल्याचे चौकशीत स्पष्ट झाले आहे.

१९ तरुणी पोलिसांच्या शोधानंतर मिळून आल्या असून दि.०८/१२/२०१५ रोजी रेस्क्यू फौंडेशन महंमदवाडी, हडपसर, पुणे या संरक्षण गृहातून पलायन करतेवेळी संस्थेची नासधूस, तोडफोड, मारहाण करून पलायन केले असल्यामुळे पलायन केलेल्या महिलांविरुध्द वानवडी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नं.३१५/२०१५ भा.द.वि. कलम ३२३, ३२४, १४३, १४४, १४७, १४८, १४९, ४२७ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळुन आलेल्या १९ महिला प्रवेशितांची मा.न्यायालयाच्या आदेशान्वये महिला कारागृह, येरवडा, पुणे येथे रवानगी करण्यात आलेली होती. तद्नंतर मा.न्यायालयाच्या आदेशान्वये त्यांना प्रेरणा महिला वसतीगृह, बारामती येथे ठेवण्यात आलेले असून त्यांची मायदेशी पाठविणेबाबतची कार्यवाही चालु आहे. उर्वरीत १९ प्रवेशितांचा शोध पोलीस विभागामार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अकोला जिल्ह्यासह विदर्भात कर्जाऊ घेतलेले पैसे परत न करु शकलेल्या गरिबांच्या किडन्या विकण्याचा झालेला गैरप्रकार**

**(३२) * ४८०३३ अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यासह विदर्भात कर्जाऊ घेतलेले पैसे परत न करु शकलेल्या गरिबांच्या किडन्या विकण्याचा गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किडनी काढणारे आणि प्रत्यारोपण करणाऱ्यापैकी एकाही डॉक्टराला आरोपी न करता फक्त चौकशी करुन सोडून दिल्याची माहिती निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला जिल्ह्यातील किडनी तस्करी प्रकरणात सहभागाचा संशय असलेल्या डॉक्टरांवर कारवाई न करण्यामागील कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरील प्रकरणातील आरोपींवर लवकरात लवकर गुन्हे दाखल करुन जास्तीत जास्त शिक्षा सुनावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप उक्त प्रकरणातील आरोपींवर कोणतीच कारवाई होत नसल्यास त्यामागील कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

(२), (३) व (४) होय, सदर प्रकरणी वृत्तपत्रात छापून आलेल्या बातमीच्या अनुषंगाने चौकशी केली असता या संदर्भात अकोला पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदविण्यात आले असून सद्य:स्थितीत पोलीसांमार्फत चौकशी सुरु असून मानवी अवयव प्रत्यारोपण कायद्यांतर्गत पोलीस विभागाला आवश्यक ती तांत्रिक सल्ला देण्याची कार्यवाही आरोग्य सेवा संचालनालयामार्फत करण्यात येत आहे. पोलीस चौकशी पुर्ण झाल्यानंतर दोषी आढळलेल्या व्यक्तींवर कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यात वडसा वन विभागांतर्गत महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(३३) * ४९४०० डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात मुख्य वनसंरक्षक टी.एस.के. रेड्डी यांच्या काळात वडसा वनविभागांतर्गत पुराडा, बेलगाव, मालेवाडा या वन परीक्षेत्रामधील कुशल कामामध्ये सन २०१२ ते २०१५ या वर्षात राबविण्यात आलेल्या महात्मा गांधी रोजगार हमी योजनेत ५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच चौकशी करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार करणाऱ्या या मुख्य वनसंरक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करून कारवाई करण्यास दिरंगाई केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) प्रस्तुत प्रकरणी रुपये १२ कोटीचा गैरव्यवहार झाल्याची बातमी दिनांक १०, ११, व १२ डिसेंबर, २०१३ रोजी दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती. बातमीच्या अनुषंगाने दिनांक २५/७/२०१४ रोजी नरेगा आयुक्तांकडे तक्रार प्राप्त झाली होती.

(२) नाही.

(३) वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने मग्रारोहयोअंतर्गत झालेल्या कामाची सहायक वनसंरक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यात आली. तसेच या प्रकरणी प्राप्त झालेली तक्रार व वन विभागाने सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार सदर प्रकरणात गुणवत्तेबाबत व मोजमापाबाबत अनियमितता आहे किंवा नाही याबाबत कुशल कामाची फेर चौकशी उपविभागीय अधिकारी, कुरखेडा यांच्या अध्यक्षतेखालील समिती मार्फत करण्यात आली.

मग्रारोहयोच्या कामांमध्ये अनियमितता करणे, रोखपुस्तकात रोख लेख्यांच्या नोंदी योग्य रित्या न घेणे इत्यादि आक्षेप चौकशी अहवालात नमूद केले आहेत.

उपरोक्त दोन्ही चौकशी अहवाल व इतर बाबींच्या आधारे वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याविरुध्द दोषारोप पत्र तयार करुन विभागीय आयुक्त यांचेकडे सादर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

## पुणे जिल्हा परिषदेच्या शिपाई पदाच्या परीक्षेत झालेला गैरप्रकार

**(३४) * ४३१२० श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेच्या शिपाई पदाच्या परिक्षेवेळी २ कर्मचाऱ्यांनी पेपर स्कॅन केल्याचे प्रकरण दिनांक १ डिसेंबर २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हा परिषदेकडून शिपाई पदाच्या १८५ जागांसाठी ३८३०४ अर्ज आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, पुणे जिल्हा परिषदेच्या शिपाई पदाची परीक्षा पुन्हा घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच दोषी कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) पुणे जिल्हा परिषदेकडील विविध संवर्गाच्या एकूण १८५ जागांसाठी ३८३०४ अर्ज आले होते त्यापैकी शिपाई पदाच्या ४० जागांसाठी १६९९० अर्ज प्राप्त झाले होते.

(३), (४) व (५) या प्रकरणात जबाबदार असलेले श्री. संतोष डोंगरे व श्री. क्षितीज डोंगरे यांना निलंबित करुन त्यांच्याविरुध्द समर्थ पोलीस स्टेशन, पुणे येथे महाराष्ट्र विद्यापीठ बोर्ड व इतर परिक्षांमध्ये होणाऱ्या गैरव्यवहारांना प्रतिबंधित अधिनियम-१९८२ मधील कलम ५,६ व ८ तसेच भा.द.वि.स. कलम ४४७ च ३४ अन्वये दिनांक २/२/२०१५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. (गु.र.नं ३०७६/१५) तसेच या कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

शासनाचे सदर परीक्षा दिनांक ३/१/२०१६ रोजी घेणेबाबत आदेश दिले होते. त्यानुसार सदर परीक्षा दिनांक ३/१/२०१६ रोजी घेण्यात आली असून नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

----------------

## राज्यातील जलसंधारण महामंडळाला १० वर्षासाठी मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावाबाबत

**(३५) * ४८७४३ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जलसंधारण महामंडळाची ५ वर्षाची वाढीव मुदत सन २०१५ मध्ये संपल्याने महामंडळाला पुन्हा १० वर्षासाठी मुदतवाढ मिळावी व त्यासाठी १०

हजार कोटी रुपयांचा निधी महामंडळाला उपलब्ध करुन द्यावा असा प्रस्ताव माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्याच्या सुमारास सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप उक्त प्रस्तावावर निर्णय झाला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियम २००० च्या कलम २५(१) नुसार महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाला आपली कामे चार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या भांडवलातील राज्य शासनाचा हिस्सा म्हणून, महामंडळाच्या निधीमध्ये रुपये २,००० कोटी एवढ्या एकूण रकमेची तरतूद महामंडळाच्या स्थापनेच्या तारखेपासून पाच वर्षाच्या कालावधीमध्ये योग्य हप्त्यामध्ये विभागून देण्यात येईल अशी तरतूद होती. आता महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या निधीमध्ये रुपये १०,००० कोटी एवढ्या एकूण रकमेची तरतूद महामंडळाच्या स्थापनेच्या तारखेपासून पंचवीस वर्षाच्या कालावधीमध्ये योग्य हप्त्यांमध्ये विभागून देण्यात येईल, अशी सुधारणा करण्यास दिनांक ९ फेब्रुवारी, २०१६ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

## मौजे आलोंडा (ता.विक्रमगड, जि.पालघर) येथील रोजगार हमी योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(३६) * ४२३४८ अ‍ॅड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आलोंडा (ता.विक्रमगड, जि.पालघर) येथील ग्रामपंचायतीच्या हद्दीत रोजगार हमी योजनेच्या कामात बनावट मजूर दाखवून खोटी हजेरी पत्रके तयार

करुन गैरव्यवहार केल्याची नोंद सामाजिक संघटनेने जिल्हाधिकारी (पालघर) यांच्याकडे पत्राद्वारे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान करुन दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गैरव्यवहाराच्या अनियमिततेबाबत चौकशीअंती काय आढळून आले आणि दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

मौजे आलोंडे ग्रामपंचायत, ता. विक्रमगड येथील रोहयो कामांबाबत चौकशी करुन कारवाई करण्याची विनंती करणारे निवेदन श्रमजीवी संघटना महाराष्ट्र यांनी दिनांक २७.११.२०१५ रोजी जिल्हाधिकारी पालघर यांचेकडे सादर केले आहे.

(२) चौकशीअंती मौजे ओलांडा ग्रामपंचायत अंतर्गत मंजूर रस्याच्या कामावर दि.१९.११.२०१५ व दि.२५.११.२०१५ या कालावधी करीता एकूण ११ मजूरांचे हजेरी पत्रक क्र. १४६५ ई-प्रणालीद्वारे काढले आहे. तसेच अद्यापही काम चालू झालेले नाही.

या प्रकरणी संबंधित गट विकास अधिकारी (उ.श्रे) पंचायत समिती, विक्रमगड यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली नाही.

तसेच उप विभागीय अधिकारी, वाडा, जिल्हा पालघर यांची सदर प्रकरणी चौकशीकरीता नेमणूक करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी लागणाऱ्या ग्रीन बोर्ड खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(३७) * ४८९३७ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या तत्कालीन शिक्षण सभापतीने २५ लाखांचे ग्रीन बोर्ड खरेदी केलेले असताना विद्यमान मा.सभापतीनीही पुन्हा ४७ लाखांचे ग्रीन बोर्ड खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद शाळांना ग्रीन बोर्डची आवश्यकता नसताना ई-टेडरिंगनुसार निवदिा न मागविता ग्रीन बोर्ड खरेदी करण्याचे कारण काय आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणी जिल्हा परिषदेच्या, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) ग्रीन बोर्डाची खरेदी शाळांच्या मागणीनुसार व ई-टेंडरिंग निविदा मागवून करण्यात येणार आहे. ई-टेंडरिंग निविदा मागविण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) ग्रीन बोर्ड खरेदी करण्यात आलेले नसल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुत्रपिंड व कर्करोगावरील उपचारासाठी लागणारी औषधे व डायलिसिससाठी लागणारी यंत्र सामुग्री करमुक्त करण्याबाबत

**(३८) * ४७९१२ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुत्रपिंड व कर्करोगावरील उपचारासाठी लागणारी औषधे व डायलिसिससाठी लागणारी यंत्र सामुग्री आणि औषधे करमुक्त करण्याचा निर्णय मा.वित्त मंत्री यांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,
(३) अद्याप निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीस सुरुवात झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) सन २०१५-१६ या अर्थसंकल्पीय भाषणात मा.वित्त मंत्री यांनी कर्करोगावरील काही आवश्यक औषधी करमुक्त करण्याची घोषणा केली तसेच दिनांक २५.०३.२०१५ रोजी अर्थसंकल्पीय चर्चेदरम्यान डायलिसीस औषधाच्या संदर्भात करातून सूट देण्याचे आश्वासन विधीमंडळास दिले.

(२) निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ च्या अधिसूचनेत उल्लेखीत कर्करोगावरील तसेच दिनांक २ जानेवारी, २०१६ च्या अधिसूचनेत उल्लेखीत डालिसीससाठीची औषधे करमुक्त करण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावर देवलापार वनपरिक्षेत्रात वाघ, हरीण आणि रानडुक्कर मृतावस्थेत आढळून आल्याबाबत**

**(३९) * ४४३८७ श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावर देवलापार वनपरिक्षेत्रापासून अवघ्या ६ कि.मी. वर पेंच प्रकल्पालगत २ वाघ, हरीण आणि रानडुक्कर दिनांक २ जानेवारी, २०१६ रोजी मृतावस्थेत आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने पुढील कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) नागपूर वनविभागाअंतर्गत देवलापार वनपरिक्षेत्रातील कक्ष क्रमांक ४९२ राखीव वनामध्ये दिनांक ०२.०१.०२०१६ रोजी उमरी तलाव ते रयतवाडी पायवाटेवर १ वाघ मृतावस्थेत आढळून आला. तसेच रानडुक्कर व चितळ मृतावस्थेत आढळून आले आहे.

पशुवैद्यकीय अधिकारी यांनी मृत वाघाचे शवविच्छेदन केले असून वाघाच्या मृत्यूचे संभाव्य कारण “haemorrhagic Shock” असे नमूद केले आहे, तसेच रानडुक्कर व चितळाचा मत्यू मांसभक्षी वन्यप्राण्याने मारल्यामुळे झालेला असल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद केले आहे.

-----------------

## केंद्रेवाडी (जि.बीड) येथील जिल्हापरिषद शाळेतील शिक्षकाने विद्यार्थीनीवर लैंगिक अत्याचार केल्याबाबत

**(४०) * ३९९७४ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय औटी (पारनेर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रेवाडी (ता.आंबेजोगाई, जि.बीड) येथील जिल्हापरिषदेच्या शाळेतील शिक्षकांने चार विद्यार्थीनीवर लैंगिक अत्याचार केल्याची बाब दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, दोषीं शिक्षकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच अशा प्रकारांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) इयत्ता ३ री च्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थीनीशी गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२), (३) व (४) याप्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात आली असून संबंधित सहशिक्षक दोषी असल्याचे निष्पन्न झालेले आहे. संबंधितांविरुध्द पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे व संबंधितांना मु.का.अ. जि.प. बीड यांच्या दिनांक २३-२-२०१६ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**नडगाव (ता.कल्याण, जि.ठाणे) ग्रामपंचायतीमध्ये झालेला आर्थिक गैरव्यवहार**

**(४१) * ४१७२० श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नडगाव (ता.कल्याण,जि.ठाणे) ग्रामपंचायतीमधील तत्कालीन सरपंच व ग्रामसेवक यांनी सन २०१३-१४ व २०१४-१५ या कालावधीत खोट्या घर पट्ट्याच्या पावत्या बनवून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत गटविकास अधिकारी, कल्याण यांनी मुख्यकार्यकारी अधिकारी, ठाणे यांच्याकडे प्रस्ताव पाठवूनसुद्धा आजपर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार खोट्या घर पट्ट्याच्या पावत्या बनवून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या तत्कालीन सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे दानापूर (ता.भोकरदन, जि.जालना) येथील जुई नदीवरील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यास दरवाजे नसल्याबाबत**

**(४२) * ४८४३३ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दानापूर (ता. भोकरदन. जि. जालना) येथील जुई नदीवरील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याचे काही दरवाजे चोरीला गेले असल्याने दरवाजाअभावी बंधाऱ्यात पाणी साठा होत नसल्याचे दिनांक ६ जानेवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बंधाऱ्यावरील काही दरवाजे नादुरुस्त व गायब झाले असून दरवाजे तात्काळ बसविण्याबाबत संबंधीत विभागास वारंवार तक्रारी करुनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्तप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळुन आले त्यानूसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत व उक्तप्रकरणातील बंधाऱ्यास तातडीने दरवाजे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

मौजे दानापूर मा. भोकरदन जि.जालना येथील जुई नदीवरील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याचे शाखा अभियंता लघू पाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग भोकरदन यानी दिनांक २५/२/२०१६ रोजी प्रत्यक्ष जायमोक्यावर जावून पाहणी केली असता २५ दरवाजे बंधाऱ्यात टाकण्यात आल्याचे व १० दरवाजे बंधाऱ्याजवळ उपलब्ध असल्याचे असे एकूण ३५ दरवाजे आढळून आलेले असून सर्व दरवाजे उपलब्ध आहेत. सन २०१५ च्या पावसाळ्यानंतर दरवाजे टाकून पाणीसाठा करण्यात आलेला होता.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील अंगणवाडीमध्ये मुदतबाहय जंतनाशक औषधे वितरीत करण्यात आल्याबाबत**

**(४३) * ४१५७८ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील गावभागातील अंगणवाडीमध्ये मुदतबाहय जंतनाशक औषधे वितरीत केल्याची धक्कादायक घटना माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली वा येत आहे काय,
(३) असल्यास, संबंधीत दोषींवर काय कारवाई करण्यात आली,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, या प्रकरणी जिल्हा शल्यचिकित्सक कोल्हापूर कार्यालयाकडून दि.२९/०२/२०१६ रोजी त्रिसदस्यीय समितीमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(३) चौकशी अहवालानुसार मुदतबाह्य औषधसाठा वितरीत केल्याबाबत नगरपरिषद, इचलकरंजी येथील वैद्यकीय अधिकारी व आरोग्य सेविका यांच्यावर पुनर्नियुक्तीचा कालावधी कमी करण्याबाबत व त्यांची वार्षिक वेतनवाढ रोखण्याबाबत दि.३१.१०.१५ च्या पत्रान्वये कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाच्या सेवतील चतुर्थ श्रेणीची पदे रद्द करण्याच्या आदेशाबाबत

**(४४) * ४७१२१ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तियाज जलील (औरंगाबाद मध्य), श्रीमती तृप्ती सावंत (सांगोले), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सेवतील चतुर्थ श्रेणीतील ४० ते ५० हजार पदे वित्त विभागाने रद्द करण्याचे आदेश दिल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चतुर्थ श्रेणीतील रिक्त होणाऱ्या पदांबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे,

(३) नसल्यास, कार्यवाहीस होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांना अधिकारी संधी देण्याची गरज, शासनाच्या कार्यपध्दतीतील माहिती तंत्रज्ञान व ई-ऑफिस प्रणालीचा वाढता वापर, काळानुरुप शासनाच्या मनुष्यबळ बदल व मनुष्यबळाचा परिणामकारक वापराची आवश्यकता या बाबींचा विचार करुन शासन निर्णय, वित्त विभाग, दि.१४ जानेवारी, २०१६ नुसार लिपिक संवर्गात गट-ड

कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने भरावयाच्या पदांची मर्यादा संवर्गसंख्येच्या २५ टक्के वरुन ५० टक्के पर्यंत वाढविण्यात आली आहे. गट-ड संवर्गातील मंजूर पदांपैकी २५ टक्के पदे निरसित करण्यासाठी प्रशासकीय विभागांना सहा महिने मुदत देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुळगांव बदलापूर व अंबरनाथ (जि.ठाणे) या दोन्ही शहरांना प्रतिदिन वाढीव पाणी आरक्षणाच्या प्रस्तावाबाबत

**(४५) * ४०५६४ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगांव बदलापूर व अंबरनाथ (जि.ठाणे) या दोन्ही शहरांमध्ये तयार होत असलेल्या गृहसंकुलांमुळे तेथील लोकसंख्येत २.७० लाख ऐवढी वाढ झपाटयाने होत आहे,गृहसंकुले व शहरांचा विकास लक्षात घेता तेथील नागरीकांना पाणी कपातीला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुळगांव बदलापूर व अंबरनाथ या दोन्ही शहरांना एकत्रितपणे ३० द.ल.लि. प्रतिदिन वाढीव पाणी आरक्षणाचा प्रस्ताव कार्यवारी अभियंता म.जी.प्रा.ज.व्य, अंबरनाथ यांनी दिनांक २ जानेवारी, २०१४ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, ठाणे यांच्याकडे सादर केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मा. जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत दोन्ही शहरांना एकत्रितपणे ३० द.ल.लि. प्रतिदिन वाढीव पाणी आरक्षण मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

या वर्षी उल्हास खो-यात पाणी पुरवठा होणा-या बारवी व आंद्रा धरणात अपेक्षित पाणी साठा उपलब्ध न झाल्यामुळे,नागरिकांना पाणी कपातीला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) होय

दिनांक ३/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री महोदयांना निवेदन देण्यात आले आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मालकीच्या बारवी धरणाची उंची वाढविणेचे काम प्रगतीपथावर असून ते पुर्ण झाल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त पाणी साठयातून दोन्ही शहरांना एकत्रितपणे आवश्यक असलेले पाणी आरक्षण मंजुर करणे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील ग्रामीण भागातील आरोग्य उपकेंद्रे बंद असल्याबाबत

**(४६) * ४०८६८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) उप जिल्हा रूग्णालयाअंतर्गत येणारी तालुक्यातील ग्रामीण भागातील बहुतेक आरोग्य उपकेंद्रे महिन्यातील अनेक दिवस बंद असल्यामुळे उपचारासाठी येणाऱ्या आदिवासी व गोर गरीब रुग्णांची अत्यंत गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त विभागात मोठ्याप्रमाणात दुर्गम व डोंगराळ परिसर असल्याने साप व विंचू यासारख्या विषारी प्राण्यांचा दंश होण्याच्या घटना मोठ्याप्रमाणात होत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त विभागात उपकेंद्रे बंद असल्याने रुग्णांना कर्जत तालुका उपजिल्हा रूग्णालयात जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या भागातील रुग्णांना तातडीने उपचार मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे. दि.१.४.२०१५ ते ३१.१.२०१६ पर्यंत विंचु दंश व साप दंश रुपयांची संख्या अनुक्रमे ५१६ व ४४ आहे.

(३) हे खरे नाही. कर्जत (जि.रायगड) येथील ग्रामीण भागात ३८ उपकेंद्रे अस्तित्वात असून ३० उपकेंद्रे स्वत:च्या इमारतीत सुरु आहेत तर ८ उपकेंद्रे नादुरुस्त अवस्थेत असल्याने भाड्याच्या इमारतीत कार्यरत आहेत. या उपकेंद्रामार्फत रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील औंध येथील जिल्हा रुग्णालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेला गैरव्यवहार

**(४७) * ४७१४५ श्री.राहूल कुल (दौंड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील औंध येथील जिल्हा रुग्णालयात अधिकारी व कर्मचारी यांनी विविध प्रकारे गैरव्यवहार केला असल्याची बाब शासकीय लेखापरीक्षणातून माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) औंध जिल्हा रुग्णालयाचे सन २०११ ते २०१५ या कालावधीचे लेखापरीक्षण केले असता कोटयवधी रुपयांची अफरातफर केल्याने तसेच व्यवहाराच्या नोंदी योग्य वहीत केल्या नसल्याने जमा खर्चाचा ताळमेळ लागत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहार करणाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे तसेच गैरव्यवहार झालेली रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२) व (३) वित्तिय व प्रशासकीय अनियमितता झाल्याचे खरे आहे.

औध जिल्हा रुग्णालयाचे सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण दिनांक २६.१०.२०१५ ते ३१.१०.२०१५ या कालावधीत करण्यात आले असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर रक्कम आहरण व संवितरण अधिकारी यांचे खाती शिल्लक असणे, रजा प्रवास सवलतीची देयके सखोल तपासणी न करता पारीत करणे, घरबांधणी/संगणक/वाहन अग्रीम दिल्यानंतर आवश्यक कागदपत्रे सादर न करणाऱ्या कर्मचाऱ्यांची वसुली न करणे अशाप्रकारचे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

लेखापरिक्षणातील नमुद अनियमिततास जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्याबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, औंध, पुणे यांना निदेश दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कवठे महाकाळ (जि.सांगली) येथील बंद करण्यात आलेली म्हैसाळ जलसिंचन योजना पुन्हा सुरु करण्याबाबत

**(४८) * ४२७०७ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील कवठे महाकाळ येथील बंद करण्यात आलेली म्हैसाळ जलसिंचन योजना पुन्हा सुरु करावी यासाठी मिरज-पंढरपूर रोडवर खरसिंग फाटयाजवळ येथील नागरीकांनी रास्ता रोको आंदोलन केले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) सदर उपसा सिंचन योजना दिनांक २०.०२.२०१६ पासून पुन्हा सुरु करण्यात आली आहे.

(३) म्हैसाळ योजनेचे अंदाजे रु. १५.०० कोटी इतके विज देयक थकीत आहे. वीज देयक पाणी पट्टी वसुलीतून भरावयाचे आहे. तथापि बरेच प्रयत्न करुनही लाभधारक थकीत पाणी पट्टी भरत नाहीत. अथवा पाणी मागणी अर्ज देत नाहीत. यामुळे योजना सुरु करणेस विलंब झालेला आहे.

-----------------

## राज्यातील कुपोषित बालके व त्यांच्या माता यांच्यासाठीच्या योजना अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(४९) * ३९८५८ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: वर्धा जिल्हयातील ग्रामीण भागात सन २०१५-१६ मध्ये सॅम (तीव्र) प्रकारात १०७ तर मॅम (मध्यम) गटात ४०८ कुपोषित बालके, रत्नागिरी जिल्हयात २१ तीव्र कुपोषित आणि ६७ मध्यम कुपोषित अशी ८८ कुपोषित बालके, नागपूर जिल्हयातील ४३७ बालके, पालघर जिल्हयात मोखाडा तालुक्यात ६५८ बालके कुपाेषित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) तसेच यवतमाळ जिल्हयात अर्भक मृत्युचा दर हजारी १७.८४, उपजत मृत्युचा दर ८.५, बालमृत्युचा दर ३.९९, मातामृत्युचा दर ०.४६ एवढा असून

जिल्हयातील झरी, पांढरकवडा, मोरेगाव आदी आदिवासी बहुल तालुक्यात माता व बालकांची स्थिती गंभीर असून मागील कालखंडात माता व बालमृत्यूच्या घटना घडल्या, हे ही खरे आहे काय

(३) तसेच केंद्र आणि राज्य शासन कुपोषणाचे उच्चाटन करण्यासाठी कोट्यावधी रुपये खर्च करीत असतानाही भिवंडी तालुक्यातील (जि.ठाणे) कुपोषित मुलांच्या संख्येत वाढ होत असून भिवंडी पंचायत समितीच्या अखत्यारितील २२९ गावांत ३७ हजार १४४ लहानमुले कुपोषित असल्याची धक्कादायक माहिती एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालात माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार, आरोग्य यंत्रणेसह पोषक आहार कुपोषित बालके व माता यांना पुरविण्यासाठी शासनातर्फे कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची, कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे** : (१) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत वर्धा, रत्नागिरी, नागपूर व पालघर या जिल्हयांमधील माहे जानेवारी, २०१५ व जानेवारी, २०१६ मधील कुपोषणाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| जिल्हा | कालावधी | एकूण वजन घेतलेली बालके | सर्वसाधारण बालके | MAM बालके | SAM बालके |
|---|---|---|---|---|---|
| वर्धा | जानेवारी-२०१५ | ७७२१६ | ७०६७१ (९१.५२%) | ५७७ (०.७४%) | १०७ (०.१३%) |
| | जानेवारी-२०१६ | ६२७२६ | ५१२६७ (८१.७३%) | ४०८ (०६५%) | १०७ (०.१७%) |
| रत्नागिरी | जानेवारी-२०१५ | १००६६१ | ९११५६ (९०.५६%) | १३४ (०.१३%) | ३२ (०.३%) |
| | जानेवारी-२०१६ | ८३७५९ | ७७३३२ (९२.३३%) | ५७ (०.०७%) | २० (०.२%) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| नागपूर | जानेवारी-२०१५ | १६०३७४ | १५०७५८ (९४%) | ३४३ (०.२१%) | ७७ (०.०५%) |
| | जानेवारी-२०१६ | १३६००७ | १२२२०६ (८९.८५%) | ४१९ (०.३०%) | १२५ (०.०९%) |
| मोखाडा जिल्हा पालघर | जानेवारी-२०१५ | ९७११ | ५७४८ (६०%) | ३३३५ (३४%) | ६२८ (६%) |
| | जानेवारी-२०१६ | ७९५७ | ४७७१ (६०%) | २७७४ (३५%) | ४१२ (५%) |

(२) हे खरे नाही.

यवतमाळ जिल्ह्यातील कुपोषण व बालमृत्यूची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| महिना/वर्ष | मध्यम कुपोषित | तीव्र कुपोषित | अर्भक मृत्यू दर | उपजत मृत्यू दर | बाल मृत्यू दर | माता मृत्यू दर |
|---|---|---|---|---|---|---|
| जानेवारी-२०१३ | १४४८ | १८४ | १९.०० | ९.२९ | ४.१६ | ०.५१ |
| जानेवारी-२०१४ | १०८४ | २११ | १९.०८ | ७.३४ | ४.३२ | ०.२४ |
| जानेवारी-२०१५ | ५७३ | १३४ | २०.९५ | ७.८९ | ३.२९ | ०.२४ |
| जानेवारी-२०१६ | ३२२ | ८० | १५.६० | ७.६७ | ३.२४ | ०.२० |

वरील आकडेवारीवरुन कुपोषण व बालमृत्यूचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते.

(३) हे खरे नाही.

भिवंडी तालुक्यातील मागील तीन महिन्यामधील ० ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांच्या कुपोषणाची स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| महिना | वजन घेतलेली बालके | सर्वसाधारण बालके | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके |
|---|---|---|---|---|
| ऑक्टोबर-२०१५ | ३४४४३ | ३२१०९ | १९६० | ३७४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| नोव्हेंबर-२०१५ | ३४९७० | ३२८८० | १७४९ | ३४१ |
| डिसेंबर-२०१५ | ३३६५६ | ३१६९९ | १६१७ | ३४० |

वरील आकडेवारी वरुन कुपोषणाचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते.

(४) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाड्यातील ०-६ वयोगटातील बालके, गर्भवती, स्तनदा माता, किशोरवयीन मुली यांना १) पुरक पोषण आहार २) आरोग्य तपासणी ३) संदर्भ सेवा ४) अनौपचारीक पूर्व शालेय शिक्षण ५) लसीकरण ६) आहार व आरोग्य इ. सेवा नियमित देण्यात येत आहेत. तसेच अंगणवाडीतील बालके, गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांची दरमहा आरोग्य विभागाकडून तपासणी करण्यात येते व त्यानुसार संदर्भ सेवा देण्यात येतात. तीव्र कुपोषित मुलांची नियमित आरोग्य तपासणी, औषधोपचार व विशेष आहार देवून त्यांना साधारण श्रेणीत आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोसीखुर्द (जि.नागपूर) सिंचन प्रकल्पाचे जमीन अधिग्रहण**
**व पुनर्वसनाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(५०) * ४२५२१ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील गोसीखुर्द सिंचन प्रकल्पाच्या जमीन अधिग्रहण व पुनर्वसन कामासाठी २४० कोटी रुपयांचा निधी मंजूर करुन सदर प्रकल्पातील कामांना वेग देण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री यांनी दिल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोसीखुर्द सिंचन प्रकल्पाचा जमीन अधीग्रहण व पुनर्वसन कामे लवकरात लवकर पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) दि.०५.०१.२०१६ च्या शासन पत्रान्वये गोसीखुर्द प्रकल्पासाठी ३५० कोटी एवढा अतिरीक्त निधि मंजूर केलेला आहे.

(२) महसूल विभाग शासन निर्णय दि.१२ मे, २०१५ व दि.३०.९.२०१५ नुसार, प्रकल्पास आवश्यक जमिनीचे अधिग्रहण सरळ खरेदीने करण्याबाबत जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीकडुन मुल्यांकन करुन घेऊन सरळ खरेदीची प्रक्रिया सुरु करण्यांत आली आहे. तसेच पुनर्वसन कामांच्या दुरुस्तीसाठी रु.७.५२ कोटी च्या प्रस्तावास शासन स्तरावरून मान्यता प्रदान केलेली आहे. संपादित केलेल्या जमीनीनुसार प्रकल्पाची कामे व तसेच पुनर्वसनाच्या दुरुस्तीची कामे सुरु करण्यांत येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लघुपाटबंधारे विभागाच्या तळवडे (जि.रत्नागिरी) येथील बांधण्यात आलेल्या धरणाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(५१) * ३९८६५ श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लघुपाटबंधारे विभागाच्या तळवडे (जि.रत्नागिरी) येथील बांधण्यात आलेल्या धरणाच्या कामात झालेल्या गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी तळवडे येथील शेतकऱ्यांनी दिनांक २६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी येथे उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे २० वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या या धरणात गळती सुरु असून धरणात पाण्याचा साठा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणाच्या डाव्या कालव्यासाठी कलम ४(१) ची अधिसूचना प्रसिद्ध न करताच शेतकऱ्यांच्या जमिनीत खोदकाम करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे आहे,

तथापि, सदर दिवशी शेतक-यांनी उपोषण केलेले नाही,

(२) अंशत: खरे आहे,

गळतीमुळे मार्च महिन्याचे मध्यापर्यंत धरणातील पाणी संपते.

(३) होय,

तथापि, कालव्याची कामे शेतक-यांची संमती घेवून जानेवारी, २०१२ मध्ये सुरु करण्यात आली आहेत.

(४) व (५) गळती निवारर्णाथ धरण सुरक्षितता संघटना, नाशिक यांच्या मार्गदर्शनानुसार दुरुस्तीबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**सिंधुदुर्ग जिल्हयातील जिल्हा रूग्णालय, उपजिल्हा रूग्णालये, ग्रामीण रूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र व प्राथमिक आरोग्य उपकेंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(५२) * ४०७०५ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील जिल्हा रूग्णालय, उपजिल्हा रूग्णालये, ग्रामीण रूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच प्राथमिक आरोग्य उपकेंद्र यामध्ये वैद्यकिय अधिकारी व अन्य संवर्गातील निम्याहून अधिक पदे रिक्त असल्यामुळे संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हयातील रुग्णांचे आरोग्य धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त जिल्हयात वैद्यकिय अधिकारी वर्ग १, वर्ग २, वर्ग ३ तसेच अन्य संवर्गातील एकूण किती पदे मंजूर आहेत व सदरहू मंजूर पदांपैकी किती पदे आजमितीस भरण्यात आली वा येणार आहेत,
(३) असल्यास, जिल्हयातील आरोग्य सेवा सक्षम होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे,

सिंधुदुर्ग जिल्ह्यात महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा (वर्ग-८) संवर्गाची एकुण २९ पदे मंजूर असून त्यापैकी ९ पदे भरलेली व २० पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची एकुण १६२ पदे मंजूर असून त्यापैकी १०८ पदे भरलेली व ५४ पदे रिक्त आहेत. गट-क संवर्गाची एकुण १०१८ पदे मंजूर असून त्यापैकी ८८३ पदे भरलेली व १३५ पदे रिक्त आहेत. गट-ड संवर्गाची एकुण ३९० पदे मंजूर असून २८५ पदे भरलेली व १०५ पदे रिक्त आहेत. उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे मार्फत रुग्णांना आवश्यक रुग्णसेवा पुरविण्यात येत असल्याने रुग्णांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे नाही.
(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे वैद्यकीय अधिकारी गट अ संवर्गातील २३६ विशेषज्ञांना शासन निर्णय दि.०१.१०.२०१५ अन्वये व एमबीबीएस अर्हताधारक ४६६ वैद्यकीय अधिका-यांना शासन निर्णय दि.१८.११.२०१५ अन्वये नियुक्ती देण्यात आली आहे. वैद्यकीय अधिकारी गट-अ च्या रिक्त पदावर अस्थायी वैद्यकीय अधिका-यांची नियुक्ती करण्यात येत आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आय.पी.एच.एस. योजनेखाली विशेषज्ञ, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात आली आहेत. गट-क व गड-ड संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भातील नादुरुस्त असलेल्या १७४३ तलावांसाठी**
**निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५३) * ४६३६६ ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात चंद्रपुर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर या जिल्ह्यात ६७३४ मामा तलाव असून त्यातील १७४३ तलाव नादुरुस्त असल्याचे दिनांक १८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलाव दुरुस्तीकरीता ६३ कोटी रुपये निधीची गरज भासणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासन काही उपाययोजना आखणार आहे काय,

(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय अंशत: खरे आहे.

(२) विदर्भात चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा व नागपूर या जिल्हयात जिल्हा परिषदेकडे व्यवस्थापनाकरिता ० ते १०० हे. सिंचन क्षेमतेचे एकुण ६७३४ माजी मालगुजारी तलाव आहेत. त्यापैकी २१६८ माजी मालगुजारी तलाव नादुरुस्त आहेत. सदर तलावांची दुरुस्ती प्रस्तावित असुन अंदाजित किंमत रु.३७२.०० कोटी आहे.

(३) व (४) माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीकरिता सन २०१५-१६ या वर्षी रु. १०० कोटी इतका नियतव्यय राखून ठेवण्यात आलेला होता. तसेच माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीच्या मापदंडामध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. सदर प्रस्तावास आता मान्यता देण्यात आलेली असून सदर सुधारित मापदंडानुसार दुरुस्तीची अंदाजपत्रके तयार करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुसार पुढील कालावधीत निधी उपलब्धतेनुसार सदर तलावांची दुरुस्तीची कामे करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## वाशिम जिल्हयातील वनक्षेत्रामुळे बाधीत असलेल्या सात प्रकल्पांना वनविभागाकडून एफआरए प्रमाणपत्र न मिळाल्याबाबत

**(५४) * ४९८०६ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील वनक्षेत्रामुळे बाधीत असलेल्या सात प्रकल्पाना वनविभागाकडून (फॉरेस्ट राईट ॲक्ट- २००६) अर्थात एफआरए प्रमाणपत्र मिळाले नसल्याने मागील पाच वर्षापासून या प्रकल्पांची कामे रेंगाळली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी आधीच उक्त जिल्हयातील २७ प्रकल्पांची कामे प्रलंबित असतांना त्यात प्रश्न भाग (१) मधील सात प्रकल्प वनांमुळे बाधीत झाल्याने सिंचनाचा मोठा प्रश्न उक्त विभागात निर्माण झाला आहे हे लक्षात घेता शासनाने कोणती आवश्यक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) वाशिम जिल्हयातील वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वनजमिन वळतीकरणासाठी प्राप्त एकूण ७ प्रकल्पांपैकी ४ प्रकल्पांबाबतचे अनुसूचित जमाती व इतर परंपारागत रहिवाशी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत जिल्हाधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र संबंधित प्रकल्प यंत्रणेस प्राप्त झाले असून, उर्वरीत ३ प्रकल्पांबाबतचे सदर प्रमाणपत्र अप्राप्त आहे

(२) व (३) अनुसूचित जमाती व इतर परंपरागत रहिवाशी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत प्रमाणपत्र त्वरीत सादर करणेबाबत प्रकल्प यंत्रणेस वेळोवेळी वनविभागामार्फत कळविण्यात आले आहे. तसेच जिल्हाधिकारी, वाशिम यांना शासन पत्र दिनांक ०५/०३/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रमाणपत्राची पूर्तता तात्काळ करण्याबाबत कळविले आहे.

अनुसूचित जमाती व इतर परंपरागत रहिवाशी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत प्रमाणपत्राच्या अभावी प्रकल्प/प्रस्ताव मंजूरीस विलंब होऊ नये याकरीता शासनाने दिनांक २३/०२/२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांस सविस्तर सूचना दिल्या आहेत.

-----------------

## शासकीय रुग्णालयांसह खाजगी औषधालयांच्या दुकानांमध्ये जेनेरिक औषधे ठेवण्याबाबत

**(५५) * ४९९६० श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय रुग्णालयामध्ये जेनेरिक औषधे उपलब्ध करून देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय

(२) वाढती महागाई आणि गरीब रुग्णांना न परवडणारा रुग्णालयाचा खर्च लक्षात घेता शासकीय रुग्णालयाच्या धर्तीवर बाहेरील खाजगी औषधालयांमध्येही (मेडिकल स्टोरमध्ये) गरीबांना परवडतील,अशी जेनेरिक औषधे उपलब्ध करून देण्याविषयी शासन निर्णय घेणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निर्णयाप्रमाणे प्रत्येक खाजगी रुग्णालयासह औषधालयांमध्ये जेनेरिक औषधे ठेवणे बंधनकारक करण्याविषयी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

राज्यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व शासकीय रुग्णालयांना अत्यावश्यक औषधांच्या यादीमध्ये समाविष्ट असलेली जेनरिक औषधांचीच खरेदी करुन पुरविण्यात येतात.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

## चांदूरबाजार (जि.अमरावती) येथे अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या खचलेल्या विहिरीच्या पुर्नबांधकामासाठी मदत देण्याबाबत

**(५६) * ४६५७२ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूरबाजार (जि.अमरावती) येथे दिनांक २२ जुलै, २०१४ व माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये अतिवृष्टी झाल्याने ४४ शेतकऱ्यांच्या शेतविहिरी खचल्यामुळे त्यांना रोजगार हमी योजनामधून आर्थिक मदत उपलब्ध करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी मा.पालकमंत्री, अमरावती यांना दिनांक २६ नोव्हेंबर, २०१५ रोजी लेखी पत्र लिहून मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच या खचलेल्या विहिरीचे पुर्नबांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) व (३) महात्मा गांधी नरेगाअंतर्गत चांदुर बाजार येथील अतिवृष्टीमुळे खचलेल्या विहिरींच्या दुरुस्तीच्या ४४ प्रस्तावापैकी ४१ पात्र प्रस्तावांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. यापैकी ३ विहीरींच्या दुरुस्तीची कामे सुरू झाली असून उर्वरित कामे सुरु करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुरबाड तालुक्यात (जि.ठाणे) पाझर तलाव व बंधाऱ्याची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(५७) * ४१८२५ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड तालुक्यातील (जि.ठाणे) पाणीटंचाई व पाण्याचे गांभीर्य लक्षात घेऊन येथे पाणी अडवा पाणी जिरवा या संकल्पनेतून मातीचे पक्के व कॉक्रिटचे ४६ बंधारे, पाझर तलाव व बंधाऱ्याची दुरुस्ती करण्यात आली मात्र कोटयवधी रुपये खर्च करुनही निकृष्ट दर्जाची कामे झालेली असल्याने या बंधाऱ्यात अद्यापही पाण्याचे थेंब साठत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या वर्षात मुरबाड तालुक्यात एकूण ४६ कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यामध्ये पाझर तलाव नुतनीकरण, गाव तलाव दुरुस्ती/सुशोभिकरण, सिमेंट कॉक्रीट बंधारे व बंधारे दुरुस्ती अशा कामांचा समावेश आहे. एकूण ४६ कामांची अंदाजपत्रकीय किंमत रुपये ५८७.४३ लाख असून १४ कामे पूर्ण झाली आहेत आतापर्यंत रुपये १७५.३४ लाख निधी खर्च झालेला आहे. सन २०१५ च्या पावसाळ्यापूर्वी पूर्ण झालेल्या योजनांमध्ये पूर्ण संचय पातळीपर्यंत पाणीसाठा झालेला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

**राज्यात साथीचे रोग रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(५८) * ४१४४९ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: लातूर जिल्हयात ५० जणांना डेंग्यूची लागण झाल्याचे निदान झाले असून तसेच रायगड जिल्हयात डिसेंबर-जानेवारी, २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या रक्त तपासणीच्या ४ लाख ९२ हजार नमुन्यांपैकी २ हजार २१२ मलेरियाचे रुग्ण आढळले तर डेंग्यूची १०५ जणांना लागण होऊन त्यापैकी ३ रुग्णांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) तसेच धुळे जिल्हयात वातावरणातील गारव्यात वाढ झाल्याने परिसरात सर्दी, खोकला, त्वचेचे विकार इत्यादी आजारांमध्ये वाढ झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठी शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, या मागील विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील लातूर व रायगड जिल्हयात मनेरिया व डेंग्यूचे खालीलप्रमाणे रुग्ण आढळून आले आहे.

लातूर जिल्हयत माहे जानेवारी, २०१५ ते जानेवारी २०१६ या कालावधीत १३९ डेंग्यू रुग्ण आढळून आले आहेत. तर एकही मृत्यू झाला नाही. तसेच मलेरियाचे ५४ रुग्ण आढळून आले असून एकही मृत्यू झालेला नाही.

रायगड जिल्हयात माहे जानेवारी, २०१५ ते जानेवारी २०१६ या कालावधीत १०५ डेंग्यू रुग्ण आढळून आले आहेत. त्यापैकी ३ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. तसेच मलेरियाचे २२१२ रुग्ण आढळून आले असून त्यापैकी ४५ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

(२) हे अंशत: खरे  आहे.

धुळे जिल्हयात ग्रामिण व शहरी भागात स्वाईन फ्ल्यूचे माहे जानेवारी ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत ३९ रुग्ण आढळून आले असून त्यापैकी ८ रुग्णांचा मृत्यु झाला आहे. तसेच माहे जानेवारी, २०१६ व फेब्रुवारी २०१६ या कालावधीत एकही रुग्ण आढळून आलेला नाही. जानेवारी, २०१६ मध्ये वातावरणातील गारव्यात वाढ झाली, तरी रुग्णालयात सर्दी, खोकला व त्वचेचे विकार इत्यादी आजारात वाढ झालेली नाही.

(३) राज्यात लातूर व रायगड जिल्हयांसह डेंग्यू व मलेरिया सारख्या किटकजन्य आजारांच्या नियंत्रणासाठी नियमितपणे खालीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात आल्या व येत आहेत.

- आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत नियमित ताप सर्वेक्षण
- उपकेंद्राच्या ठिकाणी जलद ताप रुग्ण सर्वेक्षण
- ताप रुग्णांचे रक्तनमूने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी
- तपासणी अंती आढळून आलेल्या हिवताप रुग्णांना जंतूच्या प्रकारानुसार समूळ उपचार
- राज्यात/जिल्हयात गप्पीमासे पैदास केंद्राच्या माध्यमातून डासोत्पत्ती स्थानांमध्ये गप्पीमासे सोडणे
- हिवताप अतिसंवेदनशील निवडक गावांमध्ये किटकनाशकाची घरोघरी फवारणी.
- डेंग्यू उद्रेकग्रस्त गावात किटकनाशकाची धूर फवारणी
- किटशास्त्रीय सर्वेक्षण
- राज्यात विषाणूजन्य तापाच्या निदानासाठी पुणे, नांदेड व अलिबाग येथे सॅटीनल सेंटर्स कार्यरत आहेत.
- औषधे व इतर साधन सामुग्रीचा पुरेसा पुरवठा
- उद्रेकग्रस्त ठिकाणी उपाययोजनांच्या मार्गदर्शनास जिल्हा / विभागीय/ राज्यस्तरीय अधिकाऱ्यांच्या भेटी .

सर्दी, खोकला हे रुग्ण हे स्वाईन फ्ल्यू या आजाराचे संशयित रुग्ण असल्याने त्यासाठी धुळे जिल्हयात प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाय योजना करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील शाहुवाडी ते पणुंद्रे या रस्त्याचे काम न करता रक्कम अदा करण्यात आल्याबाबत

**(५९) * ३९९१९ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील शाहुवाडी तालुक्यातील रा.म.मा. २०४ ते कोळगाव टेकोली पणुंद्रे रस्ता इ.जि.मा. १७५ कि.मी. ०/९०० ते १/२८५ हा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असून परिसरातील लोकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावरून बॉक्साइट ने भरलेले ट्रक वाहतूक करीत असल्याने रस्ता दिवसेंदिवस खचत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्याच्या कामासाठी सन २०१३ पासून सुमारे ३ वेळा निविदा रक्कम उचलूनही कोणतेही काम न झाल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरच्या कामाची रक्कम अधिकारी व संबंधित ठेकेदारांनी संगनमताने उचलून काम पूर्ण झाल्याचे कागदोपत्री दाखवले असल्याबाबत लोकांच्या तक्रारी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाची चौकशी करून संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर शासन कोणती कारवाई करणार आहे नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही. सद्य:स्थितीत सदर रस्त्याच्या प्रश्नाधिन लांबीचा पृष्ठभाग वाहतुकीस योग्य असा आहे.

(२) सदर रस्त्यावर प्रश्नाधिन लांबीवरुन बॉक्साइटने भरलेले ट्रक वाहतूक सुरु आहे ही वस्तुस्थिती आहे परंतू प्रश्नांकित लांबीमध्ये रस्ता खचल्याने आढळून आले नाही.

(३) हे खरे नाही, तथापि या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी सन २०१२-१३ मध्ये ग्रामिण रस्ते विकास व मजबुतीकरण या लेखाशिर्षामधून काम मंजूर करुन त्याची विहित पध्दतीने विविदा प्रक्रिया पूर्ण करुन या कामास दि. १२.३.२०१३ अन्वये कार्यारंभ आदेश देऊन अंदाजपत्रकाप्रमाणे पुर्ण करुन घेण्यात आले आहे.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिल्हा सामान्य रुग्णालयात (जि.भंडारा) चुकीच्या पध्दतीने एका महिलेवर प्रसुतीसाठीची सिझेरियन शस्त्रक्रिया केल्याबाबत

**(६०) * ४४७५७ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालयात एका महिलेवर प्रसुतीसाठी सिझेरियन शस्त्रक्रियेत रक्त पुसण्यासाठी वापरण्यात येणारे मोठे कापड व सुत

तिच्या पोटात तसेच राहिल्याची घटना दिनांक २१ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरी परतल्यानंतर तिच्या पोटाचे दुखणे वाढत गेल्याने सोनोग्राफी नंतर सदर घटना लक्षात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत दोषी आढळून आलेल्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे.

(४) संबंधित डॉक्टरांची सेवा समाप्त करण्यात आली आहे . तसेच त्यांची महाराष्ट्र वैद्यक परिषदेकडील नोंदणी रद्द करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे. संबंधित अधिपरिचारीका यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात येत आहे.

-----------------

**भामा आसखेड धरण (ता.खेड, जि.पुणे) प्रकल्पांतर्गत**
**अंशतः बाधित गावांना पुनर्वसनाचे लाभ देण्याबाबत**

**(६१) * ३९८०३ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रौंधळवाडी, शिवे आणि तोरणे बु. (ता.खेड, जि.पुणे) या भामा आसखेड धरण प्रकल्पांतर्गत अंशतः बाधित गावांना सन २००२ साली प्रकल्प पूर्ण होऊनही पुनर्वसनाचे लाभ, पायाभूत सुविधांपासून प्रकल्पबाधित गावांना गेली १४ वर्ष वंचित ठेवण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मा.राज्यमंत्री, जलसंपदा यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३ मे, २०१५ रोजी बैठक झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त बैठकीच्या अनुषंगाने सदर गावांना पुनर्वसनाचे लाभ देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) मौजे रोंधळवाडी या अंशत: बाधित गावांचे पुनर्वसन जलाशयाच्या वरील बाजूस मूळ गावाच्या हद्दीत करण्यात आले असून आवश्यक नागरी सुविधा पूरविण्यात आल्या आहेत. मौजे रोंधळवाडी, शिवे आणि तोरणे बुद्रुक या तीनही गावांच्या जलाशयालगतच्या घराचा मोबदला देणे व प्रकल्पग्रस्तांनी स्वत:च्या शेतामध्ये बांधलेल्या घरासाठी नागरी सुविधा पूरविणे या कामांचे सुधारित खास बाब प्रस्ताव शासनाचे विचाराधीन आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सावली (जि.चंद्रपूर) तालुक्यातील सायखेडा येथील रोजगार हमी योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(६२) * ५०१४२ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायखेडा (ता सावली,जि.चंद्रपूर) येथील ग्रामसेवक, रोजगार सेवक व तत्कालीन सरपंचांनी संगनमत करुन रोजगार हमी योजनेच्या कामात लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी जिल्हाधिकारी यांना दिनांक १७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) होय, सदर प्रकरणाची चौकशी गट विकास अधिकारी पंचायत समिती, सावली यांचेमार्फत करण्यात आली. चौकशी अंती तक्रारीत केलेल्या आरोपांमध्ये तथ्य आढळून आले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्हयात पोषण आहाराच्या योजनेनंतरही कुपोषित बालकांची संख्या वाढत असल्याबाबत

**(६३) * ४५५७० श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हयात पोषण आहाराच्या योजनेनंतर ही ५१५ कुपोषित बालकांची नोंद झाल्याची बाब माहे जानेवारी २०१६ च्या पाचव्या आठवडयात वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय

(२) असल्यास, कुपोषणातुन मुक्ती मिळविण्याकरीता केंद्र व राज्य शासनाकडून विविध उपाययोजना केल्या असताना कुपोषणाचे प्रमाण कमी होत नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, शासनाने यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

वर्धा जिल्ह्यात माहे ऑक्टोंबर ते डिसेंबर २०१५ कालावधीत RBSK च्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ० ते ६ वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी केली असता त्यामध्ये सॅम-१०७ व मॅम-४०८ अशी एकुण ५१५ बालके आढळून आली आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) सन २०१५-१६ करीता कुपोषित बालकांना गावपातळीवर प्राप्त बाल विकास केंद्रामध्ये भरती करुन त्यांना आहार व औषधोपचार करण्याकरिता RCH-II अंतर्गत आरोग्य विभागाकडून निधी प्राप्त न झाल्यामुळे जिल्हा परिषद सेस फंडाकडून रु. २.०० लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच जिल्हा नियोजन समिती मधून VCDC करीता ४.०० लक्ष निधी माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये प्राप्त झाला असून बाल विकास केंद्र कार्यान्वित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे व ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

तसेच आजारी व गंभीर सॅम मधील १०७ बालकांवर उपचार करण्याकरिता सामान्य रुग्णालय, वर्धा येथे माहे जानेवारी. २०१६ पासून पोषण पुर्नवसन केंद्र (NRC) स्थापन करण्यात आले असून त्यामध्ये आजारी सॅम बालकांना १४ दिवस भरती करुन त्यांचेवर आहार व औषधोपचार करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---------------

**वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये डोळयांचे ऑपरेशन करीत असतांना रुग्णांची काळजी न घेतल्याने १० जणांचे डोळे निकामी झाल्याबाबत**

**(६४) * ४६६४५ श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : तारांकित प्रश्न क्रमांक ३६४७० ला दिनांक १४ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुरेशा मेंढे, नेत्रतज्ञ डॉ.प्रशांत चव्हाण व त्यांच्या सहका-यांनी डोळयांचे ऑपरेशन करीत असतांना रुग्णांची काळजी न घेतल्याने १० जणांचे डोळे निकामी झाल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये घटना घडली आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, उक्त रुग्णांना जे.जे हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली तज्ञांची समिती नेमण्यात आली होती. या समितीच्या चौकशी अहवालानुसार मोतीबिंदु शस्त्रक्रिया करतांना मार्गदर्शक सूचनांचे पालन न केल्यामुळे शस्त्रक्रियेनंतर जंतू संसर्ग झाल्यामुळे रुग्णांमध्ये गुंतागुत झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

(४) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय वाशिम व नेत्रशल्य चिकित्सक या दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांना व दोन नेत्रचिकित्सा अधिकारी, वर्ग-३ व एक अधिपरिचारिकेस निलंबित करण्यात आले असून एक अधिपरिचारीका (कंत्राटी) यांचे सेवा समाप्त करण्यात आली आहे. तसेच तीन नेत्रचिकित्सा अधिकारी व ३ अधिपरिचारिका यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**बागलाण (जि.नाशिक) येथील पंचायत समितीच्या वतीने राज्य व केंद्र शासनाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या घरकुल योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(६५) * ४३१७७ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बागलाण (जि.नाशिक) तालुक्यात पंचायत समितीच्या वतीने राज्य व केंद्र शासनाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या घरकुल योजनेचा पहिल्या टप्प्यातील निधी घेवून तब्बल २२०० लाभार्थ्यांनी घरकुले उभारली नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सन २००६-०७ पासून इंदिरा आवास योजना, राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र १ व रमाई आवास योजना कार्यान्वित केली असुन त्याअंतर्गत बागलाण तालुक्यातील ब्राम्हणगाव, ठेंगोडो, नामपूर, जायखेडा, वीरगांव, ताहाराबाद, पठावे दिगर या सातही जिल्हा परिषद गटांना घरकुले दिली या कामांत गैरव्यवहार झाला असून आजही या तालुक्यात २२०० घरकुले अपूर्णावस्थेत असुन संबंधितांना घरकुलाचा पहिला हप्ता देऊन घरकुलेचं उभारली नाहीत तरी याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) अशी कोणतीही तक्रार प्राप्त न झाल्याने व गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास न आल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य शासनाच्या विविध महामंडळे आणि प्राधिकरणाच्या देना बँकेतील कोट्यवधी रुपयांच्या मुदत ठेवींचा झालेला गैरव्यवहार**

**(६६) * ४०३३८ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा**

**कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या एमएमआरडीए,महिला आर्थिक विकास मंडळ,महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ, संत रोहिदास कर्मचारी विकास महामंडळ व पर्यटन विकास महामंडळासह किमान १० महामंडळाने आणि प्राधिकरणांने जवळपास ३५० कोटी रुपयांच्या देना बँकेतील मुदत ठेवीवर बनावट क्रेडिट देवून बँकेचे अधिकारी आणि दलालांच्या संगनमतातून महामंडळांची फसवणूक केल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाचे मुदत ठेवीचे पैसे बिल्डरसह उद्योगपतींना कॅश क्रेडीट मध्ये वापरायला मिळाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात मुंबईतील मलबार हिल पोलीस स्थानकात तक्रार नोंदविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रकारच्या घटना नजीकच्या काळात काही महामंडळाकडून त्यांच्याकडे शिल्लक असलेला निधी दि. २७/१०/२०१५ रोजीच्या शासन निर्णयामुळे नमूद केलेल्या दि. २६/४/२००५, १३/३/२००६, २२/३/२००६, १/७/२०१०, २४/७/२०१४

रोजीच्या शासन निर्णयान्वेय दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेवीच्या स्वरुपात ठेवण्यात आला होता, सदर निधी गुंतविल्यानंतर गुंतवणूक प्रमाणपत्र प्राप्त करणे, ते योग्य असल्याचे खात्री करणे, तसेच सद्य:स्थितीत आढावा घेणे, इत्यादिबाबत गुंतवणूक प्रक्रियेत त्रुटी राहिल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्यानंतर शासनाचा निधी योग्य पध्दतीने गुंतविला जावा या पार्श्वभूमीवर उपरोक्त मार्गदर्शक तत्वे व सूचना संकलित करुन सर्व समावेशक अशा एकत्रितपणे सुधारित शासन निर्णय क्र. शासाऊ१०.१५/प्र.क्र.४२/सा.ऊ. दि.२७/१०/२०१५ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त शासन निर्णयाचा विचार केल्यास महामंडळातील गैरव्यवहाराप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे. मात्र, जुलै, २०१४ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ यांनी देना बँकेत आणि संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ यांनी विजया बँक येथे गुंतविलेल्या मुदती ठेवीवरील एकूण रु. १४३.१५ कोटी इतक्या रक्कमेचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

तथापि, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या निधीसंदर्भात कोणताही अपहार झाल्याचे आढळून आलेले नाही.

देना बँकच्या कर्मचाऱ्यांविरुध्द सी.बी.आय. ने जून २०१५ मध्ये विशेष न्यायाधीश, बृहन्मुंबई येथे आरोपपत्र दाखल केले असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

विजया बँकेसंदर्भात आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांचेमार्फत तपास सुरु आहे.

(४) व (५) हे ही अंशत: खरे आहे. सबब, सदर त्रुटीचे निराकरण करण्याकरीता राज्य सार्वजनिक उपक्रमांचा निधी गुंतविण्यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(६) राज्य सार्वजनिक उपक्रमांकडे शिल्लक असलेला अतिरिक्त निधी गुंतवणूकीसंदर्भात त्यांना मार्गदर्शक तत्वे/सुचना देण्यात आल्या आहेत.

तसेच या प्रकरणी तपास सुरु असुन सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोठा ग्रामपंचायत (ता.तेल्हारा, जि.अकोला) येथील स्मशानभुमीच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(६७) * ४५१९३ श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोठा ग्रामपंचायत (ता.तेल्हारा, जि.अकोला) येथील स्मशानभूमीच्या कामात तत्कालीन ग्रामसेवक (सध्या सेवानिवृत्त), तत्कालीन सरपंच महिला व विद्यमान सरपंच यांनी ८ लाख ५१२ रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याच्या आरोपावरुन त्यांच्या विरुध्द एफआयआर नोंदविण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांनी निर्देशित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचायत समिती, तेल्हाराचे विस्तार अधिकारी यांनी दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास तेल्हारा पोलीस निरिक्षकांकडे तक्रार नोंदविली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक दिवस होऊनही या प्रकरणात पोलीसांनी गुन्हा व प्रथम माहिती अहवाल नोंदविला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) नाही. या प्रकरणी पोलीस स्टेशन तेल्हारा येथे गुन्हा व प्रथम माहिती अहवाल नोंदविला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सार्वजनिक आरोग्य विभागाच्या डायलेसीस मशीन खरेदीच्या प्रस्तावाबाबत**

**(६८) * ४२५१३ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गतच्या रुग्णालयामध्ये कोटयवधी रुपयांच्या १०२ डायलेसिस मशीन खरेदी करण्यात येत असून या खरेदी प्रक्रियेतील अटींमध्ये केलेल्या एका बदलामुळे खुल्या जागतिक स्पर्धेला लगाम बसून केवळ विशिष्ट कंपनीला लाभ मिळणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त खरेदीसाठी एकूण किती व कोणकोणत्या कंपन्यांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत,

(३) असल्यास, निविदा प्रक्रियेतील अटीमध्ये केलेल्या बदलामुळे खुल्या जागतिक स्पर्धेला लगाम बसून केवळ विशिष्ट कंपनीलाच त्याचा लाभ व्हावा म्हणून निविदेतील विशिष्ट अट बदलण्याचा प्रकार हाणून पाडण्यात आला असला तरी परत त्याच खरेदी प्रक्रियेचा अवलंब करुन सदर डायलिसेस मशिन खरेदी करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय चौकशीनुसार त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार पुढे काय कारवाई करण्यात आली आहे,

(५) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

राज्यातील जिल्हा/उपजिल्हा रुग्णालयांकरीता १०२ डायलेसीस मशीन खरेदी करण्यासाठी आरोग्य सेवा संचालनालयामार्फत निविदा क्रमांक ई-२१० प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर उपकरणाच्या विनिर्देशात CE आणि USFDA प्रमाणपत्र असण्याची अट अनिर्वाय करण्यात आली आहे.

CE आणि USFDA प्रमाणपत्र असलेल्या नामांकित कंपनीकडील उत्कृष्ट उपकरणे रुग्णांकरीता उपलब्ध व्हावीत या उद्देशाने ही अट घालण्यात आली आहे.

(२) डायलेसीस मशीन खरेदी संदर्भात आरोग्य सेवा संचालनालयामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेच्या अनुषंगाने खालील तीन कंपन्यांकडून निविदा प्राप्त झाल्या आहेत-

१) Bbraun Medical India Pvt Ltd

२) Fresenius Medical Care India Pvt Ltd

३) Nipro Medical India Pvt Ltd

(३) हे खरे नाही.

Critical Care साठी आवश्यक असलेल्या उपकरणांमध्ये CE आणि USFDA प्रमाणपत्र असावे हा निर्णय सदर डायलेसिस मशीनची खरेदी प्रक्रिया सुरु होण्यापुर्वीच दिनांक १२.०६.२०१३ च्या केंद्रीय खरेदी समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**बुलढाणा जिल्हयातील खामगाव शहरातील उपजिल्हा सामान्य रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(६९) * ४१४६५ श्री.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयामधील सामान्य रुग्णालय, उपजिल्हा सामान्य रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयात मंजूर असलेल्या ७५३ पदांपैकी तब्बल १९६ वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील रुग्णांची गैरसोय लक्षात घेता येथील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे,

बुलढाणा जिल्ह्यामध्ये १ जिल्हा रुग्णालय, २ सामान्य रुग्णालये, १ उपजिल्हा रुग्णालय व १२ ग्रामीण रुग्णालये सुरु आहेत. सदर रुग्णालयांमध्ये गट-अ ते गट-ड संवर्गाची एकुण १२०९ पदे मंजूर असून त्यापैकी ९२३ पदे भरलेली व २८६ पदे रिक्त आहेत. तथापि उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे मार्फत रुग्णांना आवश्यक रुग्णसेवा पुरविण्यात येत आहेत.
(२) सन २०१५ मध्ये वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गातील १० वैद्यकीय अधिका-यांना बुलढाणा जिल्ह्यामध्ये नियुक्ती दिली आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गातील रिक्त पदांवर १५ अस्थायी वैद्यकीय अधिका-यांना नियुक्ती देण्यात आली आहे. गट-क व गट-ड संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अंगणवाडी कर्मचा-यांनी त्यांच्या प्रलंबित विविध मागण्यासंदर्भात केलेल्या आंदोलनाबाबत**

**(७०) * ४३३८९ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.भास्कर जाधव (गुहागर),**

**श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या प्रलंबित विविध मागण्याबाबत दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी आझाद मैदान येथे एक दिवसीय आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंदोलनकर्त्या कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या कोणकोणत्या आहेत,

(३) असल्यास, त्यापैकी कोणकोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत,

(४) तसेच, उर्वरित मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या प्रलंबित विविध मागण्यांबाबत दिनांक ०२/०२/२०१६ रोजी आझाद मैदानावर धरणा कार्यक्रम आयोजित केला होता.

(२) अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्या खालीलप्रमाणे आहेत.

i) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे कायमस्वरुपी शासकीय विभागामध्ये रुपांतर करावे.

ii) अंगणवाडी सेविका/मदतनीस यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन अनुक्रमे तृतीय व चतुर्थ वेतनश्रेणी व महागाई भत्ता व अन्य भत्ते देण्यात यावे.

iii) अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना रुपये ५,०००/- भाऊबीज भेट देण्यात यावी.

iv) अंगणवाडी सेविका/मदतनीसांना दरवर्षी जिल्हा परिषद व महानगरपालिकेतील शिक्षकांप्रमाणे मे महिन्याची पगारी सुट्टी देण्यात यावी.

v) अंगणवाडी सेविका/मदतनीसांना राज्य कामगार विमा योजना लागू करा.

vi) शिक्षण अधिकार कायदा (आरटीई) अंतर्गत असलेला पूर्व प्राथमिक शिक्षणासाठीचा निधी अंगणवाडयांकडे वर्ग करण्यात यावा खाजगी बालवाडी व अंगणवाडी यामधील पायाभूत सोई समान शिक्षण व अन्य सेवाचे समानिकरण करावे व अंगणवाडी व बालवाडीतील पूर्वप्राथमिक शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी.

vii) एल.आय.सी. योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविका/मदतनीस यांना एकरकमी लाभ देण्याच्या योजने संबंधीच्या शासन निर्णय दिनांक ३०/०४/२०१४ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

अ) अंगणवाडी सेविकांना व मिनी अंगणवाडी सेविकांना प्रत्येक पूर्ण केलेल्या वर्षासाठी एक महिन्याचे वेतन देण्यात यावे व एक लाख रुपयांची मर्यादा काढून टाकण्यात यावी.

ब) अंगणवाडी मदतनीसांना प्रत्येक पूर्ण सेवा केलेल्या वर्षासाठी दीड महिन्याचे वेतन देण्यात यावे व ७५ हजार रुपयांची मर्यादा काढून टाकण्यात यावी.

क) अंगणवाडी सेविका/मदतनीसांना सेवानिवृत्ती लाभ दिल्याशिवाय सेवा समाप्त करण्यात येऊ नये.

ड) सदरहू सेवानिवृत्ती लाभ योजना २००८ सालापासून लागू करण्यात यावी.

(३) व (४) उपरोक्त नमूद अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत केलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे.

i) एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र शासन पुरस्कृत योजना असल्यामुळे सदर योजना कायमस्वरुपी शासकीय विभागामध्ये रुपांतर करावयाचे झाल्यास त्यास केंद्र शासन स्तरावरुन निर्णय घेणे आवश्यक आहे.

ii) एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र शासनाची योजना असून ती राज्य शासनामार्फत राबविण्यात येत आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या मॅन्यूअल प्रमाणे अंगणवाडी सेविका/ मदतनीस ही पदे मानधनी स्वरुपाची असून त्याचे अंगणवाडीतील कामकाजाची वेळी ही फक्त चार तास आहे. त्यामुळे त्यांना शासकीय कर्मचा-याचा दर्जा देणे संयुक्तीक होणार नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाने Civil appeal Nos. ४९५३-४९५७ of १९९८ state of Karnataka Vs. Ameerabi & others याप्रकरणी दिनांक ७.१२.२००६ रोजी अंगणवाडी सेविका/मदतनीस ही मानधनी पदे असून त्यांची पदे ही Civil Posts नाहीत असा निर्णय दिलेला आहे.

अंगणवाडी सेविका/मदतनीस ही मानधनी पदे असल्यामुळे त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा नाही. त्यामुळे त्यांना शासकीय कर्मचा-यांप्रमाणे वार्षिक वेतनवाढ देता येणे शक्य नाही. तसेच त्यांना शासकीय कर्मचा-यांनुसार महागाई

भत्ता देता येत नाही. तथापि, अंगणवाडी सेविकेला ५ वर्ष अनुभवानंतर रु.३१/- इतकी वाढ मानधनामध्ये करण्यात येते.

iii) सन २०१३-१४ व २०१४-१५ या दोन वर्षाची भाऊबीज भेट अदा करण्याबाबत शासन निर्णय दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार रुपये १०००/- प्रमाणे अंगणवाडी कर्मचाऱ्यांना भाऊबीज भेट अदा करण्यात आली आहे.

iv) अंगणवाडी सेविका व मदतनीस मानधनी कर्मचारी असल्यामुळे शासन सेवेतील महिला कर्मचाऱ्यांप्रमाणे रजा देय नाहीत.

तथापि, केंद्र शासनाच्या दिनांक ९ जुलै, २०१० च्या पत्रानुसार अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना प्रसुती रजा १८० दिवस व गर्भपात रजा ४५ दिवस देण्यात येतात.

तसेच ग्रामविकास विभागाचे परिपत्रक दिनांक २९ एप्रिल, १९९१ अन्वये १६ दिवस किरकोळ रजा, १२ दिवस सार्वजनिक सुट्टया, ८ दिवस दिवाळीची सुट्टी व १६ दिवस उन्हाळयाची सुट्टी अशा एकूण ५२ दिवसांच्या पगारी सुट्टया देण्यात येतात.

v) अंगणवाडी सेविका व मदतनीस मानधनी कर्मचारी असल्यामुळे राज्य कामगार विमा योजना (इएसआय) लागू करता येत नाही.

vi) पूर्वप्राथमिक शिक्षणासाठीचा निधी अंगणवाडयांकडे वर्ग करण्याबाबत कोणतेही धोरण नाही.

vii) अंगणवाडी सेविका/मदतनीस यांना एल.आय.सी. योजनेअंतर्गत सेवानिवृत्तीनंतर एकरकमी लाभ देण्याबाबतच्या योजनेचा फेर विचार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. त्यावेळी संघटनेच्या सूचनांचा विचार केला जाईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**स्त्री रुग्णालय दारेफळ (ता.बसमत, जि.हिंगोली) येथे चुकीच्या पध्दतीने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्याबाबत**

**(७१) * ४९१४७ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली येथील स्त्री रुग्णालय दारेफळ (ता.बसमत, जि.हिंगोली) येथील साबेराबी शेख चांदसाब या महिलेच्या करण्यात आलेल्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेदरम्यान टाके मारण्याची सुई पोटात राहिल्याची घटना दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सुई पोटात राहिल्याने ऑपरेशनचे टाके वाळत नसल्याने त्या महिलेला पुन्हा माहे जानेवारी, २०१६ मध्ये रुग्णालयात दाखल करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) * साबेराबी शेख चांदसाव या कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यासाठी दि.२२ डिसेंबर, २०१५ रोजी स्त्री रुग्णालय, बसमत येथे दाखल झाल्या होत्या दि.२३.१२.२०१५ रोजी त्यांचेवर टाक्याची स्त्री नसबंदी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आली.

* दि.२९.१२.२०१५ रोजी त्यांचे टाके काढण्यांत आले. टाके काढल्यानंतर जखम पूर्ण करुन न आल्यामुळे उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी पुन्हा टाके घातले. ७ दिवस रुग्णालयात उपचारासाठी दाखल राहण्यांचा सल्ला दिला.

* दि.०२.०१.२०१६ रोजी सदर महिलेने कौटुंबिक अडचणीच्या कारणास्तव डॉक्टरांच्या सल्ल्यांविरुध्द रुग्णालयातून सुटी घेतली. त्यानंतर त्यांनी सदर जखमेवर खाजगी डॉक्टरांकडून उपचार करवून घेतले.

* खाजगी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार जखम मालीश करत असतांना दि.२१.०१.२०१६ रोजी त्यातून सुई निघाल्याचे सदर महिलेने जबाबात सांगितले.

* तथापि, पोटामध्ये सुई असल्याबाबत सोनोग्राफी, पोटाचा एक्सरे यासारख्या वैद्यकीय पुरावा असल्याचे त्रिसदस्यीय चौकशी समितीने केलेल्या चौकशीत आढळून आले नाही.

(३) होय.

* सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी दि.०१.०२.२०१६ रोजी वैद्यकीय अधिक्षक स्त्री रुग्णालय बसमत यांनी केली आहे.

* जिल्हा शल्य चिकित्सक हिंगोली यांनी नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीमार्फत दि. ०१.०३.२०१६ रोजी चौकशी करण्यात आलेली आहे.

(४) * सदरील दोन्ही चौकशी अहवाल मध्ये वैद्यकीय अधिकारी अथवा कर्मचारी दोषी आढळून आल्याचे निदर्शनास आले नसल्याने, कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

* तथापि भविष्यात कुटुंब नियोजन.

* शस्त्रक्रीयेनंतर जंतुसंसर्ग होणार नाही यासाठी योग्य ती दक्षता घेण्याविषयी संस्था प्रमुख, शस्त्रक्रिया करणारे वैद्यकीय अधिकारी, परिचारीका यांना जिल्हा शल्य चिकित्सक हिंगोली यांचेकडून सक्त सुचना देण्यात आली आहे.

* कुटुंब नियोजन नुकसान भरपाई योजने अंतर्गत कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया संदर्भिय प्रकरणासाठी जिल्हास्तरीय गुणवत्ता आश्वासन उपसमिती मार्फत खाजगी रुग्णालयात उपचारासाठी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती देण्यांविषयी कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**पणोरे (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) लघु पाटबंधारे योजनेबाबत**

**(७२) * ४६७६२ श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पणोरे (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) लघुपाटबंधारे योजनेस महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ निर्णय क्र.लपा/प्रमा/२०५४/६६८ दि. २८ मार्च, २०१३ अन्वये १०६७.२० लक्ष रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून संबंधित ठेकेदारास मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, राज्यामध्ये किंबहुना कोल्हापूर जिल्ह्यामध्ये गतवर्षी अत्यंत कमी प्रमाणात पाऊस पडल्याने पणोरे, (ता. पन्हाळा) परिसरामध्ये संभाव्य पाणीटंचाई सदृश्य स्थिती निर्माण झाली असून शेती व पिण्याचे पाण्याविंना नागरिकांची स्थिती अतिशय दयनीय झाली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर लघुपाटबंधारे तलावाचे ४० ते ५० टक्के काम पुर्ण झाले असून बांधकामाचे रु.२,३४,५४,५७१/- व भूसंपादनासाठी रु.५१,००,०००/- लाख इतकी देयके प्रलंबीत आहेत, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदर पणोरे लघू पाटबंधारे तलावाचे उर्वरीत काम पूर्ण करण्याकरीता प्रलंबित देयकासह उर्वरीत निधीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय.

(३) सदर लघुपाटबंधारे तलावाचे काम ३० टक्के पूर्ण झाले असून धरण बांधकामाचे रुपये २,३४,५४,१३८/- व भूसंपादनासाठी (मोजणी फी) रुपये ५१,०००/- इतकी देयके प्रलंबित आहेत.

(४) निधी उपलब्धतेनुसार कामाचे नियोजन करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हा परिषदेच्या पडून असलेल्या स्थावर मालमत्तेमुळे होत असलेल्या महसुली नुकसानीबाबत

**(७३) * ४७७६१ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा परिषदेची नागरी क्षेत्रातील स्थावर मालमत्ता विनावापर पडून असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेकडून सदर स्थावर मालमत्तेचे मुल्यांकन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) बुलढाणा जिल्हा परिषदेने शहरात पूर्वीपासून भाडे तत्वावर दिलेल्या व्यापारी गाळयांची संख्या किती व प्रत्येकी बाजार भावाप्रमाणे किती भाडे आकारणी करण्यात आलेली आहे,

(४) तसेच उपयोगात नसलेल्या एकुण क्षेत्रफळावरील जागेवर शहरातील मोक्याच्या ठिकाणी बी.ओ.टी. तत्वावर व्यापारी गाळे बांधकाम करुन जिल्हा परिषदेच्या उत्पन्नात वाढ करण्याबाबत जिल्हा परिषदेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय, अंशत: खरे आहे.

(३) बुलढाणा जिल्हा परिषदेचे शहरात एकूण ४ व्यापारी गाळे आहेत. जिल्हा परिषदेने सन १९९८ बसून बचत भवन गाळे क्र. १ व मासिक भाडे रु. ११२२/- गाळे क्र. २ चे मासिक भाडे रु ११३२/- गाळे क्र. ३ चे मासिक भाडे रु. १०६०/- व गाळे क्र ८ चे मासिक भाडे रु. ११०५/- आकारणी करुन भाडे तत्वावर देण्यात आलेली आहे.

(४) मौ. भाड येथील बी.ओ.टी. तत्वावर विकसित करावयाच्या जागेचे सुधारित अंदाजपत्रकीय आराखडे व नकाशे वास्तु विशारदे यांना चालु सुचीनुसार फेरसादर करण्याचे कळविण्यात आलेले आहे.

अ) बुलढाणा जिल्ह्यातील इतर ठिकाणी (मा.धाड वगळता) बी.ओ.टी. तत्वावर विकास करण्यासाठी शासन निर्णय क्र. संकुल २००६/प्र.क्र११९/पंग ७, दि.१/९/२००८ मध्ये नमुद असलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार वास्तुविशारद तथा प्रकल्प सल्लागार यांचे नियुक्ती (सूची) करण्यासंबंधी कार्यवाही जिल्हा परिषद, बुलढाणा मार्फत सुरु आहे.

-----------------

**राज्यात १०८ रुग्णवाहिका सेवा पुरविणाऱ्या बी.व्ही.जी. इंडिया प्रा लि. च्या रुग्णवाहिका दुरुस्ती अभावी बंद असल्याबाबत**

**(७४) * ४७८७४ डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मार्च २०१४ पासून १०८ रुग्णवाहिका सेवा पुरविणाऱ्या बी.व्ही.जी. इंडिया प्रा.लि. या कंपनीकडून सेवा पुरविताना रुग्णवाहिका दुरुस्ती अभावी बंद असणे व जुने टायर रिमोल्ड करुन वापरणे असे गंभीर प्रकार निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच किमान ६० रुग्णांना प्रत्येक महिन्यांत एका रुग्णवाहिकेद्वारे सेवा देणे अपेक्षित असताना या रुग्णवाहिका दुरुस्ती व टायर अभावी बंद असल्याने किमान ठरवून दिलेले काम या रुग्णवाहिकांद्वारे होत नाही, त्यामुळे रुग्णांकडे दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बंद असलेल्या रुग्णवाहिकेसोबतच चालू रुग्णवाहिका सुध्दा नांदेड जिल्ह्यातील शासकीय आयुर्वेदिक रुग्णालय परिसरात थांबविण्यात येऊन ग्रामीण रुग्णांना रुग्णवाहीका उपलब्ध नसल्याचे सांगण्यात येत आहे व या कंपनीद्वारे सेवा देण्यात टाळाटाळ करण्यात येत आहे, अशीच परिस्थिती पूर्ण राज्यात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कंपनीला संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, जिल्हा शल्य चिकित्सक, नांदेड यांनी नोटीस देऊनही बी.व्ही.जी. कंपनीच्या कार्यात सुधारणा होत नसल्यामुळे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, त्यामागची सर्वसाधारण कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

मे. बीव्हीजी इंडिया लि. कंपनीकडून सेवा पुरविताना रुग्णवाहिका या फक्त Servicing, Maintenance व वाहनांच्या अत्यावश्यक दुरुस्तीसाठी तात्पुरत्या कालावधीसाठी Service Centre मध्ये पाठविल्या जातात.

राज्यातील काही भागामधील तसेच अतिदुर्गम भागातील रस्त्यांची परिस्थिती खराब असल्यामुळे टायर लवकर खराब होतात.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकल्पासाठी करण्यात आलेल्या निविदा व करारामध्ये या प्रकारचे कोणतेही रुग्णांचे बंधन नाही. तथापि, मध्यवर्ती संपर्क कक्षामध्ये (टोल फ्री १०८) दुरध्वनीद्वारी अपात्कालीन वेद्यकीय सेवेसाठी आलेल्या प्रत्येक रुग्णास मोफत सेवा दिली जाते. आतापर्यंत ६ लाख ५० हजारापेक्षा जास्त रुग्णांना आपत्कालीन सेवा देण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्पाद्वारे नांदेड जिल्ह्यातील असणाऱ्या रुग्णवाहीका या रुग्ण घेवून आल्यानंतर फक्त तातडीचे जीवनावश्यक औषधे यांचा अतिरिक्त साठा घेण्यासाठी तसेच इतर आवश्यक औषधे घेण्यासाठी व तातडीचे रुग्णवाहिकेची तपासणी व दुरुस्तीसाठी शासकीय रुग्णालय परिसरात थांबविण्यात येवून तात्काळ रुग्णवाहिका पुर्वीच्या ठिकाणी पाठविण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या (दिंडोशी, मुंबई) २५ एकराच्या हरीतपट्टयातील खोदकाम करण्याच्या कामास हरित लवादाने स्थगिती दिल्याबाबत

**(७५) * ४४२४५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील गोरेगांव पूर्वेकडील, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या २५ एकराच्या हरीतपट्टयातील दिंडोशी परिसरात, खोदकाम करण्याच्या कामास, दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी राष्ट्रीय हरित लवादाने स्थगिती दिली, हे खरे आहे काय

(२) असल्यास, राष्ट्रीय हरित लवादाने, २५ एकराचा हरीतपट्टा हा वन विभागात येत नसतांनाही स्थगिती देण्याची कारणे काय आहेत

(३) तसेच, सदरहू २५ एकराच्या हरित पट्टयात झाडे, टेकडया नष्ट होत असलेल्या पर्यावरणाच्या हानीबाबत राज्य शासनाने दखल घेऊन अद्याप याबाबत कोणती कार्यवाही केली आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) राष्ट्रीय हरित लवादाने दिंडोशी सर्वे क्रमांक २३९ च्याबाबत परिसरात डोंगर, उत्खनन, वृक्षतोड व वनजमीन वळतीकरणास मनाई करुन सदर क्षेत्राला संरक्षण देऊन "जैसे थे" परिस्थिती ठेवण्याबाबत दिनांक १३.०१.२०१६ रोजी आदेश पारित केले आहेत.

(२) सदरचे क्षेत्र संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाबाहेरचे खाजगी क्षेत्र आहे. तथापि सदर क्षेत्र संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रात येत असल्याने सदरची स्थगिती देण्यात आली आहे.

(३) सदर क्षेत्र हे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या बाहेरील खाजगी क्षेत्र असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदरचे क्षेत्र खाजगी क्षेत्र असल्याने वनविभागामार्फत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाथरी (जि.चंद्रपूर) परिसरात वाघांच्या चार बछड्यांचा झालेला मृत्यू

**(७६) * ४३४६० श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.दिलीप वळसे-**

**पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील पाथरी परिसरात भुकेने तडफडून वाघांच्या चार बछड्यांचा मृत्यू झाल्याची घटना माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त चार बछडयांपैकी दोन बछड्यांचा मृत्यू पाथरी व सिंदेवाही येथे पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने उपचाराअभावी झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकाचवेळी चार पिल्ल्यांना जन्म देणारी वाघीणही बेपत्ता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या बछड्यांच्या मृत्युची चौकशी करण्याचे आदेश मा. मंत्री, वने यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) चंद्रपूर जिल्ह्यातील पाथरी परिक्षेत्रामध्ये दिनांक २७.१२.२०१५ रोज ४ बछड्यांचा मृत्यू पोट रिकामे असल्यामुळे व तीव्र थंडीचे वातावरणामुळे झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) उपरोक्त ४ बछड्यापैकी तीन बछडे मृतावस्थेत आढळले तर गंभीर आजारी स्थितीतील वाघाचे बछड्यास उपचाराकरीता पशुवेद्यकिय दवाखाना पाथरी, येथे अद्ययावत सुविधा नसल्याकारणाने पशुधन विकास अधिकारी ह्यांच्या सल्ल्यानुसार सदर बछड्यास चंद्रपूर येथील जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय येथे नेण्यात आले. उपचारादरम्यान बछड्याचा मृत्यू झाला.

(३) व (४) हे खरे आहे.

(५) दिनांक २७.१२.२०१५ रोजी वाघाचे ४ बछड्यांचे मृत्यूचे कारण काय व पिल्लांची आई बेपत्ता होणे या संबंधी सर्व समावेशक चौकशी करण्यास विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर (प्रादेशिक वनविभाग) यांचे अध्यक्षतेखाली १२ जणांचे समितीचे गठन करण्यात आले आहे. या समितीमार्फत चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**जळगाव जिल्ह्यामध्ये शालेय विद्यार्थ्यांना कुष्ठरोगाची लागण झाल्याबाबत**

**(७७) * ४९३०४ श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय कुष्ठरोग निवारण कार्यक्रमातंर्गत करण्यात आलेल्या शालेय आरोग्य तपासणीत २७ शालेय विद्यार्थ्यांना कुष्ठरोगाची लागण झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, कुष्ठरोगाला आळा घालण्याच्या दृष्टीने तसेच ज्यांना कुष्ठरोग झाला आहे, त्यांच्याकडून आजाराचा फैलाव होवून इतरांना लागण होवू नये म्हणून शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) जळगाव जिल्ह्यांमध्ये दरवर्षाप्रमाणे माहे जूलै २०१५ ते सप्टेंबर २०१५ या कालावधीमध्ये शाळा सर्वेक्षण घेण्यात आले त्या मध्ये जिल्ह्यातील एकूण ६४१ शाळांच्या तपासणी मध्ये १,३३,४०० विद्यार्थ्यांची कुष्ठरोगविषयक तपासणी केली असून त्यामध्ये १८ असांसर्गिक रुग्ण व ३ सांसर्गिक रुग्ण असे एकूण २१ रुग्ण आढळून आले असून १८ मुलांवर असांसर्गिक कुष्ठ रुग्णांसाठीचा बहूविध औषधोपचार डिसेंबर, २०१५ ते फेब्रुवारी, २०१६ दरम्यान पूर्ण करण्यात आला असून उर्वरित ३ सांसर्गिक रुग्णांना बहुविध औषधोपचार सुरु आहेत. सर्व रुग्णांची तपासणी दरमहा करण्यात येत आहे.

(३) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार महाराष्ट्र राज्यात दरवर्षी जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये शालेय सर्वेक्षण, व इतर कालावधीत विशेष कृष्ठरोग शोध व उपचार मोहिम आरोग्य सेवेतील सर्व कर्मचारी व आशा मार्फत घरोघर भेटी देऊन आरोग्य शिक्षण देवून तपासणी करण्यात येते. शोधलेल्या सर्व कुष्ठरोगाची वैद्यकिय अधिकाऱ्यांमार्फत रोग निदान करुन बहुनिध औषधोपचार सर्व शासकिय, निमशासकिय दवाखान्यांमध्ये मोफत देण्यात येतो. कुष्ठरोग हा मायक्रोबॅक्टेरीयन लेप्री या जिवाणूमुळे होणारा आजार आहे. याचा अधिशयन

काळ ३ ते ५ वर्ष इतका असून उपचार न घेतलेल्या सांसर्गिक रुग्णांच्या शिंकण्यातून, खोकल्यातून आणि श्वासोच्छवासाद्वारे १० ते १५ टक्के रुग्ण रोग प्रसार करतात. कुष्ठरोगासंबंधी रोगप्रतिबंधक उपायाकरिता कुठल्याही प्रकारची प्रतिबंधात्मक लस नाही. कुष्ठरोगास आळा घालण्याकरिता लवकरात लवकर निदान व नियमित बहुविध औषधोपचार हा एकमेव उपाय आहे. बहूविध औषधोपचाराने रुग्ण १०० टक्के विनाविकृती बरा होतो.

सर्वसामान्य जनतेला कुष्ठरोग विषयक शास्त्रीय ज्ञान प्राप्त होवून कुष्ठरुग्णाने स्वत:हून तपासणीसाठी जवळच्या आरोग्य केंद्रात यावे या करीता आरोग्य शिक्षण व जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यामध्ये रेली, शालेय प्रश्नमंजुषा, आरोग्य कर्मचारी व वैद्यकीय अधिकारी यांची कार्यशाळा, समाजातील विविध स्तरासाठी गटचर्चा या बरोबरच कुष्ठरुग्णांसाठी विकृती प्रतिबंध शिबीरे, आरोग्य कर्मचारी व वैद्कीय अधिकारी यांचे कुष्ठरोग प्रशिक्षण सत्र, आरोग्य कर्मचाऱ्यांद्वारे आरोग्य शिक्षणाधारित घरोघर व्यक्ती संपर्क अभियान राबविणे व मोक्याच्या ठिकाणी प्रदर्शन, बॅनर्स, पोस्टर्स, होर्डिंग, भिंतीवरील म्हणी, हस्तपत्रिका वाटप करणे इ. उपक्रम घेतले जातात. आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांमार्फत नियमित भेटीद्वारे कुष्ठरोगाबाबतच्या संशयिताची तपासणी व वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्फत निदान निश्चिती केली जाते. आरोग्य शिक्षण व जनजागृतीद्वारे स्वत:हुन तपासणीसाठी आलेले रुग्ण, प्रा. आ. केंद्र व इतर रुग्णालयात बाह्यरुग्ण विभागात तपासणीद्वारे सापडलेले रुग्ण सर्वसाधारण आरोग्य सेवेतील कर्मचाऱ्यांनी व शहरी विभागात कुष्ठरोग कर्मचाऱ्यांनी शोधलेल्या संशयीतून निदान निश्चित झालेले रुग्ण, विशेष सर्वेक्षणामध्ये सापडलेले रुग्ण आणि वार्षिक कुष्ठरोग शोध मोहिमेतून शोधण्यात आलेले नविन रुग्ण यांना त्वरीत बहुविध औषधोपचाराखाली आणण्यात येते.

-----------------

**बाबुर्डी (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील ग्रामपंचायतीमध्ये शासकीय योजनांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(७८) * ४१९०० श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाबुर्डी (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील ग्रामपंचायतीत १२ व १३ व्या वित्त आयोगानुसार ग्रामनिधी, पाणी पुरवठा योजना, अन्न सुविधा इत्यादी विविध कामांसाठी या योजनेंतर्गत मिळालेल्या सुमारे ३२ लाख ६२ हजार

रुपयांच्या शासकीय निधीचा तत्कालीन ग्रामसेवक व सरपंच यांनी संगनमताने अपहार केल्याचे दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले व संबंधित दोषींकडून सदरहू रक्कम वसूल करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) या प्रकरणाची पंचायत समिती, पारनेर मार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशीत तत्कालीन सरपंच श्री. रमेश हरीभाऊ गवळी व तत्कालीन ग्रामसेवक राजु उमाजी पटेकर दोषी असल्याचे आढळून आले आहेत. तथापि, संबंधित दोषींकडून सदर रक्कम अद्याप वसूल करण्यात आलेली नाही.

(३) तत्कालीन दोषी सरपंच श्री. रमेश हरीभाऊ गवळी व ग्रामसेवक श्री. राजू उमाजी पटेकर यांच्याविरुध्द रु.३२,६२,०६८/- इतक्या रकमेचा अपहार केल्याबाबत, सुपा पोलीस स्टेशन येथे एफ.आर. आय. १९८/२०१५ अन्वये कलम ४०७, ४२०, २०१, ३४ नुसार दि. २०.१२.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून तत्कालीन ग्रामसेवक श्री. राजू उमाजी पटेकर यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## एटापल्ली ग्रामीण रुग्णालयातील (जि.गडचिरोली) वैदयकीय अधिकाऱ्याला निलंबित करण्याच्या मागणीबाबत

**(७९) * ३९८१५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तुमरगुडा (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) येथील गरीब आदिवासी श्री.तोंदे मुरा पोटावी याचा एकुलता एक संदीप नावाचा दहा वर्षीय मुलाचे दिनांक १३ जानेवारी २०१६ रोजी एटापल्लीच्या ग्रामीण रुग्णालयात मृत्यूमुखी होऊन ग्रामीण रुग्णालयाने रुग्णवाहिका उपलब्ध करुन न दिल्याने मुरा पोटावी याने मृत्यदेह खांद्यावर घेऊन पत्नीसह हंबरडा फोडत सात किलोमिटर एटापल्लीवरुन आपल्या गावी घेऊन गेल्याची संतापजनक व धक्कादायक माहिती दिनांक १४ जानेवारी २०१६ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त गंभीर व संतापजनक प्रकाराची माहिती नागरिकांना होताच एटापल्ली ग्रामीण रुग्णालयातील वैदयकीय अधिकाऱ्यास निलंबित करण्याबाबतची मागणी तसेच एटापल्ली बाजारपेठ बंद ठेवून चक्काजाम आंदोलन केल्यानंतरही दोषींवर कारवाई झालेली नसल्यामूळे दिनांक २० जानेवारी, २०१६ पासून नागरिकांनी बेमूदत उपोषण सुरु केले होते, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास या गंभीर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) असल्यास, सदर प्रकरणी नागरिकांनी केलेल्या सहा मागण्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय एटापल्ली, जि.गडचिरोली येथे दि.१२.०१.२०१६ रोजी संदीप तोंदे पोटावी, वय १० वर्षे (मुलगा) रा. तुमरगुंडा, ता. एटापल्ली हा रुग्ण भरती झाला होता. सदर रुग्णांवर आवश्यक औषधोपचार करण्यात आला असून दि.१३.०१.२०१६ रोजी दुपारी १ वाजता पुन्हा सदर रुग्णची प्रकृती बिघडल्याने सदर रुग्णावर पुन्हा उपचार सुरु करण्यात आले. संध्याकाळी रुग्णाची प्रकृती गंभीर झाल्याने संदर्भित करणे आवश्यक होते. तथापि, रुग्णाच्या नातेवाईकांनी त्यास नकार दिला व स्वत:च्या जबाबदारीवर संमतीपत्र लिहून देऊन रुग्णास घरी नेले. दिनांक १३.०१.२०१६ रोजी मुलाची प्रकृती आजार गंभीर झाल्याने मृत्यू झाला.

(२) हे खरे आहे.

(३) प्रस्तुत घटनेची दि.१५.०१.२०१६ रोजी शरीर विकृती शास्त्रज्ञ, वर्ग-१, सामान्य रुग्णालय, गडचिरोली यांनी चौकशी केली तसेच दि.१६.०१.२०१६ रोजी जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, गडचिरोली व दि.१७.०१.२०१६ रोजी उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांनी चौकशी केली.

प्रस्तुत घटनेबाबत चौकशी अहवालात नमूद वस्तुस्थितीवरुन वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी राहत नसल्याबाबत, अनधिकृत गैरहजर असणे, लोकप्रतिनिधींशी वागणूक चांगली नसणे तसेच उपचारासाठी दाखल झालेल्या रुग्णांना व्यवस्थितपणे समुपदेशन न करणे इत्यादी बाबी निदर्शनास आल्याने सदर घटनेस जबाबदार वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय अधिकारी यांना निलंबित करण्यात आले आहे.

(४) सदर घटनेच्या अनुषंगाने वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय अधिकारी यांना निलंबित करण्यात आले आहे. नागरिकांकडून वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी होती. सदर मागणी पूर्ण करण्याकरीता ग्रामीण रुग्णालय एटापल्ली येथील वैद्यकीय अधिकारी यांची दोन्ही ही रिक्त पदे भरण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**घोडबंदर रोड (जि.ठाणे) येथील सुरज पार्कने वन विभागाची एक हेक्टर जमिन बळकाविल्याबाबत**

**(८०) * ४४६९३ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर रोड (जि.ठाणे) येथील सुरज पार्कने वन विभागाची एक हेक्टर जमिन बळकाविल्याबाबत वन विभागाने केलेल्या सर्वेक्षणात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत तद्‍नुसार अतिक्रमण काढून टाकण्याबाबत विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) सदर अतिक्रमण काढून टाकले नसल्यास याप्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) घोडबंदर रोड (जि.ठाणे) येथील सुरज पार्कने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या अंदाजे एक हेक्टर जमिनीवर अतिक्रमण केल्याचे तालुका निरिक्षक भूमी अभिलेख यांच्या द्वारे (TILR) केलेल्या सर्वेक्षणात निदर्शनास आले.

(२) प्रकरणी वनविभागाने सुरज वॉटर पार्कचे व्यवस्थापक जयेश मुच्छाला यांचे विरुध्द दिनांक ६.०१.२०१० रोजी गुन्हा नोंदविला , तसेच माहे फेब्रुवारी, मार्च, २०११ मध्ये सदरचे अतिक्रमण निष्कासित करण्यात आले. सदर निष्कासनासाठी झालेला खर्च सुरज वॉटर पार्क यांचे व्यवस्थापकाकडून वसूल करण्यात आला आहे.

संबंधिताविरुध्द प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय, क्र. १, ठाणे यांचे न्यायालयात फौजदारी प्रकरण दाखल करण्यात आले होते, मात्र न्यायालयाने दिनांक १६.०७.२०१४ रोजी पारित केलेल्या आदेशान्वये आरोपीची निर्दोष मुक्तता केली आहे.

या व्यतिरिक्त सुरज वॉटर पार्क यांचे खाजगी क्षेत्राच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या संयुक्त हद्दीवर सलोह कॉक्रीटची भिंत बांधण्यात आली आहे.

(३) सुरज वॉटर पार्कने झालेले अतिक्रमण माहे फेब्रुवारी, मार्च, २०११ मध्ये निष्कासित करण्यात आलेले असल्याने संबंधितांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## राज्यातील अनाथ निराधार बालकांचे गेल्या दोन वर्षाचे अनुदान अदयापही शासनाने न दिल्याबाबत

**(८१) * ३९७५८ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सरदार**

**तारासिंह (मुलुंड), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.विजय औटी (पारनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.बसवराज पाटील (औसा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.धैर्यशील पाटील (पेण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ८० हजार अनाथ निराधार बालकांचे गेल्या दोन वर्षाचे १९६ कोटी आणि चालू वर्षाचे सुमारे ८० कोटी असे २३६ कोटी रुपयांचे अनुदान अदयापही शासनाने दिले नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) तसेच बीपीएल दराने वितरीत करण्यात येणारा गहू, तांदळाचा पुरवठा बंद करण्यात आल्याने राज्यातील अनाथ व निराधार बालकांवर उपासमारीची वेळ आली, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त अनुदान बंद करण्याची कारणे काय आहेत व सदर अनुदान तातडीने देण्याबाबत कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत

(४) असल्यास, उपरोक्त अनुदान देण्याबाबतची सदय:स्थिती काय आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही,

तथापि, पुर्वीचे प्रलंबित व चालू वर्षाचे अनुदान अदा करण्यासाठी एकुण रू.१७२.६८ कोटी एवढ्या तरतूदीची आवश्यकता आहे. सन २०१५-१६ या चालू आर्थिक वर्षात रू.१६.२३ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित झाला असून यापैकी रू.११.३६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. याशिवाय रू.७.३८ कोटी इतका निधी पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करण्यात येऊन संबंधितांना वितरीत करण्यात आला आहे. सबब, उर्वरित आवश्यक रक्कमेसाठी रू.१५६.४४ कोटी एवढया रक्कमेचा पुरवणी मागणी प्रस्ताव नियोजन विभाग व वित्त विभाग सादर करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

उपासमारीबाबतची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) अनुदान बंद करण्यात आलेले नाही, तथापि, प्रलंबित व नियमित अनुदान अदा करण्यासाठी नियोजन विभाग व वित्त विभागास पुरवणी मागणी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे .

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**नाशिक जिल्हयात साडेपाच कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या नव्या रुग्णालयाचा वापर गोदाम म्हणून होत असल्याबाबत**

**(८२) * ४६६५१ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात तब्बल साडेपाच कोटी रुपये खर्चून बांधलेल्या २०० खाटांच्या सुसज्य नव्या रुग्णालयाचा वापर सध्या गोदाम म्हणून होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच नाशिक जिल्हा रुग्णालयाच्या मुख्य इमारतीत अनेक कक्षांमध्ये अनेक रुग्ण जमिनीवर झोपून उपचार घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे २०० खाटांचे सुसज्य रुग्णालयाचा वापर रुग्णांकरिता न करण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच उक्त रुग्णालयांचा वापर केव्हापासून रुग्णांकरिता करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) इमारतीचा वापर सिंहस्थ कुंभमेळयासाठीच्या आरोग्य सेवांसाठी करण्यांत येत आहे. कुंभमेळयाचा कालावधी संपुष्टात आल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील गावांमध्ये स्मशानशेड नसल्याबाबत**

**(८३) * ४६६९२ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) येथील कोनोली, भित्तमवाडी, जोगमवाडी, कुंभारवाडी, झापाचीवाडी, पातारवाडी, खामकरवाडी, अस्वलवाडी, मालेवी, पाचेवाडी, वळवंटवाडी, मालपवाडी येथे स्मशानशेड नसल्याचे माहे १२ जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्मशानशेड नसल्याने प्रेत उघड्यावर व पावसाळयात पावसामध्ये प्रेत जाळावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हा परिषद कोल्हापूरकडे वारंवार मागणी करुन देखील कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

(३) हे खरे नाही. सदर वाड्यांमध्ये स्मशानशेड बांधण्याकरीता जागा उपलब्ध नसल्याने उक्त प्रकरणी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पाचगाव रामपूर सुर (ता.मोहाडी, जि.भंडारा)**
**नदीवर पुल वजा बंधारा उभारण्याबाबत**

**(८४) * ४७५४० श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील मोहाडी तालुक्यातील पाचगाव रामपूर सुर नदीवर पुल वजा बंधारा नसल्याने लांबचा प्रवास करावा लागत असल्याने बंधारा उभारण्याबाबतची मागणी ग्रामस्थांनी, लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१४ पासून वारंवार जलसंपदा विभाग यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) सुर नदीवर बंधा-याच्या शृखंलेचा अभ्यास क्षेत्रिय स्तरावर करण्यात आला. सूर नदीचे काठ उंच नसल्यामुळे व नदीचा उतार तीव्र असल्याने बंधारा स्थळावर अत्यल्प पाणीसाठा निर्माण होतो. तसेच नदीपात्रात खोलवर वाळू असल्याने बंधाऱ्यास आवश्यक पायवा कमी खोलीवर मिळत नाही व यामुळे बंधा-याची किंमत बरीच येऊन बंधारे शासन निर्धारित मापदंडात असफल ठरत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील शांतीसदन महिला सुधारगृहातील ब्रम्हदेशी**
**महिला गरोदर असल्याचे वैद्यकीय तपासणीत निदर्शनास आल्याबाबत**

**(८५) * ४४४०४ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालकल्याण विभागाच्या उल्हासनगर मधील शांतीसदन महिला सुधारगृहातील २३ वर्षीय ब्रम्हदेशी महिला गरोदर असल्याचे वैद्यकीय तपासणीत निदर्शनास आल्यानंतर मंत्रालयीन व विभागीय स्तरावर करण्यात

आलेल्या उच्च स्तरीय चौकशीनंतर हिल लाईन पोलीस ठाण्यात नंदा घोडेराव व तिला सहकार्य करणाऱ्यांविरोधात ६ महिन्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आल्याची बाब दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी पूर्ण झाल्यानंतर सुधारगृहाच्या अधिक्षिका नंदा घोडेराव यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यास ६ महिन्यांचा कालावधी लागण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) तसेच नंदा घोडेराव यांचेवर यापूर्वी अनेक वेळा निलंबनाची कारवाई करण्यात येऊन महिला व बालविकास कल्याण विभागाच्या मंत्री महोदयांनी नंदा घोडेराव हिला तात्काळ निलंबित करुन गुन्हा दाखल करण्याची शिफारस करुनही संबंधित नंदा घोडेराव हिच्याविरुध्द कारवाई करण्यास हेतूत: विलंब करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) मंत्रालयीन व विभागीय स्तरावर करण्यात आलेल्या चौकशीमध्ये शांतीसदन या शासकीय महिला सुधारगृहातील अन्य किती कर्मचारी व अधिकारी चौकशीत दोषी आढळले, त्यांचेविरुध्द तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या संबंधीत सर्व शासकीय व खाजगी अधिकारी व व्यक्तींविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय पुणे यांनी दि.१७/७/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, ठाणे यांनी दि.१९/७/२०१५ रोजी वरिष्ठ पोलीस निरिक्षक, हिललाईन पोलीस ठाणे, जि.ठाणे यांची भेट घेऊन दि.२०/७/२०१५ रोजी सविस्तर तक्रार दिली होती. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, ठाणे यांनी पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांनाही दि.२३/७/२०१५ रोजी गुन्हा दाखल करुन घेणेबाबत संबंधितांना आदेश देणेबाबत विनंती केली होती.

तद्नंतर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, ठाणे कार्यालयाने दि.१४/०८/२०१५ व दि.१५/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये गुन्हा दाखल करुन घेणेबाबत पोलीस स्टेशनला पत्र दिले होते. तसेच प्रत्यक्ष जाऊन विचारणा केली होती.

सदर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरिक्षक यांनी गुन्हा दाखल करुन घेण्यासाठी दि.६/१२/२०१५ व दि.७/१२/२०१५ रोजी पोलीस स्टेशनला उपस्थित राहणेबाबत दूरध्वनीवरुन कळविले. त्यानुसार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, ठाणे यांनी दि.७/१२/२०१५ व दि.८/१२/२०१५ रोजी पोलीस स्टेशनमध्ये जावून गुन्हा दाखल केला असून त्याचा गु.रु.नं.३६९/१५ दि.८/१२/२०१५ असा आहे.
(३) श्रीमती नंदा घोडेराव यांना शासन आदेश दि.१७.७.२०१५ अन्वये निलंबित करण्यात आलेले आहे. गुन्हा दाखल करण्यासाठी वेळोवेळी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, ठाणे यांनी वरीलप्रमाणे पत्र व्यवहाराद्वारे व पाठपुरावा करुन गुन्हा दाखल करण्याबाबतची कार्यवाही केली आहे.

गुन्हा दाखल करण्यास विलंब झालेला नसल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) विभागीय स्तरावर करण्यात आलेल्या चौकशीमध्ये शांतीसदन या शासकीय महिला सुधारगृहातील अन्य कर्मचारी व अधिकारी चौकशीत दोषी असल्याचे निदर्शनास आले नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात स्वाईन फ्ल्यूवर प्रतिबंधात्मक अशी कोणतीच कार्यवाही होत नसल्याबाबत

**(८६) * ४२१६७ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वाईन फ्ल्यूने माहे जानेवारी, २०१५ पर्यंत ५८६ जणांचा मृत्यू झाला तर पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या ५९०० इतकी असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, परंतु यावर प्रतिबंधात्मक अशी कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच माहे डिसेंबर, २०१५ च्या सुरुवातीपासून हवेतील गारवा प्रचंड वाढल्यामुळे स्वाईन फ्ल्यू विषाणूंच्या प्रसारासाठी हे वातावरण अतिशय पोषक असून माहे जानेवारी, २०१६ मध्येही हे वातावरण कायम राहिल्यामुळे राज्यात संशयित रुग्णांची संख्या वाढली असून माहे जानेवारी, २०१६ मध्ये या आजाराने पाच जणांना जीव गमवावा लागला असून दिनांक २९ जानेवारी, २०१६ मध्ये ४४ संशयित रुग्णांची नोंद झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

- राज्यात माहे जानेवारी, २०१५ ते डिसेंबर, २०१५ अखेर ९०५ मृत्यू व ८५८३ पॉझिटिव्ह रुग्ण होते.
- राज्यात सप्टेंबर, २०१५ मध्ये १३५ मृत्यू व ११३० पॉझिटिव्ह रुग्ण होते. स्वाईन फ्ल्यूवर प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक कार्यवाही शासनामार्फत करण्यात आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

- डिसेंबर, २०१५ पासून स्वाईन फ्ल्यू रुग्ण व मृत्यू मध्ये या आजाराची माहे वार आकडेवारी पाहिली असता तुलनात्मक दृष्ट्या घट होताना दिसून आले आहे.
- जानेवारी २०१६ या महिन्यात स्वाईन फ्ल्यूमूळे ५ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. तर २९ जानेवारी, २०१६ रोजी स्वाईन फ्ल्यूच्या ११ संशयित रुग्णांना राज्यातील विविध रुग्णालयामध्ये भरती करण्यात आले.

(३) स्वाईन फ्ल्यू प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी मुख्यत्वे खालील कार्यवाही करण्यात येत आहे.

- फ्ल्यू सदृश्य रुग्णांचे नियमित सर्वेक्षण.
- रुग्णांवर वर्गीकरणानुसार विनाविलंब उपचार.
- उपजिल्हा रुग्णालयात तसेच वैद्यकीय महाविद्यालय यांच्या रुग्णालयात विलगीकरण कक्षाची स्थापना.
- उपचार सुविधा असणाऱ्या सर्व खाजगी रुग्णालयांना स्वाईन फ्ल्यू उपचाराची मान्यता.

- आर्थिकदृष्ट्या दुर्बळ गटातील स्वाईन फ्ल्यू रुग्णांना व्हेंटीलेटरवरील वैद्यकीय खर्चाची शासनामार्फत प्रतिपूर्ती करण्यासाठी मुख्यमंत्री निधीतून तरतुद.
- राज्यातील ४ शासकीय प्रयोगशाळा मार्फत मोफत निदान सुविधा.
- खाजगी प्रयोगशाळांना मान्यता देण्यासाठी तज्ञ समित्यांची स्थापना.
- ऑसेलटॅमीवीरचा पुरेसा साठा.
- दुसऱ्या व तिसऱ्या तिमाहीतील गरोदर मातांसोबतच मधुमेह, उच्च रक्तदाब असणाऱ्या व्यक्ती व आरोग्य कर्मचारी यांना स्वाईन फ्ल्यू प्रतिबंधक लसीकरण.
- महाराष्ट्र साथरोग प्रतिबंध व नियंत्रण तांत्रिक समितीची स्थापना.
- अन्न व औषध विभागामार्फत सर्व एक्स शेड्युल्ड धारक औषध दुकानांमध्ये ऑसेलटॅमीवीर उपलब्ध.
- शासकीय आणि खाजगी डॉक्टरांच्या स्वाईन फ्ल्यू कार्यशाळा.
- फ्ल्यू प्रतिबंधासाठी जनतेचे आरोग्य शिक्षण.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वाळवा तालुक्यात (जि.सांगली) वारणा खोरा अपारंपारिक ऊर्जा संस्थेने बायोगॅस सयंत्र पुरविण्याच्या कामात केलेला गैरव्यवहार**

**(८७) * ४८३३९ श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा), श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळवा (जि.सांगली) तालुक्यात वारणा खोस अपारंपारिक ऊर्जा निर्माण संस्था, ऐतवडे खु. या संस्थेने बायोगॅस सयंत्र पुरविण्याचे काम जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून पुर्ण करताना कन्सलटन्सी म्हणून प्रति सयंत्र रुपये १२००/- ची रक्कम घेऊन त्याव्यतिरिक्त शेतकऱ्यांची रुपये ९,०००/- ची सबसिडी ही घेतली असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेने मागील १० वर्षात बायोगॅस सयंत्राची कोट्यावधी रुपयांची सबसिडी अशाचप्रकारे गैरमार्गाने घेवून स्थानिक शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांची फसवणूक करण्याऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) नाही.

राष्ट्रीय बायोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत बायोगॅस सयंत्राची उभारणीकामी टर्न की वर्कर तथा स्वयंसेवी संस्थांना सहभागी करण्यात येते. सन २०१४-२०१५ पासून टर्न की तत्वावर कामे सोपविल्यास, सदर संयत्रांच्या देखभालीसाठी ५ वर्ष हमी कालावधी करिता टर्न की फी रक्कम रुपये १,५००/- ही ५ हप्त्यात देण्यात येते. २ ते ६ घन मीटर आकारमानाच्या बायोगॅस सयंत्र उभारणाऱ्या सर्व साधारण लाभार्थ्यांस रुपये ९,०००/- व अनुसूचित जाती/जमाती लाभार्थ्यांस रुपये ११,०००/- इतके अनुदान सयंत्रधारक लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जाफ्राबाद (जि.जालना) तालुक्यात टेंभूर्णी गटामध्ये राष्ट्रीय पाणलोट कार्यक्रमातंर्गत कामात झालेला गैरव्यवहार

**(८८) * ४७३३५ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जाफ्राबाद तालुक्यात (जि.जालना) टेंभूर्णी गटामध्ये सन २००७ मध्ये राष्ट्रीय पाणलोट कार्यक्रमातंर्गत कामे झालेली असतांना त्याच गावामध्ये परत एकात्मिक पाणलोट व्यवस्थापनाची (आय.ब्ल्यू.एम.पी) या योजनेतून कामे दाखवून बनावट देयके काढून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जलसंधारणाच्या कामात झालेल्या अपहार प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या तालुका कृषी अधिकारी, मंडळाधिकारी व अन्य दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने चौकशी केली असता, गैरव्यवहार झाला नसल्याचे आढळले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील विभागीय संदर्भसेवा रुग्णालयातील विविध समस्यांबाबत

**(८९) * ४१७२७ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथिल विभागीय संदर्भसेवा रुग्णालयात कर्करोगाच्या निदानासाठी आवश्यक असणारे सिटीस्कॅन मशिन, कर्करोगावरील किरणोत्सराची यंत्रणा बंद पडलेली आहे तसेच मूत्रपिंड प्रत्यारोपानासाठी आवश्यक मनुष्यबळ व यंत्र सामुग्री अभावी हा विभाग कार्यान्वित न होणे व रुग्णालयातील कार्यरत असलेले अपुरे मनुष्यबळ व विविध समस्यांनी ग्रस्त असलेले रुग्णालय  वैद्‌यकीय सेवा मिळण्यापासून रुग्ण वंचित राहत आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास याबाबत शासनाने सखोल चौकशी केलेली आहे काय चौकशीत काय आढळून आलेले आहे

(३) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे

(४) अद्‌याप कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अशंत: खरे आहे,

सी.टी.स्कॅन यंत्र एक्सरे टयुब निकामी झाल्याने बंद आहे सदर यंत्र दुरुस्तीच्या प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे. मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी विशेषज्ञ डॉक्टर (नेफ्रोलॉजीस्ट) उपलब्ध होताच मुत्रपिंड विभाग सुरु करण्यात येईल. तसेच मानसेवी अतिविशिष्टतज्ञ तसेच कंत्राटी अधिपरिचारीका यांच्या नियुक्त्या केल्या आहेत. त्यांच्या मार्फत हृदयरोग, कॅन्सर, मुत्रपिंड विकाराच्या सेवा रुग्णांना मिळत आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियान योजनेंतर्गत झालेल्या कामांचे ऑडीट त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यात येणार असल्याबाबत**

**(९०) * ४९८२० श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियान योजनेंतर्गत जिल्ह्यातील २०० गावांमध्ये सात हजारांहून अधिक कामे करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलयुक्त शिवार अभियान योजनेंतर्गत जिल्ह्यात मोठया प्रमाणावर झालेल्या कामांचे ऑडीट त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यात येणार असून या कामामध्ये गंभीर चुका आढळून आल्यास संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे जिल्ह्यात झालेल्या जलयुक्त शिवार अभियान योजनेंतर्गत झालेल्या कामांचे ऑडीट करण्यात आले आहे काय,

(४) असल्यास, जलयुक्त शिवार अभियानाच्या कामात गंभीर चुका आढळणा-या ठेकेदार व अधिका-यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

जानेवारी अखेर पूणे जिल्हयातील २०० गावांमध्ये ४४३३ कामे हाती घेण्यात आलेली आहेत. त्यापैकी ३३४६ कामे पूर्ण झालेली असून ११२७ कामे प्रगतीपथावर आहेत. सदर कामावर रु.८५.६९ कोटी खर्च झालेला आहे.

(२) व (३) अद्याप लेखा परिक्षण करण्यात आलेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती विभागात सिंचन क्षमता वाढवण्यासाठी तेथील प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**

**(९१) * ४८०४५ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागात राज्य सरासरीपेक्षा कमी पाणी उपलब्ध असल्याने तापी खोऱ्यातील अतिरिक्त पाणी मागणीचा प्रस्ताव तयार करण्याविषयी मा.राज्यपालांनी दिलेल्या निर्देशांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तापी खोऱ्यातील ३३ टीएमसी पाणी उपलब्ध असूनही तापी खोऱ्यातील पाण्यापासून पश्चिम विदर्भ वंचित राहत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अमरावती विभागात सिंचन क्षमता वाढवण्यासाठी या प्रकल्पांना तातडीने प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोलंग्री, वाकडी, शिवणी (जि.बीड) येथे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(९२) * ४८४३६ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हयातील गोलंग्री, वाकडी (ता.अंबेजोगाई, जि.बीड) शिवणी येथे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सिंचन विहीर व शेततळयांच्या कामात मोठयाप्रमाणात अनियमितता होवून शासनाच्या लाखो रक्कमेचा अपहार झाल्याची घटना दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(३) असल्यास, तदनुसार दोषी व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय. या प्रकरणी -

अ) ग्रामपंचायत गोलंग्री, ता.अंबाजोगाई आणि ग्रामपंचायत शिवणी, ता.बीड येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामामध्ये अनियमितता व अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

ब) मौजे वाकडी येथे अनियमितता आढळून आलेली नाही.

(३) सदर प्रकरणी दोषी संबंधितांविरुध्द खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

अ) ग्रामपंचायत गोलंग्री -

१) संबंधित ग्रामरोजगार सेवक, तांत्रिक अधिकारी व लाभार्थी यांच्यावर नेकनूर पोलीस ठाणे जि.बीड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे व तांत्रिक अधिकारी (कंत्राटी) यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे.

२) संबंधित तलाठी, गोलंग्री यांच्यावर कार्यवाही करण्यात येत आहे.

३) संबंधित ग्रामसेवक, कनिष्ट अभियंता, उप अभियंता, हजेरी सहाय्यक, लेखाधिकारी, कनिष्ठ सहाय्क यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित आहे.

४) सरपंच, गोलंग्री, यांच्याविरुध्द मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ प्रमाणे कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली अहे.

ब) ग्रामपंचायत शिवणी -

१) संबंधित ग्रामरोजगार सेवक, तांत्रिक अधिकारी (कंत्राटी) यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत.

२) संबंधित ग्रामसेविकेस निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हा परिषदेने घेतलेल्या आरोग्य सेवक व औषध निर्माण अधिकारी परीक्षेत झालेला गैरव्यवहार

**(९३) * ४१५९२ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा परिषदेने दिनांक २५ नोव्हेंबर, २०१५ रोजी घेतलेल्या आरोग्य सेवक व औषध निर्माण अधिकारी परिक्षेचा पेपर फुटल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य सेवक पदासाठी ७ लाख रुपये व औषध निर्माण अधिकारी पदासाठी १२ लाख रुपये दराने उत्तरपत्रिका विकण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली व येत आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषी व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) अद्यापपर्यंत कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय,

(२), (३) व (४) याप्रकरणी दोषीविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यांच्या तपासात पोलीस विभागाने सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार या गुन्ह्याशी संबंधीत असलेल्या एका कंत्राटी कर्मचाऱ्यास जिल्हा परिषद सेवेतून बडतर्फ करण्यात आले असून, उर्वरित जिल्हा परिषद सेवेतील ७ कर्मचाऱ्यांना निलंबीत करण्यात आले आहे. निलंबीत केलेल्या कर्मचाऱ्यावर विभागीय चौकशीचे कार्यवाही सुरु करण्यात आली आहे, तसेच त्यांच्यावर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत राज्यातील अंगणवाडी केंद्रांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(९४) * ४७१४७ श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत राज्यातील २८९८५ अंगणवाडी केंद्रांना शौचालयाची सुविधा उपलब्ध नसून अंगणवाडी केंद्रासाठी शासकीय जागा उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हा व प्रकल्प स्तरांवर पाठपुरावा करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कालबध्द कार्यक्रम आखला आहे काय व त्यासाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत राज्यामध्ये एकूण ९७५४४ अंगणवाडया कार्यरत आहेत. सदर ९७५४४ अंगणवाडी केंद्रापैकी ६८४९० अंगणवाडी केंद्रांना शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे तर उर्वरीत २९०५४ अंगणवाडी केंद्राना शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही.

(२) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी केंद्र इमारत बांधकाम शासन निर्णय दिनांक १५ जानेवारी, २०१० नुसार मंजूर करण्यात आलेल्या नमुना आराखडयानुसार करण्यात येते. सदर नमुना आराखडयात शौचालयाचा समावेश करण्यात आला आहे. सदर नमुना आराखडयानुसार अंगणवाडी केंद्राचे बांधकाम करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात होत असलेल्या बालविवाहांना प्रतिबंध करण्याच्या उपाययोजनांबाबत**

**(९५) * ३९८५९ अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), अ‍ॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०११ च्या जनगणेनुसार एकटया मराठवाडयात ६८ लाख १० हजार बालविवाह झाले असून, सन २०१० ते २०१३ या कालावधीत राज्यात सुमारे २४००० बालविवाह झाले असल्याची बाब माहे जानेवारी २०१६ च्या अंतिम सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि राज्यातील बालविवाहांना आळा घालण्यासाठी शासनाकडून आजतागायत कोणत्या ठोस उपाययोजना करण्यात आल्या आहेत वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) तथापि, बाल विवाह रोखण्यासाठी शासन अधिसूचना दि. ३ जून, २०१३ अन्वये बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ च्या कलम १६ पोट कलम (१) अन्वये ग्रामसेवक यांना त्यांच्या ग्राम पंचायातीच्या क्षेत्रामध्ये बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून व कलम १६ च्या पोट कलम (२) अन्वये संबंधित ग्राम पंचयात क्षेत्रात नियुक्त केलेल्या अंगणवाडी सेविका या बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यांस सहाय्य करतील.

तसेच नागरी भागासाठी बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना व सहाय्यक बाल विकास प्रतिबंधक अधिकारी म्हणून मुख्यसेवीका यांना घोषीत करणे बाबतची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**मेळघाट व्याघ्र (ता.चिखलदरा, जि.अमरावती) प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत**

**(९६) * ४६५७३ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट व्याघ्र (ता.चिखलदरा, जि.अमरावती) प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करताना दिनांक २५ फेब्रुवारी, २००८, दिनांक ३ नोव्हेंबर, २०१२ आणि दिनांक १२ ऑक्टोबर, २०१५ अशा तीन विविध शासन निर्णयाद्वारे पुनर्वसन केले असून त्यामुळे त्यांच्यावर अन्याय होऊन सम न्याय नैसर्गिक तत्व वापरले न गेल्यामुळे आणि या पुनर्वसनात मिळालेल्या आर्थिक लाभ रकमेत डी.एफ.ओ. आणि सर्व्हेअर यांनी जबरदस्ती करुन आर्थिक पिळवणूक केल्यामुळे याबाबत तातडीने कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधीनी यांनी दिनांक ११ डिसेंबर, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री, महसूल मंत्री, वने मंत्री आणि आदिवासी विकास यांचेकडे लेखी पत्र लिहून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन उक्त प्रकरणी नव्याने पुर्नवसन करुन आर्थिक लाभ देणार आहे काय,

(३) तसेच पुर्नवसन कामात संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडून ह्यांनी अशा आशयाचे पत्र लिहून मागणी केली आहे.

मेळघाट व्याघ्र (ता.चिखलदरा, जि.अमरावती) प्रकल्पांतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील १ व अमरावती जिल्ह्यातील ८ गावांचे पुनर्वसन दिनांक २५ फेब्रुवारी, २००८, दिनांक ३ नोव्हेंबर, २०१२ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आले अहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील गावांचे पुनर्वसन करताना देण्यात आलेले लाभ हे त्या त्या वेळी प्रचलित शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना व जिल्हा पुनर्वसन अधिकारी तथा जिल्हासमितीच्या निर्णयानुसार देण्यात आलेले आहेत. पुनर्वसन कामामध्ये पुनर्वसन करण्यात येणाऱ्या लोकांवर जबरदस्ती करुन आर्थिक पिळवणूक करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जलयुक्त शिवार योजनेची सर्व कामे माहे मार्च अखेरपर्यंत पुर्ण करण्याबाबत

**(९७) * ४१८४२ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जलयुक्त शिवार योजनेची सर्व कामे माहे मार्च अखेरपर्यंत पुर्ण करण्याचे आदेश मा. मुख्यमंत्री यांनी संबंधित सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी दिलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी आतापर्यत कोणता निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जलयुक्त शिवार योजनेंतर्गत सन २०१५-१६ मध्ये निवडण्यात आलेल्या गावातील सर्व कामे मार्च अखेरपर्यंत पूर्ण करण्याची कार्यवाही सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्हयात 'झाडे लावा झाडे जगवा' ही मोहीम**
**अनेक गावांमध्ये ग्रामसेवकांनी न राबविल्याबाबत**

**(९८) * ४४७५९ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयात शासनाची 'झाडे लावा झाडे जगवा' ही मोहीम अनेक गावांमध्ये राबविण्यास ग्रामसेवकांनी अपयश आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी अपयश निदर्शनास येऊ नये यासाठी १५ लाखांचे उद्दीष्टही साडे आठ लाखांवर आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार सदरहू मोहीम अपयशी करण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही. शासनातर्फे "झाडे लावा झाडे जगवा" या नावाची केणतीही योजना किंवा मोहिम राबविण्यात येत नाही.

(२) नाही.

(३), (४) व (५) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०१५ च्या पावसाळ्याकरीता अकोला जिल्हयाकरीता ९ लक्ष वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट देण्यात आले होते. माहे फेब्रुवारी, २०१६ पर्यंत एकुण ४५,८०० इतके उद्दीष्ट साध्य झाले नाही अपेक्षित उद्दीष्ट साध्य न करणाऱ्या सर्व गट विकास अधिकारी यांना कारणे दाखवा नोटिस देऊन खुलासा मागविण्यात आला आहे.

---

## राज्यात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ग्रामीण रुग्णालयांची संकल्पना शासनाने अंमलात आणण्याबाबत

**(९९) * ५०१५४ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ग्रामीण रुग्णालयांची संकल्पना राज्य शासन अंमलात आणत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पोंभुर्णा (जि.चंद्रपूर) या तालुक्याची निर्मिती होऊन १६ वर्षाचा कार्यकाळ लोटला तरी या ठिकाणी ग्रामीण रुग्णालय नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी ग्रामीण रुग्णालयाची निर्मिती करण्याकरिता शासनस्तरावर कोणती कार्यवाही सुरु आहे वा पूर्ण झाली आहे,

(४) असल्यास, सदर ठिकाणी ग्रामीण रुग्णालय केव्हापर्यंत सुरु होण्याचे शासनास अपेक्षित आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासन निर्णय दिनांक १७.०१.२०१३ अन्वये मौजे पोभुर्णा येथे ग्रामीण रुग्णालय मंजुर करण्यात आलेले आहे.

(३) शासन निर्णय दि.२४ जुन, २०१३ अन्वये मुख्य इमारत बांधकामासाठी रु.४००.५० लक्ष एवढया रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) बांधकाम पुर्ण होताच ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित करण्यात येईल.

-----------------

## एकघरी व वाशी (ता.हिमायतनगर, जि.नांदेड) या दोन गावांचा कारभार पाहणाऱ्या ग्रामसेवकाने केलेला गैरव्यवहार

**(१००) * ४७००३ श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकघरी व वाशी (ता.हिमायतनगर, जि.नांदेड) या दोन गावाचा कारभार एकच ग्रामसेवक पाहत असून या ग्रामसेवकांनी एकाच कामावर दोन योजनेचा निधी खर्च केल्याचे दाखवून गैरव्यवहार केल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) होय. विस्तार अधिकारी यांनी केलेल्या तपासणीत एकाच कामासाठी दोन योजनांचा वेगवेगळा निधी खर्च केल्याचे आढळून आले आहे.

(३) व (४) संबंधित ग्रामसेवकाला कारणे दाखवा नोटिस बजावण्यात आली आहे. सदर नोटिसीचा खुलासा प्राप्त झाला असून त्यांची तपासणी करण्यात येत आहे. तपासणीअंती आवश्यकतेनुसार प्रशासकिय कार्यवाही सुरु करण्यात येईल.

-----------------

## नाशिक शहरातील किशोर सुधारलयाच्या दरवाजाचे गज कापून बारा अल्पवयीन मुले मध्यरात्री पळून गेल्याबाबत

**(१०१) * ४३१९४ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम),**

**श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील किशोर सुधारालयाच्या दरवाजाचे गज कापून बारा अल्पवयीन मुले मध्यरात्री पळून गेली असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पळून गेलेल्या बारा मुलांपैकी नऊ पुण्याची, दोन सातारा व एक मुंबईचा असुन यातील तिघांवर खुनाचे आरोप दाखल आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी हलगर्जी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या प्रकरणी संबंधित आरोपींना अटक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.
(३) प्रस्तुत प्रकरणी प्राथमिक चौकशीमध्ये दोषी आढळून आलेले २ रक्षक व १ हवालदार अशा एकूण ३ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे.

तसेच २ तुरुंगाधिकारी व १ रक्षक यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम १० अन्वये कारवाई सुरु करण्यात आलेली आहे.
(४) पळून गेलेल्या बारा किशोर बंद्यांपैकी १० बंद्यांना सरकारवाडा पोलीस स्टेशन, नाशिक यांचेमार्फत अटक करुन बोर्स्टल स्कूलमध्ये दाखल करण्यात आले आहे. तसेच एक किशोर बंदी स्वत: हजर झाल्याने त्यास बोर्स्टल स्कूल मध्ये दाखल करण्यात आलेले आहे.

उर्वरित एक किशोर बंद्यास अटक करणेबाबत सरकारवाडा पोलीस स्टेशन, नाशिक यांचेकडे वेळोवेळी पत्रव्यवहार करुन सदर बंद्यास अटक करणेबाबत विनंती करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई व ठाणे परिसरातील शासकीय रुग्णालयांना अन्नधान्य पुरवठ्याचे दीक्षा सामाजिक संस्थेला देण्यात आलेल्या कंत्राटामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१०२) * ४०७५४ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००९ पासून राज्य शासनाच्या १२ रुग्णालयांना बाजारभावापेक्षा जवळपास दुप्पट दराने भाज्या, कडधान्ये व फळांचा पुरवठा करणाऱ्या दोन कंत्राटदाराविरुध्द केलेला चौकशी अहवाल माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री, मा.आरोग्य मंत्री यांना सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) मुंबई, ठाणे परिसरातील शासकीय रुग्णालयांना अन्नधान्य पुरवठ्याचे कंत्राट देण्यात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करावी, अशी शिफारस मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २ जानेवारी, २०१६ रोजीच्या सुमारास केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, या चौकशीचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(४) असल्यास सदर अहवालामध्ये कोणत्या प्रमुख बाबी अंतर्भूत आहेत,

(५) सदर अहवालाच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे, खरे नाही.

तथापि प्रस्तूत प्रकरणी अपर मुख्य सचिव (गृह विभाग) यांच्या मार्फत चौकशी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(३) चौकशी प्रक्रीया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बुलढाणा येथील क्षय आरोग्य धामच्या इमारतीच्या शिकस्तीबाबत**

**(१०३) * ४७७६८ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा येथील क्षय आरोग्य धाम इमारतीच्या शिकस्तपणामुळे रुग्णांच्या सुरक्षिततेस बाधा निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय निष्पन्न झाले,
(३) असल्यास, शिकस्त इमारत पाडून नवीन इमारत उभारण्यांस शासन मंजूरी देणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) इमारत शिकस्त झाली नसल्यामुळे विलंबाबाबत प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बोमनाळी (ता.मुखेड, जि.नांदेड) येथे निर्माण करण्यात आलेल्या लघुसिंचन तलावाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१०४) * ४९७२३ डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड, जिल्हा नांदेड येथील बोमनाळी येथे १९७३ साली ८४ हेक्टरमध्ये निर्माण करण्यात आलेल्या लघुसिंचन तलाव १९८८-८९ मध्ये फुटला व त्यानंतर गेल्या २७ वर्षापासून या तलावाची दुरुस्ती करण्यात आली नाही असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दुरुस्ती केल्यास ९ गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नासह १०० हेक्टर जमीन ओलीताखाली येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या लघुसिंचन तलावाची पाहणी करुन तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची  कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशतः खरे आहे.

सदर प्रकल्प १९८३ साली पूर्ण करण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर धरणाची मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना यांच्याकडून पाहणी करण्यात आली. त्यांनी सविस्तर अभ्यासानंतर या धरणाबाबत तीन पर्याय सुचविले. त्या पर्यायापैकी अस्तित्वातील धरणाची दुरुस्ती न करता नविन जागेवर धरण बांधण्याबाबतच्या पर्यायानूसार धरण रेषा सर्वेक्षणाचे व अन्वेषणाचे काम हाती घेण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत  नाही.

----------------

## राज्यातील प्रत्येक जिल्हयात अहिल्याबाई होळकर महिला बाजारपेठ स्थापन करण्याबाबत

**(१०५) * ४३६०८ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मार्च २०१५ मध्ये राज्यातील प्रत्येक जिल्हयात अहिल्याबाई होळकर महिला बाजारपेठ स्थापन करण्याची घोषणा केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या माध्यमातून बचत गटांच्या हजारो महिला सदस्यांना शाश्वत स्वरुपाचा रोजगार उपलब्ध होणार होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेकरिता सुमारे २०० कोटी रुपयांचा निधी अर्थसंकल्पात चिन्हांकित करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर चिन्हांकित निधी दिनांक ३१ मार्च, २०१६ अखेर व्यपगत असल्याबाबत आयुक्त, महिला व बालकल्याण यांना वारंवार पत्रव्यवहार करुन देखील कार्यवाही होऊ शकली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरची बाजारपेठ स्थापन न होण्यामागची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) होय.
(४) मा.मंत्री वित्त महोदयांच्या सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय भाषणामधील चिन्हांकित रक्कमा दर्शविलेल्या योजनासंदर्भात कार्यवाही करण्याबाबत अ.मु.स (नियोजन) यांचेकडे दि.३०.७.२०१५ रोजी बैठक झाली. सदर बैठकीमध्ये महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तुंसाठी बाजारपेठ/ विक्री केंद्रे निर्माण करण्याची कार्यवाही ग्राम विकास विभागाकडून केली जाते. त्यामुळे महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंच्या विक्रीसाठी जिल्हास्तरावर कायमस्वरुपी "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर बाजारपेठ" निर्माण करणे ही नवीन योजना ग्राम विकास विभागामार्फत राबविण्याबाबत अ.मु.स (नियोजन) यांनी निर्देश दिले. तसेच बाजारपेठ/ विक्री केंद्रे निर्माण करण्याची बाब ग्राम विकास विभागाशी संबंधित असल्याने व बाजारपेठ निर्माण करण्याबाबतची यंत्रणा महिला व बाल विकास विभागाकडे उपलब्ध नसल्याने सदर योजना अ.मु.स (नियोजन) यांनी दिलेल्या निर्देशानुसार ग्राम विकास विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली. तथापि, सद्यस्थितीत ग्राम विकास विभागाकडे सुरु असलेली तालुकास्तरीय विक्री केंद्राची योजना बंद करण्याबाबत त्या विभागाकडे प्रस्ताव विचाराधीन असून सदरची नवीन योजना राबविणेसाठी ग्राम विकास विभागाकडे यंत्रणा उपलब्ध नसल्याने सदर योजना ग्राम विकास विभागामार्फत राबविणे शक्य नसल्याचे ग्राम विकास विभागाने दि.१६.२.२०१६ व दि.२४.२.२०१६ रोजी महिला व बाल विकास विभागास कळविले आहे. तसेच सदर योजना पूर्णत: नवीन असल्याने त्यासाठी प्रशासकीय मान्यता देणे, नवीन लेखाशिर्ष उपलब्ध करुन घेणे या बाबी दि.३१ मार्च, २०१६ पूर्वी पूर्ण करणे शक्य नसल्याने यासाठी चिन्हांकीत केलेला नियतव्यय वापरणे या वर्षात शक्य नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासकीय रुग्णालयात विविध प्रकारच्या शुल्कांमध्ये करण्यात आलेली वाढ**

**(१०६) * ३९७७१ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.बसवराज पाटील (औसा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय रुग्णालयातील विविध प्रकारच्या शुल्कांमध्ये जवळपास दुप्पट वाढ करण्याचा आदेश नुकताच माहे डिसेंबर २०१५ मध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाने काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयामुळे राज्यातील सर्व जिल्हा, उप जिल्हा रुग्णालयांसह ग्रामीण रुग्णालयांतील जवळपास २५० प्रकारच्या रुग्ण शुल्कात वाढ होणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शुल्क वाढीमुळे शासकीय रुग्णालयात जाणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना आता दुप्पट शुल्क दयावे लागणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास सदर शुल्क वाढीबाबत सर्व स्तरातून विरोध दर्शविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर निर्णयाबाबत शासन फेरविचार करणार आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

गत १५ वर्षामध्ये रुग्णशुल्कात वाढ न केल्याने तसेच वेद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील रुग्णालये व या विभागाच्या अखत्यारीतील रुग्णालये यामध्ये रुग्णशुल्कात असणारी तफावत सुरु करण्यासाठी सुधारीत दर लागू केले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) शुल्क वाढ जरी केली असली तरी, दारिद्रयरेषेखालील कुटुंबांना तसेच ६० वर्षावरील जेष्ठ नागरीकांना सर्व आरोग्य सुविधा मोफत आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर जिल्हयातील पाणलोट प्रकल्पात झालेला गैरव्यवहार**

**(१०७) * ४६६९४ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील पाणलोट कामांच्या तपासणीमधील ४१७ गावातील २९८ पाणलोट प्रकल्पांची चौकशी सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाच वर्षातील मंजूर २९६ कोटी २८ लाख रक्कमेपैकी आजतागायत ९२ कोटी रुपये खर्च करण्यात आल्याची बाब दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशी समितीमधील सदस्य व सचिवांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) नाही.

बॅच क्र.१ ते बॅच क्र.६ करीता २९६.२८ कोटी रुपयांच्या आराखड्यास मंजूरी मिळाली आहे. माहे जानेवारी अखरे १०९.२७ कोटी एवढे अनुदान प्राप्त झाले असून रु.१०३.३१ कोटी इतकी रक्कम खर्च झालेली आहे.

(३) नाही. तथापि पाणलोट समित्यांमार्फत केलेल्या कामांची चौकशी करण्यात आली आहे.
(४) प्रस्तूत प्रकरणी चौकशी अहवालाच्या अनुषंगाने अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द शिस्तभंगाविषयक कारवाई करण्याच्या सूचना आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लघु-पाटबंधारे (जि.भंडारा) विभागाचे तुमसर, मोहाडी आणि लाखांदूर असे तीन उपविभाग सुरु करण्याबाबत

**(१०८) * ४७५६७ श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयात लघु-पाटबंधारे विभागाचे तुमसर, मोहाडी आणि लाखांदूर असे तीन उपविभाग मंजूर असुन ते सुरु करण्याबाबतची दिनांक ५ मार्च, २०१३ रोजी शासनास विनंती करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आकृतीबंध मंजुर करण्यात आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपविभाग सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) आकृतीबंधानुसार भंडारा जिल्हयात तीन उपविभाग निर्माण करण्यास दि.३.८.२००९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(३) व (४) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, भंडारा यांनी याबाबत सुधारित प्रस्ताव शासनास सादर केला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.

-----------------

## राज्यातील बालसुधारगृहांमधील गैरकारभार रोखण्यासाठी महिला व बालविकास विभागाने केलेल्या सर्वेक्षणाबाबत

**(१०९) * ३९८७१ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बालसुधारगृहांमधील गैरकारभार रोखण्यासाठी महिला व बालविकास विभागाने केलेल्या सर्वेक्षणामध्ये २१५ हून अधिक बालसुधारगृहांत निकष न पूर्ण केल्यामुळे मान्यता रद्द करण्यासंदर्भात प्रस्ताव पाठविल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रद्द करण्यात आलेल्या २१५ बालगृहांतील मुलांच्या आधाराकडे लक्ष देण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच राज्यातील दयनीय अवस्था असणाऱ्या बालसुधार गृहांना दर्जेदार सुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे,

शासन निर्णय क्र. बालगृ-२०१५/ प्र.क्र.५०/ का-८, मुंबई दिनांक १३ जुलै, २०१५ अन्वये बालगृहांच्या वर्गीकरणाबाबत तपासण्या करण्यात आलेल्या असून सदर तपासणीमध्ये २१४ बालगृहे मूल्यांकनामध्ये 'क' व 'क पेक्षा कमी' वर्गात आढळून आलेले असल्याने त्यांच्या मान्यता रद्द करण्याबाबत प्रस्तावित आहे.

तथापि, सदर तपासणी विरोधात मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल झाल्या असून मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार सदर तपासणीबाबत अहवाल मा.न्यायालयास सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे. याबाबत मा.न्यायालयाच्या पुढील निर्देशानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विदर्भातील सूक्ष्म सिंचनाचे प्रलंबित प्रस्ताव निकाली काढून अनुदानाचे १७३ कोटी रुपये तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(११०) * ४६५७५ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१२-१३ पासून विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रम विदर्भात राबविण्याच्या कार्यक्रमासाठी सूक्ष्म सिंचनासाठी निधी दिला जातो, हे खरे आहे काय

(२) असल्यास, विदर्भातील शेतकऱ्यांना सिंचनाचे सन २०१३-२०१६ या कालावधीतील रु.१७३ कोटी अनुदान अद्यापि प्रलंबित असून त्याबाबत कृषि अधिकारी उत्तरे देण्यास टाळाटाळ करीत आहे, हे ही खरे आहे काय

(४) तसेच शासनाने सन २०१२-१३ व २०१३-१४ करिता ६६२ कोटी रुपये उपलब्ध केलेला निधी अन्य जिल्हयावरील ई-प्रणालीवर खर्च केला गेला, हे खरे आहे काय

(५) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी कृषी आयुक्तांकडे लेखी पत्र देऊन अनुदान तातडीने वितरण करण्याची मागणी दिनांक १८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय

(६) अद्यापि, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०१२-१३ ते २०१६-१७ या पाच वर्षासाठी सूक्ष्म सिंचनासाठी रु.४७३.२० कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी सन २०१२-१३ ते २०१४-१५ पर्यंत रु. २७२.५९ कोटी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी कृषी आयुक्तांकडे लेखी निवेदन दिलेले आहे.

(५) सन २०१३-१४ व २०१४-१५ मधील पुर्वसंमती दिलेल्या प्रकरणासांठी सन २०१५-१६ मध्ये रु.४३.२६ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मध्य चांदा वन प्रकल्प विभाग (जि.चंद्रपूर) बल्लारशा अंतर्गत येणाऱ्या झरण वनक्षेत्रातील देवई गावाशेजारील शेतात चार चितळांची झालेली शिकार**

**(१११) * ५०१६२ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्य चांदा वन प्रकल्प विभाग (जि.चंद्रपूर) बल्लारशा अंतर्गत येणाऱ्या झरण वनक्षेत्रातील कक्ष क्र. १०३ जवळील देवई गावाशेजारील शेतात चार चितळांची शिकार झाल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी किती जणांना अटक करण्यात आली आहे,

(३) अद्याप कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मध्य चांदा वन प्रकल्प विभाग (चंद्रपूर) बल्लारशा अंतर्गत घेणाऱ्या झरण वनक्षेत्रातील देवई गावाशेजारील कक्ष क्र.१०३ मध्ये तीन चितळांची शिकार झाल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी निदर्शनास आले आहे.

(२) व (३) या प्रकरणी ११ संशयित व्यक्तींना अटक करण्यात आलेली आहे. सदर सर्व आरोपीविरुध्द वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२, भारतीय वन अधिनियम, १९७२, भारतीय वन अधिनियम, १९२७ तसेच भारतीय दंड संहितेची कलमे लावण्यात घेऊन मा. न्यायदंडाधिकारी , गोंडपिंपरी ह्यांचे समोर हजर केले असता त्यांनी दि.२१.०१.२०१६ ते ०२.०२.२०१५ पर्यंत न्यायालयीन कोठडी दिली होती. त्यानंतर त्यांना जामिनावर मुक्त केले आहे.

-----------------

## राज्यात नोंदणीकृत गर्भपात केंद्रांमध्ये गर्भपातादरम्यान महिलांचा झालेला मृत्यू

**(११२) * ४९७२७ डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१० ते माहे ऑक्टोबर, २०१५ या सहा वर्षांच्या कालावधीत नोंदणीकृत गर्भपात केंद्रांमध्ये गर्भपातादरम्यान तब्बल ११४ महिलांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी गंभीर दखल घेण्यात येऊन गर्भपातादरम्यान होणारे मृत्यू रोखण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन गर्भपातादरम्यान अथवा गर्भपातानंतर महिलांचा मृत्यू होऊ नये यासाठी शासनाने खालीलप्रमाणे उपाययोजना केली आहे :-

- राज्यात वैद्यकीय गर्भपात कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत असून, त्यासाठी गर्भपात योग्य ठिकाणी व प्रशिक्षित वैद्यकीय व्यावसायिकांद्वारे तसेच योग्य कारणास्तव व्हावेत यादृष्टीने कार्यवाही केली जाते.
- सुरक्षित गर्भपाताची सुविधा सुसज्ज शासकीय रुग्णालयात मोफत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
- आयपास या संस्थेच्या सहाय्याने वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुग्णालयात प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच प्रशिक्षणानंतर आयपास या संस्थेमार्फत तांत्रिक सहाय्य केले जात आहे.
- पारंपारिक गर्भपात शस्त्रक्रियेच्या तुलनेत अधिक सुरक्षित असणारी मॅन्युअल वॅक्यूम ॲस्पीरेशन या अत्याधुनिक पध्दतीचा अवलंब शासकीय गर्भपात केंद्रांमधुन केला जात आहे.
- गर्भधारणेनंतर ७ आठवड्याच्या आतील कालावधीतील गर्भपात करण्यासाठी मेडीकल मेथड ऑफ ॲबॉर्शन या पध्दतीद्वारे शस्त्रक्रिया न करता केवळ औषधांचा उपायोग करुना सुरक्षित गर्भपाताची सुविधा शासकीय केंद्रामधून मोफत उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

- गर्भपातादरम्यान अथवा गर्भपातानंतर झालेला महिलांचा मृत्यू हा मातामृत्यू असतो. रुग्णालयात होणाऱ्या सर्व मातामृत्यूंचे अन्वेषण करण्यात येते. तसेच यांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी मार्गदर्शक सुचना सर्व आरोग्य संस्थांना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.